# चमकत्या चांदण्या

( दुसरा मराठी प्रातिनिधिक लघुतम-कथासंग्रह )

वा-वा-
२३५९

संपादक—
प्रो. भा. म. गोरे. एम्. ए.
विलिंग्डन कॉलेज, सांगली.

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा.
दा. क्र. २३५९

१९४६.

IRBK-0102359
IRBK-0102359

किंमत १॥ रुपया

दा० क्र०- २३५८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

22 NOV 1974

# चमकत्या चांदण्या

( दुसरा मराठी प्रातिनिधिक लघुतम-कथा संग्रह )

संपादक—
प्रो. भा. म. गोरे. एम्. ए.
विलिंग्डन कॉलेज, सांगली.

ग्रंथ संग्रहालय
२१६६२
नो. दि.

— मुद्रक व प्रकाशक —
दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. (टिळक) चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें.

वाचनालय शाखा
२३५८ नो दि

किंमत १॥

IRBK-0102359
IRBK-0102359

# प्रास्ताविक.

' नवें निशाण ' हा लघुतमकथांचा मराठींतला पहिला प्रातिनिधिक संग्रह प्रसिद्ध होऊन अर्धे तप लोटल्यावर, आज हा दुसरा प्रातिनिधिक संग्रह मराठी वाचकांपुढें ठेवतांना माझ्या मनाला अत्यंत समाधान वाटत आहे. पहिल्या संग्रहाचे प्रकाशक, संपादक व अनेक लेखक यांचा दुसऱ्याही संग्रहाशीं त्याच सलोख्याच्या नात्यानें अर्ध्या तपानंतरही संबंध रहावा हें आजच्या स्थितींत तरी संस्मरणीय म्हणावयास हरकत नाहीं. लघुतम-कथा या नव्या, व लोकप्रियतेचा चलनी शिक्का डोक्यावर न बसलेल्या कथाप्रकारास **' ध्रुव '** मासिक व **'चित्रशाळा प्रेस'** या संस्थांनीं १९३८ सालापासून आजतागायत दिलेल्या साहाय्याचा साभार निर्देश लघुतम-कथेचा इतिहास लिहिणाऱ्या कोणाही भावी लेखकाला टाळतां येणें अशक्य आहे. सर्व लघुतम-कथा लेखक व रसिकांच्या वतीनें मी या दोन संस्थांचे आभार मानतों.

' नवें निशाण ' या संग्रहाला लाभलेल्या श्री. वा. ना. देशपांडे यांच्या विस्तृत व विवेचक प्रस्तावनेसारखी दुसरी प्रस्तावना या संग्रहासही लाभली असती तर फार बरें झालें असतें असें कोणास वाटेल, तर कांहींच्या मतें " झालें एवढें ईशस्तवन पुरें आहे " असेंही असणें शक्य आहे.

कागद, छपाईची टंचाई असल्यानें संग्रह शक्य तितका आटोपशीर करण्याबाबत प्रकाशकांची सूचना असल्यानें प्रस्तावनेचा विस्तार आटोपता घ्यावा लागला आहे. पुढील प्रातिनिधिक संग्रह काढण्यास जगलों वांचलों तर ही उणीव दूर करण्याचा प्रयत्न करतां येईल !

कोणत्याही संग्रहांतील निवडीबद्दल टीकाकारांचें एकमत कधींच होत नाहीं हा एक नियमच ठरून गेला आहे. हा संग्रहही त्याला अपवाद नाहीं. ही निवड करतांना, दूरस्थ, अल्पशिक्षित, आणि पेशानें साहित्यिक नसणाऱ्या लेखकांच्या कथांच्या बाबतींत हात जरा मोकळा सोडला आहे असें दिसणें शक्य आहे—अत्यंत चोखंदळ टीकाकारांना कदाचित् हा दोषही वाटेल. आमचें समर्थन एवढेंच, कीं लघुतम-कथा हा प्रकार शक्य तितका लोकाभिमुख, सुलभ, व व्यापक करणें हें कार्य आम्हीं हातीं घेतलें

आहे. यासाठीं अधिकाधिक संख्येनें नवे नवे लेखक पुढें आले पाहिजेत. त्यांना उत्तेजनही मिळालें पाहिजे. नाहींपेक्षां मूठभर ‘प्रथितयश’ व ‘उस्ताद’ लघुतम-कथा लेखकांच्या मोजक्या कथांचा संग्रह काढणें आम्हांला अशक्य नव्हतें. परंतु ‘प्रातिनिधिक’ म्हटलें म्हणजे त्यांत उत्तमा-बरोबर मध्यम येणारच.

वाचकांना हवेसे वाटणारे ‘प्रथितयश’ चेहरे या संग्रहांतही आढळ-तीलच; परंतु आस्थावंत; कलेनें कमी भरले तरी निष्ठेनें पूर्ण असे नवे नवे लेखकही या संग्रहांत जमलेले दिसतील लघुतम-कथेच्या बाबतींत लेखक व लेखन यांचें क्षेत्र जितकें व्यापक व सर्वग्राही होईल तितकें हवेंच आहे. “केवळ कांहीं मूठभर उच्चभ्रू ‘चोखंदळ’ साहित्यिकांची एक टूम” असा कुलक्षणी किताब या प्रकाराच्या कपाळीं येऊं नये याबद्दल मात्र आम्हीं पहिल्यापासून काळजी घेतली आहे, व लोकसंग्रहाची वृत्ति ठेवली आहे.

या संग्रहासाठीं सर्व महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्रांतून—मोठ्या शहरापासून अगदीं छोट्या खेड्यांतूनही कथा आल्या आहेत. डबल ग्रॅज्युएट व प्रोफेसरांपासून, इंग्रजीचा गंधहि नसलेल्या लोकांकडून, वृद्धांपासून शाळा-करी विद्यार्थ्यांपर्यंत, प्रथितयश लेखकश्रेष्ठांपासून नवशिक्या, परंतु हौशी अभ्यासी कथालेखकांकडून या कथा आलेल्या आहेत. यामुळें, या कथा-प्रकाराचें लोण सर्व दर्जाच्या मराठी लेखकवर्गापर्यंत जाऊन पोंचलें आहे, ही एक गोष्ट तरी निश्चित झाली आहे. तंत्राबद्दल सूक्ष्म—सूक्ष्मतर चर्चा आतां पुरी करून, या प्रकाराबद्दल आस्था असणाऱ्या सर्व लेखकांनीं लघुतम-कथेला लघुकथेइतका दर्जा व लोकप्रियता आणण्यास सतत प्रयत्न केले पाहिजेत, असें या प्रसंगानें सांगणें योग्य होईल.

जाहीर विनंतीला मान देऊन ज्या थोर व प्रथितयश लेखकांनीं आपण होऊन कथा पाठवून दिल्या त्यांचे आम्ही आभारी आहोंत. आपुलकीनें, व आपलेंच कार्य असें समजून ज्या तरुण, उत्साही, लघुतम-कथा लेखकांनीं कथा पाठविल्या, त्या सर्वांचें येथें स्वागत करतों. यापैकीं ज्या कथा या-पूर्वीं इतरत्र प्रकाशित झाल्या असतील ( अशा थोड्याच आहेत ) त्यांच्या

लेखक, प्रकाशक (पूर्वप्रसिद्धि देणाऱ्या) व नियतकालिकांचे आम्ही कृतज्ञतेनें आभार मानतों.

या कार्यांत 'ध्रुव' मासिकाचे कार्यक्षम व सौजन्यपूर्ण संपादक श्री. रा. प्र. कानिटकर एम्. ए. यांचें बहुमोल साह्य झालें आहे. १९३८ सालापासून त्यांच्या 'ध्रुव' मासिकानें लघुतम-कथेला आस्थेनें आश्रय देऊन वाढविलें आहे. दोन्ही प्रातिनिधिक संग्रहांचे वेळीं त्यांचें अमोल साह्य झालें आहे.

परमेश्वरकृपेनें लघुतम-कथेस उत्तरोत्तर अधिकाधिक लोकप्रियता प्राप्त होवो, या प्रकारचे बहुसंख्य स्वतंत्र व प्रातिनिधिक संग्रह प्रकाशित होवोत—आणि ते याहून अधिक अधिकारी संपादकाच्या नेतृत्वाखालीं प्रसिद्ध होवोत अशी आशा व्यक्त करून वाचकांचा निरोप घेतों.

सांगली<br>१९४६ —भा. म. गोरे.

* *

अनुक्रम २८८८८२
दि. ....
क्रमांक ९८३६
नों. दि. २१-८-५९

# चमकत्या चांदण्या

## (लघुतमकथासंग्रह)

### १ निसर्ग आणि मनुष्य

ले:— श्री. वि. स. खांडेकर ( कोल्हापुर )

घरामागच्या गवतांत फिरायची नी नाचायची फार हौस होती त्याला. त्याची आई नेहमीं म्हणे " बाबा, गवतांत असं नाचूं नये "

—कां ? ' तो धिटाईनें प्रश्न करी.

—" गवतांत साप लपून बसलेले असतात. "

आतां गवतांत खेळायला जातांना तो हातांत एक काठी घेऊन ११
लागला. एके दिवशीं त्या मऊ मऊ हिरवळीवर नाचतां नाच १२
चटकन् आपला पाय वर उचलला. त्याला वाटलें—आप १४
चावला; पण त्यानें पाय वर उचलून पाहिला मात्र—आश्च १५
भला मोठा कांचेचा तुकडा शिरला आहे असें त्याला शेर १७

त्याला आठवलें—कांहीं दिवसांपूर्वी कंदिलाची साठीं लिहिलेली
तिचे तुकडे खिडकींतून त्यानें स्वतःच बाहेरच्या लघुतमकथा ९९
होते !! १०१
१०२

## २ सुख

ले. प्रो. वामनराव चोरघडे एम्. ए. ( वर्धा )

रावबहादुरांच्या पत्नी विमलाबाई दुपारीं सहज बाहेर ओसरीवर येऊन बसल्या. जवळच त्यांचें मूल खेळत होतें.

...त्यांच्या दाराशीं एक भिकारीण केविलवाण्या स्वरांत भिक्षा मागत होती. तिचें मूल तिच्या पुढ्यांत गुंडाळून पडलें होतें.

...विमलाबाईंचें मूल रडूं लागलें. त्यांची मुद्रा त्रासिक झाली. लागलीच दाईला हांक मारून त्यांनीं त्याला तिच्या स्वाधीन केलें.

...भिकारणीचें मूल रडूं लागलें. तिनें आपल्या मुलाला पोटाशीं धरलें.

...दाईनें मुलाला सुंदरशा पाळण्यांत, मऊशा बिछान्यावर निजविलें.

...भिकारणीनें आपल्या मुलाला वात्सल्यानें कुरवाळलें. मुलाला उगा करण्याच्या उद्देशानें दाई त्याला हळू हळू थोपटून झोके घेऊं लागली.

...भिकारणीचा मुलगा आईच्या पोटाशीं बिलगून स्तनपान करीत होता !

...विमलाबाईंचा मुलगा अजूनहि रडत होता.

...भिकारणीच्या मुलाचें तोंड दुधानें फेसाळलें होतें.

...विमलाबाईंनीं सर्व पाहिलें. संतापून त्या त्या बाईच्या अंगावर ...न गेल्या.

...कारीण केविलवाण्या स्वरांत भिक्षा मागूं लागली !!

★ ★

## ३ कीर्ति म्हणजे काय ?

—प्रो. भा. म. गोरे.

...रावें परी कीर्तिरूपें उरावें '

... खड्या सुरांत साऱ्यांना बजावीत होता. उतारूंना ...ली टोपी पुढें करून तो गर्दीतून फिरत होता.

## २ सुख

ले. प्रो. वामनराव चोरघडे एम्. ए. ( वर्धा ),

रावबहादुरांच्या पत्नी विमलाबाई दुपारीं सहज बाहेर ओसरीवर येऊन बसल्या. जवळच त्यांचें मूल खेळत होतें.

...त्यांच्या दाराशीं एक भिकारीण केंविलवाण्या स्वरांत भिक्षा मागत होती. तिचें मूल तिच्या पुढ्यांत गुंडाळून पडलें होतें.

...विमलाबाईंचें मूल रडूं लागलें. त्यांची मुद्रा त्रासिक झाली. लागलीच दाईला हांक मारून त्यांनीं त्याला तिच्या स्वाधीन केलें.

...भिकारणीचें मूल रडूं लागलें. तिनें आपल्या मुलाला पोटाशीं धरलें.

...दाईनें मुलाला सुंदरशा पाळण्यांत, मऊशा बिछान्यावर निजविलें.

...भिकारणीनें आपल्या मुलाला वात्सल्यानें कुरवाळलें. मुलाला उगा करण्याच्या उद्देशानें दाई त्याला हळूं हळूं थोपटून झोके घेऊं लागली.

...भिकारणीचा मुलगा आईच्या पोटाशीं बिलगून स्तनपान करीत होता !

...विमलाबाईंचा मुलगा अजूनहि रडत होता.

...भिकारणीच्या मुलाचें तोंड दुधानें फेसाळलें होतें.

...विमलाबाईंनीं सर्व पाहिलें. संतापून त्या त्या बाईच्या अंगावर [illegible] गेल्या.

[illegible]कारीण केंविलवाण्या स्वरांत भिक्षा मागूं लागली ! !

★ ★

## ३ कीर्ति म्हणजे काय ?

—प्रो. भा. म. गोरे.

[illegible]रावें परी कीर्तिरूपें उरावें'

[illegible] खड्या सुरांत साऱ्यांना बजावीत होता. उतारूंना [illegible]ली टोपी पुढें करून तो गर्दीतून फिरत होता.

# अनुक्रमणिका


| कथा. | पृष्ठ. |
|---|---|
| १ निसर्ग आणि मनुष्य | १ |
| २ सुख | २ |
| ३ कीर्ति म्हणजे काय ? | २ |
| ४ भाकर भाकर ! ! | ६ |
| ५ प्राणी | ७ |
| ६ अल्ला–हु–अकबर ! | ८ |
| ७ सोय— ? | १० |
| ८ विद्वान् साहित्यिक ... | १३ |
| ९ पोटचा गोळा ! | १५ |
| १० घरची लक्ष्मी | १६ |
| ११ दिवटी आणि तारका | २० |
| १२ माया | २२ |
| १३ भावनावशता | २४ |
| १४ दोन लाडू आणि एक करंजी | २६ |
| १५ सतीचें वाण | ३१ |
| १६ याक्षिणीची कांडी | ३४ |
| १७ त्याचें हास्य | ३५ |
| १८ प्राध्यापकांची प्रकृति | ३७ |
| १९ दैववान्—! | ४२ |
| २० अभिरुचि ! | ४३ |
| २१ समरसता | ४४ |
| २२ चप्पल ! | ४५ |
| २३ रुमाल— | ४७ |
| २४ प्रेमाचें प्रायश्चित्त | ४८ |
| २५ कागद व कायदा | ४९ |
| २६ म्हणे नांवांत काय आहे ! | ५२ |

| कथा | पृष्ठ. |
|---|---|
| २७ आकाशदिवा | ५४ |
| २८ अकरा वर्षांचा म्हातारा ! | ५६ |
| २९ काळी मांजरी | ५८ |
| ३० खेळविते ललना | ६१ |
| ३१ शृंखला | ६२ |
| ३२ मोती | ६५ |
| ३३ कलावंत | ६७ |
| ३४ रंभा | ६८ |
| ३५ दोन आगी | ७१ |
| ३६ त्याचा आदर्श | ७२ |
| ३७ पंडित | ७३ |
| ३८ क्रांतिवीर | ७५ |
| ३९ मुर्दंड | ७८ |
| ४० नकोत ते पाहुणे ! | ८० |
| ४१ अनाथाश्रम | ८३ |
| ४२ अमरचित्र | ८५ |
| ४३ साभार स्वीकार | ८७ |
| ४४ दाढीचें दातृत्व | ९० |
| ४५ नंदा | ९१ |
| ४६ नवें तंत्र | ९२ |
| ४७ पांढरीं फुलें | ९४ |
| ४८ प्रोफेसरांशीं लग्न | ९५ |
| ४९ शेरास सव्वाशेर | ९७ |
| ५० न छापण्यासाठीं लिहिलेली लघुतमकथा | ९९ |
| ५१ तल्लफ | १०१ |
| ५२ जयमाळ | १०२ |

| कथा | पृष्ठ. |
| --- | --- |
| ५३ अन्याय | १०५ |
| ५४ स्त्रीस्वभाव | १०७ |
| ५५ लतां आणि फुलें | १०८ |
| ५६ भिकारीण | ११० |
| ५७ अंगठीचें मोल | १११ |
| ५८ सूड | ११३ |
| ५९ प्रचंड सभा | ११४ |
| ६० उपकाराचा मोबदला | ११४ |
| ६१ खिडकींतून | ११५ |
| ६२ कला आणि जीवन | ११६ |
| ६३ दूरदृष्टि | ११७ |
| ६४ पुरुष | ११८ |
| ६५ घारोपंतांची एकसष्टी | १२० |
| ६६ दैवी खेळ | १२१ |
| ६७ सासुरवास | १२१ |
| ६८ निसर्ग आणि मानव | १२३ |
| ६९ त्याचें धाडस | १२४ |
| ७० "ज० वि० प्र० सं.!" | १२५ |

'दादा !' म्हणून त्यानें ती टोपी माझ्या तोंडापुढें धरली. तेवढ्यांत पोर्टरची खडी हांक आली, आणि सारे उतारू सामान सांवरूं लागले. पुढें आलेल्या टोपींत पैसा टाकून गाडी बदलण्यासाठीं मी खालीं उतरलों. त्या भिकाऱ्याचे शब्द मनांत घुमत होते. मधूनच माझ्या मनांत एक प्रश्न उमटला– 'पण कीर्ति म्हणजे तरी काय ?' मुक्कामाला पोंचेपर्यंत हा हा प्रश्न पुन्हां पुन्हां माझ्या मनांत घोळत होता.

एक टांगा ठरवून मी एका पाथिकाश्रमाकडे निघालों. कोणाकोणाला भेटायचें हें ठरविण्यासाठीं खिशांतलीं पत्रें काढून मी यादी करूं लागलों, तेवढ्यांत टांग्याचा एक धक्का बसून मीं वर पाहिलें. समोरून आडवा जाणारा रस्ता माणसांनीं नुसता फुलून गेला होता. मधूनच कुठूनतरी टाळ–मृदंगांचा कानठळ्या बसविणारा आवाज येत होता. मोठाल्या टोपल्या घेतलेले लोक ओंजळीभर भरून फुलें वर झोंकीत होते.

मीं टांगेवाल्याला विचारलें, 'काय रे ? काय चाललंय् इथें ? मिरवणूक जाणार आहे वाटतं कोणी मोठ्या पुढाऱ्याची ?'

टांगेवाल्यानें लगाम कठड्याला अडकवून तंबाकूचा बार भरला. माझ्याकडे चमत्कारिक चर्येनें पहात तो म्हणाला, 'कसली मिरवणूक घेऊन बसलांत राव ? मर्तिक हाय हें !'

—"आं ? अन् इतके लोक बरोबर ! कोणी मोठा माणूस होता का या गांवांत?"

—"पलिकडे ती गिरण दिसतीया नव्हं का ? त्याच्या मालकाची आई, द्रुपदाबाय मेली आज सकाळीं–तीच चाललीया आतां."

भजनी ताफ्यामागून काहीं कुणबाऊ बायका आक्रोश करीत चालल्या होत्या. "माय माझे ! कशीग ग्येलीस ! आतां कुन–ग सांभाळील आम्हांला !"

हळूहळू सरकत आलेल्या त्या प्रेतयात्रेला मधून मधून हातांत हार घेतलेले लोक येऊन मिळत होते. हवेंत सर्वत्र उडणाऱ्या गुलालानें मला जोराचा ठसका लागला. टांगा मागें वळवून, एका आडरस्त्यानें पुढें निघाल्यावर मला या दृश्यानें कांहींतरी भव्य, उदास अन् उदात्त असें

वाटूं लागलें. " मरण मरावं तर असं. अशी कीर्ति मागं ठेवून मरावं. " कीर्ति म्हणजे काय विचारीत होतास—हें घे उत्तर. " माझें मन मलाच म्हणूं लागलें.

× × ×

दुसऱ्या दिवशीं त्या शहरांतलें काम आटपून मी पथिकाश्रमांत आलेलीं स्थानिक वृत्तपत्रें चाळीत, माझ्या खोलींत बसलों होतों. प्रत्येकांत जाड जाड काळ्या रेघा घालून—

" कै. पुण्यशील मातोश्री द्रौपदीबाई यांचें निधन "

असे मथळे दिले असून, खालीं मृतव्यक्तीचा चंदन, टिळे, माळा पेहरलेला फोटो छापला होता. पुढें त्यांचें चरित्र आणि गुणवर्णनहि विस्तारानें दिलें होतें.

...अशा रीतीनें कष्टाळू, पवित्र आयुष्य घालवून, एकादशीच्या दिवशीं पूजा आटोपून शांतपणें, कांहीं यातना न होतां त्यांनीं कसा देह ठेवला, हजारों मजुरांनीं त्यांच्या प्रेतयात्रेंत स्वयंस्फूर्तीनें कसा भाग घेतला, याचें ठसठशीत वर्णन केलें होतें.

मृतव्यक्तीची कीर्ति चिरंजीव करण्यासाठीं स्मारक-योजना चालू आहे... "

पथिकाश्रमाचा म्हातारा नोकर केरसुणी घेऊन खोली झाडण्यासाठीं आंत आल्यानें माझी वाचनाची तंद्री भंगली. खुर्चीखालीं पडलेलीं वृत्तपत्राचीं विखुरलेलीं पानें गोळा करून त्यानें टेबलावर ठेवलीं. त्यांतील एका पाना-वरचा काळ्या चौकटींतला तो फोटो पाहून तो थबकला आणि आश्चर्यानें उद्गारला—

—" आँ ? या आवाचा फोटूबी आला हाय छापून जणूं ? "

—" कायरे ? कोणाबद्दल म्हणतोस तूं ?" मीं विचारलें.

—" ही आवा ! नांव बी द्रुपदाबाय. बराबर पांच नवऱ्यांची..."

" आँ ! काय म्हणतोस तूं ? शुद्धीवर आहेस का तूं ? "

" जावा ! जावा राव ! ! शुद्ध जाणार तुम्हांसारख्यांची, हीं कागदं

वाचूनशान मान डोलावनारांची. मी या गांवच्याच न्हवं का? यवढी व्हती तवां पून न्याहालतुयां हिचं करतूक. '

त्यानें केरसुणी खालीं ठेवून, उंचीची कल्पना हातानें दाखविली. " नवरा मेला येक पोर ठेवून तवां भांडीं घांसाया राहिली होती यका सोनाराकडे. होती जरा गोरी भुरकी—तिथं त्याच्याच घरांत शिरली, अन् घर घेतलं लिवून त्याच्याकडून; असा धंदा सुरू केला तिनं. ही गिरणी हाय गांवांत. तिच्या मालकाजवळ राहिली. त्याच्याकडून सारं लिहून घेतलं अन् यक दिसाला वांत्या ढाळ होउनशान हिरवा निळा पडून आटपला. चांगला गडी. रातोरात फौजदाराची मूठ दाबून जाळून आली ही बया त्याला ! तवांपून ही बया अन् तिचा पोर यांची झाली ही गिरन... "

– " च्च् च्च् काय जग आहे पहा ! अशी बाई वैभवांत राहिली ऽ गिरणीची मालकीण झाली म्हणतोस ! कायदा नाहीं आडवा आला ? " मीं विचारलें. ' मानसांचा कायदा न्हाई आला पर देवाच्या कायद्याला हैतीं की डोळे ! सारं पाप फुटलं कीं तिच्या अंगावर ! पांच वर्सं सडत व्हती हंतरुणावर. म्येली तवां तिच्या मुडद्याला हात लावायबी कुनी येईना फुडं. मंग तिच्या पोरानं पंचीस पंचीस रुपये मोजल कामगारास्नी तिला उचलाया. दर कामगारास्नी रुपया दिला मर्तिकाच्या मिरवणुकींत फिराया. पांच पांच रुपयं दिलं त्यांच्या बायास्नी म्होट्यानं रडाया आरडाया ! न येईल त्येची नोकरी बंद ! काय करतां दादा ! क्येलं साऱ्यांनीं पोटासाठीं सोंग. मीबी व्हतों कीं कालच्या लोकांत. बंदा रुपया आनला म्यां घरां. अन् दादा ! आम्हां कुनबाउ अडानी लोकांनाच नग हसूं तुम्ही. तुमच्यासारख्या शान्या लोकांस्नी बी लई पैका दिला, तिचा च्येहरा छापाया नी खुशामती लिवाया. अवं ! येवढ्यानं काय झालंया ! तिचा पुतळा करूनशान बसवनार हैत गिरनीसमोर ! पूजा चालल आतां तिची. पतिवरता म्हनून लई किरत व्हईल तिची दादा ! किती निर्माळ सती साविञ्या टांचा घासूनशान, झिजून झिजून मेल्या असतील दुनियेंत. कोणाला नांवबी ठा... न्सतील त्यांचीं, अन्, हीं लांवसट बाया, ही नगरभवानी द्रुपदा, हिची किरत मातुर फिरल आतां समदींकड. दरवसाला उच्छव होईल, तिचा भंडारा करत्याल, पांच पंचवीस वर्सानं म्होटी

फुन्याईची पतिवरता म्हणून साऱ्या देशांत नांव होईल तिचं ! हाय कीं न्हाई जगाचा न्याई ऽ ”

म्हाताऱ्याच्या डोळ्यांतून तळमळीचीं आसवें ओघळलीं. कांहीं न बोलतां मी एक सिगारेट त्याच्यापुढें केली. पुढच्या फोटोला काडी लावून त्यावर आम्ही दोघांनी आमच्या सिगारेटी शिलगावल्या. तो म्हातारा खोलीबाहेर पडला. माझ्या मनांत मात्र पूर्वीचाच प्रश्न पुन्हां घोटाळूं लागला—

**‘कीर्ति म्हणजे काय ? ’**

★ ★

## ४ भाकर ! भाकर ! !

ले:–श्री. दत्तु बांदेकर ( मुंबई ).

एकदां एक उपाशी माणूस भुकेनें व्याकूळ होऊन वणवण हिंडत होता.

एका सद्गृहस्थाला त्याची दया आली, आणि तो त्याला घरीं घेऊन गेला.

त्यानें त्याला जिलबी वाढली, पण तो उपाशी माणूस ती खाईना.

त्यानें लाडू व घीवर वाढले. तरीही तो ते खाईना.

त्या गृहस्थानें नंतर श्रीखंड आणि बासुंदी देऊन पाहिली.

तरीही तो माणूस त्या पदार्थांना स्पर्श करीना.

“ कां रे बाबा ! तुला हवं तरी काय ? ” त्या गृहस्थानें चकित होऊन विचारलें !

तो उपाशी माणूस आरडाओरड करीत म्हणाला,

“ मला भाकर पाहिजे !–मी कामगार–पुढारी आहें ! ! ”

★ ★

# ५ प्राणी

ले:—श्री. स. हृदय—बी. ए. ( टिळक ) महाड

दुपारचें माझें जेवण यथेच्छ उरकून, मी आंचवीत असतांना मागील दारच्या खिडकींतून मी गल्लींत सहज म्हणून नजर टाकली.

पलीकडच्या पांचव्या कीं सहाव्या घरांतील एक स्त्री आपल्या मागील दारीं, हातांत कांहीं खरकटें—उष्टें अन्न घेऊन येऊन उभी राहिली. 'यू यू यू' असें म्हणत तिनें कुत्र्याला हांका मारल्या. पण तितक्यांत कुत्रा कांहीं आला नाहीं. चारपांच कावळे मात्र झट्‌दिशीं तेथें आले; हें पाहतांच त्या गृहिणीनें आपल्या हातांतील अन्न पत्रावळीसह तेथेंच टाकलें—नि ती निघून गेली.

त्या कावळ्यांनीं त्या अन्नावर झडप घातली तोंच जवळच्या तीनचार कावड्या तुरुतुरू धांवत आल्या—त्यांनीं त्या अन्नावर आपला हक्क सांगतांच बिचारे कावळे तेथून दूर झाले.

तोंच मागून दोन कोंबडे मोठ्या ऐटींनें टरारत आले. त्यांनीं सरळ त्या चारीही सौभाग्यवतींना हांकून देऊन आपला पुरुषी हक्क प्रस्थापित केला. नि त्या अन्नावर चोंची मारून मध्येंच वर पहात त्यांनीं आपल्या पोटाचा उद्योग आरंभला.

त्याच क्षणीं लांबवर असून, त्या गृहिणीच्या हांकेचा माग काढीत धांवत येणाऱ्या एका कुत्र्याची झेंप त्या अन्नावर पडली. बिचारे कोंबडे आपले लाललाल तुरे नमवीत, फडफडतच दूर झाले.

पण त्या कुत्र्यानें एकाद जीभभर अन्न गट्ट केलें असेल नसेल...

तिकडून एक भिकारी लगबगीनें त्या अन्नछत्राकडे येतांना मला दिसला. त्यानें त्या कुत्र्याच्या पेकाटांत लाथ मारून त्याला सर्वांबरोबर तेथून हुसकून लावला. पण एवढ्या प्राण्यांच्या उड्या त्या अन्नावर पडल्या-मुळें तें रस्त्यावर पसरलें गेलें होतें— नि तेथील धुळींत विराजमान झालें होतें. एक क्षण तो थबकला.

त्या भिकाऱ्यानें आजूबाजूला पाहिलें—मी त्याला दिसूं नये म्हणून जरा बाजूला सरकलों.

दुसऱ्याक्षणीं त्यानें तें अन्न झटदिशीं जमवून आपल्या लक्तरांत बांधलें—

नि जणूं काय कांहींच घडलें नाहीं अशा चर्येनें तो चालूं लागला—नि...त्यानें

" ओ बाSSSय् ! भिकाऱ्याला वाइंच अन्न घाल. "

अशी दीनवाणी ललकारी दिली !

★ ★

## ६ अल्ला–हो–अकबर !

लेः—श्री. चं. वि. बावडेकर ( मुंबई )

खिलाफतीच्या चळवळींतले ते दिवस होते.

शहरांतल्या कांहीं मिश्र पुढाऱ्यांचें, म्हणजे काँग्रेसवाल्या हिंदूंचे आणि खिलाफतवाल्या मुसलमानांचे पाय त्या निमित्तानें कोंकणांतल्या आमच्या खेड्याला लागले.

गांवच्या चव्हाट्यावर त्यांची मोटार थांबली. तासभर त्यांनीं तिथें व्याख्यान दिलें आणि व्याख्यान संपतांच भर्रकन् त्यांची मोटार पुढच्या मुक्कामाला निघून गेली.

पण त्यांच्या त्या तासाभराच्या व्याख्यानानें आमच्या निद्रित खेड्यांत प्रचंड जागृति घडवून आणली. " टिळक महाराजकी जय " हा त्यावेळपर्यंतचा सार्वजनिक प्रसंगाचा घोष लुप्त होऊन त्याची जागा " अल्ला–हु–अकबर " या घोषानें पटकावली आणि गांवांतल्या मुसलमान वाड्यांत हिंदी राजकारणाबद्दल भलतीच आस्था आणि आत्मीयता निर्माण झाली.

महामूद शिंप्यानें आपल्या वाड्यांत वर्गणी गोळा करून मुंबईहून एक उर्दू पत्र सुरू केलें.

—पण कोणालाच तें वाचतां येत नसल्यानें त्याचे अंक फक्त फोडले जाऊन ते तसेच घरच्या घरीं साचूं लागले.

त्या रद्दीकडे एक दिवशीं भाविकपणें पहात असतां म्हामूदच्या मनांत अचानक एक विचार चमकून गेला. " बस्स ठरलें. चालू सालापासून

आपल्या या गांवांत ताबूत सुरू करायचा. कांहींतरी चळवळ पाहिजे. स्वस्थ राहून उपयोगी नाहीं. "

इस्माइल ताशेवाला आणि हुसेन खाटिक यांचा त्यानें विचार घेतला. ही कल्पना त्यांना मान्य झाली. इतरांनीं माना हालविल्या आणि मुसलमान वाड्यांतलीं पोरें खूष होऊन त्यानंतर दोनचार दिवसांनीं ओरडूं लागलीं, "आमच्या गांवांत ताबूत. आमच्या दादाचा ताबूत."

जिल्हेद जाऊन मोहरम जवळ येऊं लागला. पांच कोसांवर असलेल्या तालुक्याच्या गांवीं ताबूत बांधण्यांत कुशल असलेल्या चांद साहेबाला म्हामूद शिंप्यानें मोठ्या सन्मानानें मुद्दाम बोलावून आणिलें. आणि त्याच्या खास देखरेखीखालीं ताबुताचें काम सुरू झालें.

रोज शाळा सुटल्यावर आम्ही विद्यार्थी मुसलमान वाड्यांत जाऊन म्हामूद शिंप्याच्या मांगरांत तयार होणारा ताबूत मोठ्या कुतूहलानें पाहूं लागलों.

ताबुताच्या कामट्या हळुहळु अदृश्य होऊन त्यावर कागद चढले, चित्रविचित्र रंगाच्या कागदांनीं नंतर ती रद्दी झांकून जाऊं लागली आणि शेवटीं वर्खी कागदांनीं तो चकाकूं लागला. ताबुताचा डौलदार घुमट आणि चारी बाजूचे मिनार दृष्ट लागण्याएवढे सुंदर वाटले आम्हांला.

ताबुताची रीतसर स्थापना झाली. जळणाऱ्या उदानें वातावरण धुंद झालें. नऊ दिवसांनीं तो उचलला गेला. आणि थंडा करण्यासाठीं त्याची मिरवणुक आम्हां बालगोपालांच्या मेळ्यांत रस्त्यानें जाऊं लागली.

पण मिरवणूक ग्रामदेवाच्या देवळासमोर येतांच अग्रभागीं चालणारा हुसेन खाटीक एकदम थबकून उभा राहिला. " म्हामूद, म्हामूद, ए इस्मैल " त्यानें हांक मारली. मिरवणुकीला थांबण्याचा इषारा दिला. म्हामूद इस्माइल आणि हुसेन यांनीं सचिंत चेहऱ्यानें आपआपसांत कांहीं खलबत केलें. लगेच हुसेननें आमच्यांपैकीं एका विद्यार्थ्याला देवळांत पिटाळलें आणि नाना गांवकराला बोलावून आणायला सांगितलें.

म्हातारा नाना गांवकर थोड्या वेळानें काठी टेकीत टेकीत रस्त्यावर आला. " काय रे हुसेन, गडबड कसली ? " त्यानें विचारलें.

" काय नाय नाना, " हुसेन अजीजीच्या स्वरांत म्हणाला, " देवा

येतोबाक जरा गाराणां घालुचां असा. त्येका म्हणूंचां, देवा आमी ह्या लेकरांनीं ह्या नव्या काम घेतलांसा, त्येच्यावर तुजी कृपादिष्टि ठेव. हो व्या नाल ती स्वीकार.

नाना गांवकर हंसला. हुसेन, म्हामूद आणि इस्माइल यांना घेऊन तो सभामंडपाकडे गेला. बाहेर त्यांना उभे करून नारळ साखर घेऊन तो गाभाऱ्यांत शिरला. गुरवाला हांक मारून समईची मिणमिणती ज्योत त्यानें मोठी करविली आणि गाभाऱ्याच्या उंबरठ्यावर नारळ साखर एका तबकांत ठेवून वेतोबाला त्यानें गाऱ्हाणें घातलें, " देवा वेतोबा, आमच्या ह्या मुसलमान लोकांनीं यंदापासून हा ताबूत सुरू केला हा. ह्या काम तुजांच आसाल असां समजून तां गोड करून घे आणि तेंकां यश देवन् सुक्षमपणान् आपली सेवा दरसाल करून घे. हीं तुजींच लेकरां आसत. पाव बाबा वेतोबा. "

नानानें नारळ फोडला. तो तबकांत ठेवला, दोनचार फुलें गुरवाकडून मागून घेतलीं आणि तबक घेऊन तो बाहेर आला.

" ब्येस घातल्यात ना नाना गाराणां ? " म्हामूदनें विचारलें.

" होय, अगदीं चोख. " नाना म्हणाला.

" मग वाटा तर चिरागी ( खिरापत ). " इस्माइलनें सांगितलें.

फोडलेल्या नारळाची खिरापत करून नानानें ती सर्वांना वाटली. हुसेन, म्हामूद आणि इस्माइल यांना हायसें वाटलें. त्यांचे चेहरे प्रफुल्लित झाले. " चला तर आतां तळीकडे " ते म्हणाले आणि थांबवलेली मिरवणूक पुनः चालू लागली.

" अल्ला–हु–अकबर " या घोषांत ताबूत तळीकडे निघाला.

★ ★

## ७ सोय–?

लेः– 'शान्ताराम.' एम्. ए. ( नागपूर )

सगळा प्रकार अगोदरच माझ्या लक्षांत आला असता तर मीं त्याला अधिक शिक्षा जरूर दिली असती......

सरकारी दौऱ्यावरून मी परत येत होतों. मध्यंतरीं एका स्टेशनावर गाडी पाणी पिणार असल्यामुळें बरीच थांबली. मी डब्यांतून खालीं उतरून फलाटावर फेऱ्या घालूं लागलों.

रात्रीची वेळ. चांदणं अर्धवट झोपेंत होतं. वारा लालूच दाखवून पळून जात होता. वाटोळं करून चिलमेचे झुरके मारीत बसलेल्या चार गांवकऱ्यांचं बोलणं माझ्या कानांवर आलं.

" विशा, हा गांजा नको. तीनचार मासे अफू दे, भाऊ. "

" चार मासे अफू ! घडींत लंबा होशील, सख्या. "

" उपकार होतील ! रोजच्या मरणाहून उत्तम. दाणा नाहीं. कुटार नाहीं. आपून खावं का ढोरांस चारावं ? का पैका नाहीं, पटकूर नाहीं सरकारच्या मढ्यावर टाकावं ? का करल माणूस ? "

त्या भाषणामुळें माझं मन विरघळेल या भीतीनें मी लगेच डब्यांत येऊन बसलों. पीक रुपयांत आठ आणेसुद्धा नाहीं, बैलांच्या किंमती बेसुमार वाढलेल्या, चारा कमालीचा महाग, हें सगळं मला माहीत होतं. पण सरकारी कामासाठीं धान्य गोळा करणाऱ्या माझ्यासारख्या मुलकी अधिकाऱ्याला तिकडे लक्ष देऊन कसं चालेल ? शेतकऱ्यांच्या आक्रोशासाठीं ज्याचे कान जास्त जड तो उत्कृष्ट अमलदार. आणि समजा, शेतकऱ्यांची हलाखी मीं वरच्या अधिकाऱ्यांना सांगितली तरी उपयोग काय? सरकार शेतकऱ्यांपासून धान्य गोळा करणं बंद थोडंच करणार ? आणि वरच्या अधिकाऱ्यांच्यावरहि त्यांचे 'दादा' आहेतच कीं. सरकारला लढाईसाठीं धान्य हवंय व तें गोळा झालंच पाहिजे. आम्हांला तें केलंच पाहिजे. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी.

माझ्या मुख्य ठिकाणीं येतांच दौऱ्याचा वृत्तांत मीं माझ्या वरिष्ठाला म्हणजे तहसीलदाराला सांगितला.

" काय, फक्त वीसच खंडी गहू मिळाला ? फारच थोडा झाला हो ! चाळीस खंडी तरी आणायला हवा होता. काम कसून करा. बढती मिळाली पाहिजे ना ! "

"असं काम दाखवूं या सरकारला कीं पुढल्या वर्षीं तुम्ही तहसीलदार व

मी इ. ए. सी. झालोंच पाहिजे. त्या * * तहसिलींपेक्षां वरचा नंबर हवा आपला ! "

"उद्यां पुन्हा जाणार आहे मी दौऱ्यावर. पटवारी व कोतवालाला आजच इतल्ला देतों."

" छान ! जोरांत चालूं द्या काम. "

पंचक्रोशींतल्या एका खेड्यांत मी म्हणजे नायबसाहेब येणार ही बातमी पसरविण्यासाठीं मीं पटवाऱ्याला हुकूम पाठविला. संध्याकाळीं मी त्या खेड्याकडे निघणार तेवढ्यांत एक प्रक्षोभक बातमी आली. माझ्या येण्याची बातमी पसरविणाऱ्या कोतवालास त्या खेड्यांतील एका शेतकऱ्यानें चोपून काढलं होतं.

मॅजिस्ट्रेट म्हणून ती मारामारीची केस माझ्याचसमोर आली. खटला साफ होता. पुरावा तयार होता. सरकारी अधिकाऱ्याला तो कामावर असतांना मारण्याच्या आरोपावरून आरोपीला मीं सहा महिन्यांची शिक्षा फर्माविली.

शिक्षा ऐकून आरोपीच्या तोंडावर दुःखाची किंवा पश्चात्तापाची रेषासुद्धां उमटली नाहीं. उलट, उद्धटपणें शिवीगाळ करीत भर कोर्टांत तोंड वेडावीत तो बडबडला, " बस ? सहाच महिने ? एवढीच ताकद सरकारची ? "

कोर्टाचा अपमान करण्याचा दुसरा गुन्हा त्यानें केला. दुसऱ्या केसमध्यें त्याबद्दल त्याला आणखी एक महिना मीं ठोठावला.

पोलीस आरोपीला ओढून नेत असतां फरफटत माझ्याकडे येऊन तो मला विचारतो, " साहेब, ही लढाई कधीं संपेल ? "

मीं अधिकारांत उत्तर दिलं, " संपेल एक-दीड वर्षांत. तुला काय करायचंय ? "

मला ऐकूं येईल अशा आवाजांत तो उद्गारला, " त्या दिवशीं ठेसनवर लई आपुलकीनं ऐकत व्हतां आमच्या गोष्टी, साहेब. म्हणून बहु आशा होती या सख्याची कीं वर्स-दीडवर्स पोटापाण्याची सोय करून द्याल अशी, पर लई कमी महिने मिळाले. नशिबांत असल तेवढंच मिळतं बघा."

★ ★

## ८ विद्वान् साहित्यिक........

लेः—प्रो. रतनलाल शहा. एम्. ए.

तो एक चांगल्यापैकीं कवि होता. काव्याचा त्यानं सखोल अभ्यास केला होता. त्यांत त्याला प्रतिभेची जोड मिळाल्यानं त्याच्या हातून पुष्कळ उत्कृष्ट कवितांची निर्मिति झाली होती.

एकदां त्याची एका सुप्रसिद्ध साहित्यिकाची ओळख झाली. सदर साहित्यिकाच्या कवितेवरील टीकावाङ्मयांतून केशवसुत, चंद्रशेखर, तांबे, शेले, कीटस्, बायरन् इत्यादि मोठमोठाल्या पौर्वात्य तसंच पाश्चिमात्य कवींचीं नांवं गौरवानं विखुरलेलीं असून, त्यांचा सखोल अभ्यास करून आधुनिक कवींनीं आपली काव्यनिर्मिति करावी अशी सूचना केलेली असल्यानं कवीला वाटलं कीं, काव्याचा इतका दांडगा अभ्यास केलेल्या साहित्यिकाला आपण आपल्या कविता दाखवाव्यात; त्या त्यांच्या नजरेखालून घालाव्यात म्हणजे आपणास त्यांच्या तोंडून चार गौरवपर शब्द ऐकावयास मिळतील व आपला उत्साह वाढून आपल्या हातून अधिक जोमानं काव्यनिर्मिति होईल.

त्याप्रमाणें त्यानं आपल्या काव्याची वही त्या विद्वान् साहित्यिकास दिली नि ती यथावकाश वाचून आपला अभिप्राय व्यक्त करण्याची विनंती केली.

तेव्हां साहित्यिकांनीं त्यालाच दररोज एकाददुसरी कविता वाचून दाखविण्यास सांगितलं.

आणि तो त्याप्रमाणं वाचून दाखवूं लागलाही.

दोन चार दिवस झाले तरी साहित्यिक ऐकून घेण्यापलीकडे कांहीं बोलेनात असं पाहून त्यानं सहज विचारलं, " कशा काय वाटल्या माझ्या कविता ? "

" हं ! आहेत..." शब्द जेवढे ओढतां येतील तेवढे ओढण्याचा व सुदर्शन चूर्ण घेतल्याप्रमाणं कडू तोंड करण्याचा प्रयत्न करीत विद्वान् साहित्यिक म्हणाले, " प्रारंभ या दृष्टीनं कांहीं वाईट नाहीं. पण अजूनही काव्याच्या निरनिराळ्या अंगांविषयीं सखोल अभ्यास करावयास पाहिजे.

कीटस्, शेले, बायरन इत्यादि पाश्चात्य देशांतलि मोठमोठाल्या कवीं-बरोबरच तांबे, चंद्रशेखर इत्यादि आपल्याकडच्या कवींचाही......"

दर खेपेस तेच ते शब्द ! तेच ते वाक्यप्रयोग !

कवि चिडला. त्यानं विद्वान् साहित्यिकाकडून आपल्या काव्याविषयीं फाजील प्रशंसेची अपेक्षा केली नव्हती तरी त्याचा असा उपहास होईल असंही त्याला वाटलं नव्हतं.

तो कांहीं बोलला नाहीं. पण नेहमींप्रमाणं त्यानं त्या विद्वान् साहित्यिकाला एक कविता वाचून दाखविली असतां नेहमींप्रमाणंच त्यांनीं अगदीं ठराविक शब्दांत आपला अभिप्राय व्यक्त केला. कवि म्हणाला, "तांब्यांच्या कविता इतक्या चांगल्या आहेत असं तुम्हांला वाटतं ?"

"वाटतं म्हणजे काय ?" विद्वान् साहित्यिक उसळून नि म्हणूनच नीट उठून बसत म्हणाले, "प्रत्येकानं त्या पाठ करायला हव्यात. अभ्यासायला हव्यात असं मी म्हणतों......"

"मग तुम्ही त्यांच्याच कवितेला कां नांवं ठेवतां ?"

"नांवं ठेवतों ? तांब्यांच्या कवितेला मी नांवं ठेवतों ?" साहित्यिक खवळून म्हणाले, "काय बोलतां काय तुम्ही हें ? काव्यावरील टीकेचं माझं कोणतंही पुस्तक काढा त्यांत......"

"तें सारं ठीक आहे, लोकांना बनवायला, आपण जाडे विद्वान् असल्याचं त्यांना भासवायला......"

आतां मात्र साहित्यिकाचं पित्त खवळलं. ते चवताळून म्हणाले, "काय बोलतां आहांत तुम्हीं ?"

"खरं तेंच सांगतोय मी. तसं नसतं तर आतां मी वाचून दाखविलेली कविता तांब्यांचीच असतांना तुम्ही कशाला नेहमींच्या ठराविक शब्दांत तिची हजेरी घेतली असती ?"

विद्वान् साहित्यिकाच्या अंगास दरदरून घाम सुटला.

★ ★

# ९ पोटचा गोळा !

## प्रो. ना. अ. मावळणकर. एम्. ए.

“ किती गोड आहे माझा बाळ ! ”

हंसऱ्या अरुणचा पापा घेत शालिनी म्हणाली–“ लीला–! आतां तुलांही असंच एखादं बाळ होऊं दे बाई–”

मैत्रिणीचे हे शब्द ऐकून लीलानें फुरगुंटून आपले गाल फुगाविले. गंभीरपणाचा आव आणून ती म्हणाली “ शाले ! मला कितीकदां वाटतं कीं जगांत इतकं दुःख आहे, त्रास, अपमान, निराशा, रोग यांचं राज्य आहे कीं जन्माला आलेल्या जीवानं आपल्या आईबापांवर नुकसानभरपाईची फिर्यादच करावयाला हवी–कां घातलंत मला जन्माला म्हणून ! ”

शालन म्हणाली– “ बोल बाई ! खूप तत्त्वज्ञान बोल ! पण एकदां पोटचा गोळा जन्माला आला म्हणजे आईचं हृदय कसं असतं, आईचं प्रेम कसं असतं तें कळेल तुला. मग हे व्यवहाराचे विचार चट सारे विसरशील तूं–क्षणभर विसंबणार नाहींस तूं त्याला कुठें–अन् आतां मारे बाईसाहेब आमच्या अरुणला नांवं ठेवताहेत, अरुणच्या आईला नांवं ठेवताहेत–नारे छबड्या ऽ ”

म्हणून अरुणला झोलीत शालिनी त्याला आंत घेऊन गेली–आणि लीलाला मात्र विचारांच्या भोंवऱ्यात लोटून गेली.

शालन परत गेल्यावर मग लीला मुलांच्या घोळक्यांतच रमली. ती किंडर गार्टनच्या शाळेंत शिकवूं लागली. तेथें येणारा एक विद्रुप, निर्बुद्ध मुलगा पाहून मात्र तिच्या अंगावर कांटा उभा राही. कुठें अरुण–कुठें हा मुलगा ! मूल होणं ठीक, पण असा मुलगा झाला तर ? तिला लीलाचे शब्द आठवत–“ पोटचा गोळा जन्माला आला म्हणजे आईचं हृदय कसं असतं तें कळेल तुला. ’

अशा स्थितींतच एक वर्ष गेलं. पुढें मात्र लीलाला कळून आलं कीं आपण खरोखरच माता होणार आहोंत. अरुणसारखा राजबिंडा मुलगा

होईल आपल्याला—आपण त्याला छानछान कपडे घालून सगळीकडे मिरवूं !

पण—भवितव्यता आड आली—लीला अकालींच प्रसूत झाली आणि तिला मुलगा झाला तो किंडरगार्टनमधल्या विद्रुप मुलासारखाच ! डॉक्टर म्हणाले तो फार दिवस जगणारच नाहीं—हें ऐकून लीलाला वाईट वाटण्याऐवजीं बरंच वाटलं—एक मन कुठूनसं म्हणालं ? हेंच का आईचं हृदय ?

पण डॉक्टरांचं निदान चुकलं. वर्ष गेलं—दोन वर्षं गेलीं. तो विद्रुप मुलगा लोळागोळा होऊन नुसता पडून राही. तो बोलेना—चालेना—हंसेना !—आणि मरेनाही !

कोणी जवळ नाहीं हें पाहून लीला सारखी रडे. पतिच्या सांत्वनपर शब्दांनीं तिला अधिकच दुःख होई. सारे म्हणत—खरी आईची माया आहे. अशा मुलालाही किती जपते, किती संभाळते ! " शेवटीं तिनें कांहीं तरी निश्चय केला.—

लीला आणि तिचा पति हे उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासाला गेले—तेथील एका अनाथबालिकाश्रमांत ते या मुलाला गुपचूप सोडून परत आले.

घरीं परत आल्यावर शेजारणींसमोर लीलानें डोळ्यांना पदर लावला—' गेलाहो ! माझा बाळ अचानक सोडून गेला मला. दोन दिवस ताप आला अन् हं ! कसा कां असेना—माझा मुलगा होता तो—पोटचा गोळा—आईला काय वाटत असेल आपला मुलगा गेल्यावर ! "

—आणि शेजारणींनींही डोळ्यांना पदर लावून माना डोलावल्या—" खरंच बाई ! पोटचा गोळा—कसा असला तरी. "

★ ★

## १० घरची लक्ष्मी

लेः—सौ. यमुनाबाई भाटे बी. ए. बी. टी. ( पुणें )

" सोनें ६० रुपये तोळा "

वामनरावांनीं सकाळचें वर्तमानपत्र चाळतां चाळतां ताज्या बाजारभावाकडे पत्नीचें लक्ष ओढलें.

" असेना का मेलं, साठ कां आणखी सत्तर रुपये तोळा कां होईना, आपल्याला कुठें आतां सोनं घ्यायला जायचं आहे ?" भाजी चिरतां चिरतां स्वयंपाकघरांतून निर्मलाबाईंनीं आपला अभिप्राय दिला. " नशीबानं आपल्याला दोन मुलगेच आहेत. त्यांना थोडेच पोरींसारखे दागिने करून घालायचे आहेत ? सोनं आणखी महाग होऊन, त्याबदली ही भाजी थोडी स्वस्त झाली तर तोंडीं लावण्याची तरी सोय होईल. "

—पण वामनरावांच्या मनांत यावेळीं दुसरेच विचार चालू होते. त्यांना तरी कुठें सोनें स्वस्त व्हावेसें वाटत होतें ! उलट भाव चढेल तसतसें त्यांना एकापरीनें बरेंच वाटत होतें. सोन्याचा वाढता भाव ऐकून त्याच्या खरेदीच्या शक्याशक्यतेचा विचार निर्मलाबाईंच्या मनांत येत होता. उलट वामनरावांना तोच चढता भाव पाहून सोन्याच्या विक्रीचा विचार सुचत होता. त्यांच्या लग्नांत निर्मलाबाईंना बारा तोळ्यांचे गोट केले होते. असेल झालं फारफार तर तीस रुपयांनीं सोनं तेव्हां. आतां जर या चढत्या भावांत विकून टाकलें तर सातशें येतील त्यांचे. विनासायास दामदुप्पट होते आहे आणि नाहींतरी ते कुठें वापरांत आहेत ? रोज हातांत जड होतात म्हणून, नाहींतर उगीच का कामधामांत झिजवा म्हणून निर्मलाबाईंनीं त्यांना आजपर्यंत कड्याकुलपांतच सांभाळलें होतें. कधींतरी हळदीकुंकू किंवा अशाच कांहीं समारंभानिमित्त त्यांना सूर्यदर्शन होत होतें. तेच जर आतां विकले तर या ओढग्रस्तीच्या दिवसांत कांहीं मदत तरी होईल संसाराला. पण निर्मलाबाईंना हें कसें पटावें ? कसा काढावा हा विषय ? मांजराच्या गळ्यांत ... हे असेच कांहींसे विचार अलीकडे रोज सोन्याचा चढता भाव पाहून वामनरावांच्या मनांत येत असत. आज शेवटीं त्यांनीं एकदां बोलून टाकायचें ठरवलें.

" या चढत्या भावांत तुझे ते गोट विकले तर सहज सातशें येतील " वामनरावांनीं सुरवात केली. पण गोट विकण्याच्या कल्पनेचा प्रस्ताव केल्यावर निर्मलाबाई त्यांना पुढें बोलूं देणार होय ! "

" तुमचा कां माझ्या गोटांवर डोळा ! गळ्यांत कांहीं रोज घाल-ण्यासारखा एकादा पदर करावा म्हटलं तर कधीं झालं नाहीं तुमच्या

हातनं. नि उलट गोट मोडायच्या गोष्टी बोलतां ! मी मुळींच गोट देणार नाहीं. " निर्मलाबाईंनीं साफ सांगितलें.

" अग तूं तरी कुठें ते वापरते आहेस ! उगाच दगडाच्या मोलानें घरांत पडले आहेत. विकले तर दामदुप्पट होते आहे. या दिवसांत महागाईनें टेकीला आणलें आहे. जरा इकडे तिकडे सरकायला तरी वाव होईल. " वामनराव पुन्हां प्रयत्न करूं लागले.

" तें कांहीं नाहीं. महागाई झाली म्हणून काय झालं ! मी नाहीं घरांतली लक्ष्मी विकायला काढणार. लोक म्हणतात लक्ष्मी चंचल आहे. पण लोकच खरे चंचल आहेत. जरा फायदा होतोसा वाटला कीं नेली घरची लक्ष्मी बाजारांत. "

यापुढें वामनराव काय बोलणार !

यानंतर थोड्याच दिवसांनीं माहेरून आई आजारी असल्याचें एकाएकीं पत्र आल्यानें निर्मलाबाई प्रभा, विभा यांना घेऊन माहेरीं निघाल्या. बरोबर दोन मुलें, एकटीचा प्रवास आणि हे असले वाईट दिवस म्हणून त्यांनीं आपले अंगाखांद्यावरचे जिन्नस सर्व घरींच ठेवले. सर्व नीट संभाळण्यास पुन्हां पुन्हां बजावलें.

आईला बरें वाटतांच निर्मलाबाई पंधरा दिवसांतच परतल्या. परत आल्या दिवशीं वामनराव ऑफिसांत गेल्याबरोबर त्यांनीं कपाट उघडून आपले सर्व जिन्नस काढून पाहिले. गोट जिथल्या तिथं डब्यांत व्यवस्थित आहेत असें पाहून त्यांना समाधान वाटलें. केल्याला इतके दिवस झाले तरी गोट कसे अजून नव्यासारखे दिसत होते. 'त्याकडे पहातांना वामनराव आपल्याला वचकून आहेत बरं का ! पुन्हां कांहीं त्यांनीं गोट विकावयाची गोष्ट काढली नाहीं ! ' हा विचार निर्मलाबाईंच्या मनांत डोकावून त्यांना सुखवीत होता. ... ... अशींच आणखी तीन वर्षें निघून गेलीं.

संसाराची किती ओढाओढ चालली होती तें कां सांगतां येणार आहे !

कधीं संपणार, कधीं संपणार म्हणून मोठ्या आशेनें लोक लढाईच्या शेवटाची वाट पहात होते. एक दिवस लढाई सुद्धां संपली.

पण महागाई ! अंहं नांव नको तिच्या संपण्याचें. दर पुढला दिवस

मागल्याला बरा म्हणवीत होता. मध्यम वर्ग तर सगळीकडून कोंडल्या-सारखा झाला होता. निर्मलाबाई तर नुसत्या टेकीला आल्या होत्या. संसारांत एका माणसाची भर पडली होती. तान्ह्या सुमतीला संभाळून सर्व व्याप आवरतां आवरतां त्यांना नको जीव होत होता. कुठून तरी चार पैसे जास्त मिळतील तर बरें असें सारखें मनांत येई. त्यांत महागाईची तर चढती कमान होती. कोणीसं काल सांगत होतं सोनं म्हणे १०९ रु. तोळा झालं आहे. गोट विकावे असें आतां त्यांच्याच मनांत येऊं लागलें होतें. ' आतां हजारावर किंमत येईल त्यांची, बरं झालं आपण वामन-रावांना ते मागेंच विकूं दिले नाहींत. '

शेवटीं एक दिवस निर्मलाबाईंनींच वामनरावांना गोट विकण्यास आग्रहानें सांगितलें. पण आतां वामनरावांनाच तो विचार पसंत पडेना. " कशाला उगच मोडा तुझा दागिना ! पुन्हां या जन्मांत नवीन कांहीं करणं होणार नाहीं आपल्याला; शिवाय घरची लक्ष्मी तूं म्हणतेस त्या-प्रमाणं आणूंच नये बाजारांत. चणचण काय जाईल चार दिवसांनीं. " वामनरावांनीं अशा रीतीनें गोटाला हात लावण्याचें साफ नाकारलें.

दुसऱ्या दिवशीं वामनराव ऑफिसांत गेल्यावर निर्मलाबाईंच्या मनांत एक दुसरीच कल्पना आली. आज किती तरी दिवसांनीं त्यांनीं गोट हातांत घातले. त्यांकडे पाहून त्यांचें मन परस्परविरोधी विचारांनीं भरून आलें. प्रभा, विभा शाळेंत गेले होते. छोट्या सुमतीला घेऊन त्या बांहेर पडल्या. त्यांच्या नेहमींच्या सराफाकडे जाऊन त्यांनीं ते गोट विकण्यास सांगितलें. शेटजी गोट हातांत घेऊन त्यांकडे पहातच राहिले.

" बाईसाहेब, हे तर रोल्डगोल्डचे गोट ! हे विकून काय करणार ? "

त्यांनीं उलट विचारलें.

" रोल्डगोल्डचे कसे असतील ? कांहीं तरीच काय बोलतां ? दहा वर्षांखालीं तुमच्याकडूनच नाहीं का हे घडवले ? फारसे वापरले देखील नाहींत. अजून कसे नव्यासारखे दिसताहेत. " निर्मलाबाई जरा रागां-तच म्हणाल्या.

" पण बाईसाहेब, ते तुमच्या लग्नांतले गोट वामनरावांनीं कधींच

विकले आमच्याकडे. झालीं असतील तीन वर्षं तरी त्याला, त्यांनाच विचारा कीं. ”

... आणि निर्मलाबाईंना गर्कन् सारें जग आपल्याभोंवतीं फिरूं लागल्यासारखें वाटूं लागलें ! ! !

★ ★

## ११ दिवटी आणि तारका

लेः—प्रो. श्री. वि. गंधे, एम्. ए. डी. पी. ई. एस्. टी. सी..
(वाशीम—वऱ्हाड)

सूर्य केव्हांच मावळून गेला होता—अमावास्येच्या आकाशांत लाख चांदण्या जमल्या होत्या. रघुवीरच्या मनांत मात्र चांदण्यांशिवायचा अंधारच पसरला होता.

किती तरी वेळ झाला. दोन फोटो पुढें ठेवून तो विचार करीत बसला होता. एका फोटोखालीं तारा देसाई, एम्. ए. असें नांव होतें. सोनेरी चष्मा लावलेले तिचे तेजस्वी डोळे, गौर वर्ण, उंच शेलाटीसारखी देहयष्टि यांवरून त्याची नजर हलत नव्हती.

दुसरा फोटो दीप्ति दीक्षित हिचा होता. अल्पशिक्षित, स्वरूपानें जरा सामान्य, चार भावंडांचा संसार संभाळून आईला मदत करणारी ही मुलगी त्याच्या नजरेंत भरत नव्हती.

या फोटोजवळच एक पत्र पडलें होतें.

रघुनाथ शून्यपणें आपल्या भावी आयुष्याबद्दल विचार करीत बसला होता. तो खिडकींतून बाहेर पाहून म्हणाला—“हंऽ ! कुठें ती तारका अन् ही दीप्ति—दिवटी—समई ! कुठें देवता, कुठें दासी ! तारकेनें नकाराचं पत्र पाठविलं—उलट ही दीप्ति चारदां सांगून पायां पडत आली तिच्या आईतर्फे ! काय करूं—काय न करूं ! तारेचा प्रकाश डोळ्यांत भरल्यावर कोण या दिवटीवर भाळणार ! ”

रघुनाथची नजर आकाशांतल्या एका तेजस्वी तारकेवर खिळली. चम्‌चम् करून तिच्या प्रकाशाच्या शलाका चहूं बाजूला पसरत होत्या.

पण पहातां पहातां आकाशांत ढग जमूं लागले—घनगर्जना होऊं लागल्या—विजा लख्लख् चमचम करूं लागल्या.

रघुनाथच्या नजरेसमोर असलेली तारा अदृश्य झाली. सगळीकडे किर्र अंधार पसरला होता...रघुनाथच्या खोलींतली मंद दिवटी मात्र तशांतही आपलें मंद, शांत तेज पसरीत होती.

रघुनाथनें आपली डायरी काढली. उद्यां करायच्या कामाची टेहळणी करून ठेवली—आजच डायरींत तो आपला निश्चय नमूद करून ठेवणार होता.

## तारका देसाई
### दीप्ति दीक्षित

पुन्हां त्याची नजर त्या दोन फोटोंवरून फिरली. बाहेरून कड—कड—कड करीत विजेची गर्जना घुमली—मुसळधार पर्जन्याच्या धारांनीं धरित्री न्हाऊन निघाली.

तारकेचा आकाशांत कुठेंच पत्ता नव्हता.

एकाएकीं रघुनाथच्या डोक्यांत एक विचार त्या विजेसारखाच चम-कून गेला.

दिखाऊ सौंदर्य हें तारकेसारखं आहे. निरभ्र जीवनांत तें आकर्षक, आल्हादक, सौख्यकर, अभिमानपूर्वक स्वामित्वानें मिरवावें असें. पण आपत्तींच्या घनगर्जनांत, झंझावातांत असलं नाजूक सौंदर्य केव्हांच लुप्त होऊन कुठल्याकुठें नजरेआड जातं—दुरून बघायला ठीक—पण तिच्या तेजांत कोणाला जीवनाचीं प्रमेयं उकलतां आलीं आहेत ? ध्येयाचे कष्ट करतां आले आहेत ?

—जमिनीवरची, टीचभर वातीची, चमचाभर तेजाची दिवटी... पण हव्या त्या वादळाला तोंड देऊन संसारांत मांगल्याचा—समाधानाचा प्रकाश पसरविते. आपण जळून दुसऱ्याचे कष्ट हलके करते—आपण विस-रली जाऊन दुसऱ्याला कार्याला लावते...

ध्येयवादी, कष्टाळू जीवाला, निरुपयोगी शोभेपेक्षां जीवनासाठीं झट-णारी, कष्टाळू सहचरीच अधिक हितकर—

रघुवीरनें टांक उचलला आणि दीप्ति दीक्षितच्या आईला रुकाराचें पत्र तो लिहूं लागला.

★ ★

## १२ माया

लेo:—श्री. महाबळेश्वर सरदेसाई ( मुंबई )

सारा दिवस काम करून कंटाळल्यामुळें घटकाभर मोकळ्या वातावर-णांत जाऊन बसावें नि सूर्यास्ताचें मनोहर दृश्य पाहून मनाला रिझवावें म्हणून चर्निरोड ब्रिजवरून मी चौपाटीवर गेलों नि मरिन ड्राइव्हच्या कांठा-वर थोडीशी मोकळी जागा पाहून तेथें बसलों. सूर्य अजून समुद्राच्या हातभर वर होता. रस्त्यांतून टॅक्सी नि व्हिक्टोरिया सारख्या धांवत होत्या. फूटपाथवरून माणसांची वर्दळही सारखी चालूच होती.

मीं बाजूला पाहिलें. जवळच एक तरुण बाई एका सुंदर नि गोंडस चेहऱ्याच्या लहानग्या मुलाचा हात पकडून त्याच्या लीलांच्या कौतुकपूर्ण निरीक्षणांत मग्न होऊन राहिली होती. माझ्याकडे तिची नजर वळतांच ती थोडीशी संकोचली. तथापि किंचित् तिरपी बसून तिनें आपला चाळा तसाच चालूं ठेवला.

त्या मुलाला पाहिल्यावर मला एकदम मायेचें भरतें आलें. माझा मुलगा देखील त्या मुलाच्याच वयाचा नि थोडासा त्याच्याच तोंडवळ्याचा आहे. त्यामुळें त्याला जवळ घ्यावें, हृदयाशीं धरावें, त्याचे गालगुचे घ्यावे अशी अनिवार इच्छा माझ्या मनांत उद्दीपित झाली. पण तसें केलें तर त्या बाईला कदाचित् तें आवडणार नाहीं, अशी शंका आल्यामुळें मीं गप्प बसलों.

मला गांवाहून येऊन पांच सहा महिने झाले होते. मुंबईत बिऱ्हाडाला जागा मिळत नसल्यानें मी एकटाच दिवस कंठीत होतों. अजूनही मनाला

समाधान नव्हतें. थोडासा मोकळेपणा मिळाला कीं तें घराकडे धांव घेऊं लागे. मुलांच्या मूर्ति चित्तचक्षूंसमोर उभ्या करी नि एकदम उदास बनून राही. यामुळे कुठें मुलें दिसलीं कीं जीव अगदीं अस्वस्थ बनून जात असे. —दरिद्री जीवनांत कामानें मन मारून मी गुलामासारखा जगत होतों.

बोलवावें का त्या मुलाला जवळ ! येईल का तो बोलावलें तर ! मनांत असा विचार घोळतो आहे, इतक्यांत त्या बाजूनें एक पिपाणी-वाला पिपाणी वाजवीत येऊं लागला. पिपाणीचा आवाज कानीं पड-तांच त्या मुलाचें लक्ष तिकडे वेधलें नि तो वारें प्यालेल्या वांसरासारखा कान टवकारून पिपाणीवाल्याकडे बघूं लागला.

पिपाणीवाला जवळ पोंचला तसा तो लडिवाळपणें म्हणाला,

" आई, मला पिपाणी हवी. "

" नको बाळ, तुला ती वाजवतां यायची नाहीं. "

" येईल न. घेऊन दे ना मला ! "

" असा हट्ट काय करतोस रे ! तुला वाजवतां यायची नाहीं म्हटलें ना ! "

" मी वाजवून बघतों तरी ! "

हें बोलणें पिपाणीवाल्याच्या कानीं पडल्यानें तो आवाज करीत तेथेंच घोटाळूं लागला. तिनें तिरस्कारानें त्याजकडे पाहिलें. त्यानें तेथून निघून जावें असा तिच्या कटाक्षाचा आशय होता. पण तो कांहीं दूर झाला नाहीं.

मुलगा ऐकत नाहीं असें पाहिल्यावर ती मनस्वी चिडली नि पिपाणी-वाल्यावरचा राग तिनें बिचाऱ्या मुलावर काढला. त्याच्या गालाला एक जोराचा चिमटा घेत ती उद्गारली,

" सांगितलेलें ऐकायचं नाहीं ! वेड्यासारखा हट्ट करायचा ! वाटे-वरच्या पोरासारखा का पिपाणी वाजवणार आहेस तूं ! चल घरीं जाऊं"—असें म्हणून खस्‌कन् त्याच्या हाताला हिसका देत ती उभी राहिली.

माझ्या डोळ्यांत टचकन् पाणी तरारलें.

" इकडे ये बाळ, मी देतों तुला पिपाणी. "—मी घोगऱ्या आवाजांत चटकन् बोलून गेलों.

त्या बाईनें टवकारून मजकडे पाहिलें. पण तितक्यांतच तिच्या हातां-तून सुटका करून घेऊन तो धांवतच मजजवळ आला नि मला बिलगला. मोठ्या प्रयासानें त्यानें आपला हुंदका दाबला होता. पण त्याचे गालां-वरून आंसवें ओघळत होतीं. मी त्याला उचललें नि हृदयाशीं घट्ट धरलें. असीम आनंदानें माझें मन फुलून गेलें. मनाला शांत शांत वाटलें.

ती बाई मान खालीं घालून उभी होती.

तो पिपाणीवाला पिपाणी खपेल म्हणून आशेनें उभा होता.

मीं खिशांत हात घातला. अन्...—सगळे खिसे चांचपून एक दिड-कीही हाताला लागली नाहीं !

—दारिद्र्याची खरी होरपळ म्हणजे काय तें मला त्या क्षणांतच कळून आलें !

★ ★

## १३ भावनावशता !

लेः—गोपाल. वि. वैद्य एम्. ए. ( पुणें. )

किती हृदयद्रावक प्रसंग होता तो ! केवळ संशय ! आणि तेवढ्या-वरून तो निर्दय नरपशु आपल्या धर्मपत्नीला घराबाहेर हाकलून लावीत होता. किती परोपरीनें ती स्वतःच्या पावित्र्याची खात्री पटवून देत होती ! पण इलाज नव्हता. जोरानें तिला तो ढकलीत होता; मधून-मधून लत्ताप्रहारही करीत होता. ती ढसढसा रडत होती—आक्रोश करीत होती.

" चल नीच घराबाहेर. हो चालती आत्ताचे आत्ता. " तो क्रूरपणें तिच्या अंगावर खेकसला. मृत सासऱ्याकडून मिळालेल्या पैक्याचा तो एकटाच मालक अशीच त्याची समजूत होती !

" कुठें जाऊं ? तुम्हीच सांगा. " दीन व आर्त स्वरांत ती अभा-गिनी स्फुंदत स्फुंदत म्हणाली. त्यानें पोराला हिसकलें व तो आंत जाऊं लागला.पोराला घेण्यासाठीं ती त्याच्याशीं लगट करूं लागली. त्या बिचाऱ्या

पोराचें मात्र या ओढाताणीमुळें मधल्यामधें नसते हाल होत होते. त्याच्यावर फक्त आपलीच मालकी अशीच त्याची समजूत होती !

त्यानें तिला जोरांत लाथ मारली. ती एकदम खालीं पडली. तो पोराला घेऊन एकदम आंत निघून गेला. खाडकन् त्यानें दार लावून घेतलें. प्रत्यक्ष यमच तो दिसत होता. त्याच्या दगडी हृदयाला पाझर देखील फुटला नाहीं !

तिच्या नयनद्वयांतून एकसारख्या अश्रुधारा वाहात होत्या.

" किती कापूर भरला आहे डोळ्यांत ! " चित्रमंदिराच्या कोपऱ्यांतून एक भामटा ओरडला.

तिचीं कानशिलें लाल झालीं होतीं. डोळे सुजून आल्यासारखे दिसत होते. उरोभाग खालींवर होत होता. अंगावरील वस्त्राचें ती भानही विसरली होती. पराजित मुखानें तिनें वर पाहिलें तों दार लावलेलें ! कपाळावर हात मारून घेऊन ती पुन्हां आक्रोश करूं लागली. तत्काळ तिला मूर्च्छा आली.

पडद्यावर त्यानंतर दुसरा देखावा आला व मी भानावर आलों. गेलीं दोनतीन मिनिटें श्वास न घेतां मी निःस्तब्ध होतों हें एकदम घेतलेल्या श्वासांवरून माझ्या लक्षांत आलें. नकळत माझ्या डोळ्यांतून अश्रू येत होते व सदऱ्यावर पडत होते. डोळे पुसून माझा हातरुमाल ओलाचिंब झाला होता. फारच परिणाम झाला होता एकंदरींत माझ्या मनावर. मी विचार करूं लागलों. अरेरे ! असे किती अन्याय घडत असतील जगांत हरघडीं ! पडद्यावर मीं सत्यसृष्टीच पाहिली.

माझ्या पुढच्या रांगेंत कोणीतरी कुजबुजूं लागलें, त्याकडे माझें लक्ष गेलें. " आहेना युरोपिअन् नटीसारखा अभिनय ? साधलं कीं नाहीं अगदीं नॅचरल् ? " कोणातरी स्त्रीचा आवाज असावा तो. व अभिप्रायार्थ विचारलेले असावेत वरील प्रश्न.

"Oh ! extremely artistic and effective" तिला चिकटून बसलेल्या गृहस्थाचे ते उद्गार होते. ते दोघेही मग खदखदून हंसले; व आपले रेन्कोट्स् घेऊन उठले. मला अचंबाच वाटला ! पण इतक्यांत

दिव्यांचा लख्ख प्रकाश पडला. खेळ खलास झाला हें मी उमजलों. त्या दोघांकडे मी जरा बारकाईनें निरखून पाहिलें. आणि पाहातों तों काय ! पडद्यावर काम करणारा तो नट व ती नटीच होती हें मीं तत्काळ ओळखलें ! आपलें काम कसें काय वठलें आहे व त्याबद्दल लोकमत काय आहे किंवा प्रेक्षकावर काय परिणाम होतो हें पाहाण्यासाठीं स्वतःच आले झालं ते रंगेल प्राणी !

" Congrats " असें म्हणून त्या नटानें तिच्याशीं हस्तांदोलन केलें व तें दोघे एकदम चालूं लागले. चित्रमंदिराप्रमाणें माझ्याही हृदयांत आतां चक्क प्रकाश पडला. तरी पण ' त्या पतितेचें पुढें काय झालें असेल ? ' हा प्रश्न मात्र माझ्या डोक्यांतून मावळेना.

शेजारीं बसलेला माझा मित्र गदगदां हालवून मला म्हणाला—"फारच भावनाप्रधान तूं बुवा. अरे, हें खरं कां असतं ? आणि हें रे काय ! रडलास वाटतं ट्रॅजेडीचा तो शेवटचा सीन पाहून ? " माझं लक्षच नव्हतं त्याच्या प्रश्नांच्या सरबत्तीकडे. तो नट व ती नटी एका छोट्या मोटारींत बसून भुरकन् निघून गेल्याचें मीं पाहिलें. माझ्या छातीवर नकळत माझा हात गेला. ठोके मात्र जलद पडत होते.

★ ★

## १४ दोन लाडू आणि एक करंजी

लेः श्री. र. गो. सरदेसाई ( मुंबई ).

किती लहान होतं तें त्यांचं जग ! त्या जगाचा ब्रह्मदेव बुरूड होता. त्यानं तयार केलेल्या त्या चिमकुल्या दुरडींत ते सारे जीव कोंबलेले होते.

मुंबईतील मध्यवस्तींतील एखाद्या जुनाट चाळीसारखीच त्या दुरडीची अवस्था होती; आणि चाळींतील गरीब स्थितींतील बिन्हाडकरूसारखी त्या दुरडींतील रहिवाशांचीहि हुबेहूब स्थिति होती.

किती बुजबुजाट होता तेवढ्या छोट्या जगांत; पण तरीहि सारीजणं कशीं गुण्यागोविंदानं नांदत होतीं.

त्यांतली ती फुगीर लालसर गालांची करंजी पाहाणाऱ्याच्या कशी चटकन् नजरेंत भरे. जो तो तिच्या मुसमुसलेल्या सौंदर्यानें भारला जाई आणि तिच्याकडे पहातच राही.

त्या दुरडीच्या चिमुकल्या चाळींत तिनें नुसतें वादळ उठवून दिलें होतें.

ती तिथं येऊन राहीपर्यंत फत्ताड्या चकलीलाच त्या चिमुकल्या जगांतील सौंदर्यसम्राज्ञीचा मान मिळत होता. पण फुगीर गालांच्या लालसर करंजीच्या आगमनानें चकलीचें तेथून उच्चाटण होऊन करंजीचा बहुमान सुरू झाला.

जो तो तिची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न करूं लागला. आणि त्यामुळें आतांपर्यंतच्या त्या शांततेच्या जगांत थोडी धुसफूस नि कुरकूर ऐकूं येऊं लागली.

कांहीं दिवसांनीं त्या छोट्या चाळीला एक लहानसा भूकंपाचा धक्का बसला. अनरशानें चकलीच्या कानांत हळूच सांगितलें कीं—

‘ अलीकडं करंजी आणि रव्याचा लाडू यांची बरीच दोस्ती जमली आहे. ’

चकलीनें या बातमीचा सगळीकडे प्रसार केला. प्रसार करतांना मूळच्या बातमीला आपल्या जवळच्या तिखटाची जोड देण्याला ती विसरली नाहीं. करंजी त्या चाळींत राहायला येण्यापूर्वी चकलीचें असलेलें महत्त्व नाहींचें होण्याचें कारण चकली विसरली नव्हती. करंजी-बद्दल तिच्या मनांत असूया असणें साहाजिक होतें.

तिला करंजीचा सूड उगविण्याची संधि आयतीच मिळाली.

चाळगुंड अनरशानें पुरविलेल्या माहितींत मसाला घालून चकलीनें जिकडे तिकडे गर्जना केली—

‘ तरी मी सांगत नव्हतें, या सटवीचें लक्षणच खोटं म्हणून ? पण सारे मेले तिच्या गोऱ्या रूपाला भाळले नि लागले तिच्या नादीं. ही करंजी एक दिवस त्या रव्याच्या लाडूचा हात धरून आमच्या चाळींतून नाहीं पळून गेली तर मी नांवची चकलीच नव्हे ! ’

चकलीच्या वेळीं अवेळीं चालणाऱ्या या गर्जनेनें साऱ्यांचें लक्ष करंजी नि तो रव्याचा लाडू यांजकडेच लागून राहिलें.

करंजी आणि रव्याचा लाडू यांच्या बारीकसारीक हालचालींचीहि चित्रगुप्ताच्या दक्षतेनें नोंद केली जाऊं लागली.

' काय तरी निर्लज्जपणा हा ! खुश्शाल एकमेकांकडे टक लावून तास न् तास पहात बसतात कीं हो दोघेंजण ! '

' अहो, यापुढं प्रकरणं गेलंय् ! आजच मीं पाहिलं, तो लाडू लेकाचा खुशाल तिला चिकटून बसला होता. बोला आतां ! '

' बाई, बाई, हद्द झाली हं या फटाकड्या करंजीपुढं ! '

अशा प्रकारचे आपटबार व सुरनळे त्या चाळींत वारंवार आवाज काढूं लागले आणि त्यामुळें चाळींत मोठीच खळबळ माजून राहिली.

खुद्द करंजी आणि रव्याचा लाडू यांना या प्रकाराची फारशी कल्पना नव्हती. आपणाला पाहून अशी चोरटी कुजबुज व सूचक नेत्रसंकेत कां चालवित हेंच त्यांना एक कोडें होतें. पण त्यांचें सारें चित्त त्याहून महत्त्वाचें असें दुसरेंच एक कोडें सोडविण्यांत गुंतलें होतें ! म्हणून त्यांनीं या प्रकाराकडे फारसें लक्षच दिलें नाहीं.

करंजीचें मन सदा रव्याच्या लाडूविषयीं विचार करण्यांतच दंग असे, नि रव्याच्या लाडूला करंजीवांचून दुसरें तिसरें कांहीं सुचत नव्हतें.

पहिल्याच दृष्टिक्षेपांत दोघांचें न कळतच एकमेकांकडे आकर्षण झालें होतें. आणि एकसारखे एकमेकांकडे विशिष्ट नजरेनं पाहात राहिल्यामुळें दोघांनाहीं एकमेकांच्या सौंदर्याचा मोह पडत गेला होता.

करंजीला वाटे, सहचर असावा तर रव्याच्या लाडूसारखा गोड नि गोरा ! आपल्या जोडीला किती पण सुरेख दिसेल तो.

रव्याच्या लाडूला वाटे, करंजीशिवाय सारं जग व्यर्थ आहे. बहिरंग मोहक नि अंतरंग त्याहून गोड ! बस्स्, सहचरी असावी तर अशीच सुंदर नि मधुर !

या भावनेंतूनच प्रेम कीं काय म्हणतात त्याचा जन्म आपल्या मनांत झाला असावा असें दोघांनाही मनोमन वाटूं लागलें.

आणि मग कसल्या तरी नव्याच प्रवृत्तीचा उदय दोघांना आपल्या स्वभावांत झाल्याचा भास होऊं लागला.

रव्याचा लाडू दिसला कीं करंजीचे फुगीर लालसर गाल जास्तच आरक्त होऊं लागले.

आणि करंजीचा ओझरता जरी स्पर्श झाला तरी रव्याचा लाडू आनंदानें थरथरूं लागे नुसता.

एकमेकांकडे आशेनें पहाण्यांत त्यांचें देहभान विसरून जाई.

चाळींत कोणत्याही कारणानें गडबड माजून उलथापालथ झाली कीं हळूच तीं दोघें एकमेकांकडे सरकण्याचा प्रयत्न करीत व एकत्र येण्याचा योग लाभतांच आनंदून जात.

याच त्यांच्या चालीनें साऱ्या चाळींत त्या दोघांच्याबद्दल चोरटी कुजबूज नि सूचक नेत्रसंकेत सुरू केले होते.

करंजी नि रव्याचा लाडू यांना तर तिकडे लक्ष देण्यासही आतां फुरसत नव्हती. एकमेकांचें गोड कूजन ऐकण्यांत रमणाऱ्यांना इतरांची कुजबूज कुठली ऐकायला यायला ?

रव्याच्या लाडूची दृष्टि भावी सुखस्वप्नें पाहाण्यांत दंग झाली होती नि करंजी नवीं नवीं मनोराज्यें रचीत होती.

त्या समाधींतून एके दिवशीं करंजीला अचानक जागृति आली.

तिला कोणाचा तरी धक्का लागला म्हणून तिनें पाहिलें.

क्षणभर ती गोंधळली.

आपणाशीं अशी लगट करणारी ही वल्ली दिसते तर आपल्या रव्याच्या लाडूसारखी. पण रव्याचा लाडू नव्हे खास !

तिनें लक्षपूर्वक पाहाण्यास सुरवात केली.

बाकी सर्व बाबतींत या नव्या प्राण्याचें तिच्या प्रियकर रव्याच्या लाडूशीं साम्य असल्याचें तिला दिसून आलें. एक बाब मात्र निराळी होती.

त्याची अंगकांति रव्याच्या लाडूहून किती वेगळी दिसत होती पण—!

करंजी नुसती पहातच राहिली.

त्याची ती सुवर्णकांति तिला मोठी गमतीची वाटली. आणि तिची नजर तेथेंच वारंवार खिळूं लागली.

तिला कळेना–आपल्याला असें कां होतें तें. पण तिचे डोळे त्या सुवर्णकांतीनें दिपल्यासारखे झाले होते खरे !

तिनें हळूच आजूबाजूच्या मंडळींकडून काढली बातमी कीं, या नव्या चल्लीचें नांव बेसन लाडू असून आपल्या चाळींत तो नव्यानेंच रहावयास आला आहे.

हें कळल्यावर करंजीच्या मनांतून बेसन लाडूचा विचार कांहीं केल्या जाईचना ! तिच्या मनाला त्याच्या त्या तकाकणाऱ्या मोहक सुवर्ण-कांतीचा मोह आवरतां आवरेना !

तिच्या मनांत द्वंद्व चालू झालें.

बेसन लाडू आणि रव्याचा लाडू यांची तुलना तिच्या मनांत जस-जशी जास्त जास्त येत गेली तसतशी रव्याच्या लाडूपेक्षां बेसन लाडू सर्व-प्रकारें सरस असल्याची तिच्या मनाची खात्री होत गेली.

बेसन लाडूच्या सुवर्णकांतीनें करंजी झपाटल्यासारखी झाली होती.

बिचाऱ्या रव्याच्या लाडूला करंजीच्या या मनोवृत्तींतील पालटाचें कांहींच ज्ञान नसल्यानें तो विचारांत पडे, कीं करंजी हल्लीं आपणाशीं तुटक तुटक कां वागते ? तिच्या मनांतील दुःख निवारण करण्यास तो तयार होता, पण तिच्या दुःखाचें स्वरूपच मुळीं त्याला कळेना.

त्यानें आपल्याकडून खूप यत्न चालविला तिची मनधरणी करण्याचा. पण पूर्वीं त्याच्या ज्या शब्दांनीं करंजीला अतिशय सुखविलें होतें, तेच शब्द रव्याच्या लाडूच्या तोंडून निघालेले आतांशा तिला ऐकवेनातसे होत !

तिचें मन म्हणे—

'हेच गोड गोड शब्द त्या सुवर्णकांति बेसन लाडूच्या तोंडून ऐकायला मिळतील तर मी किती धन्य होईन !'

आणि नंतर कांहीं दिवसांनींच त्या सुवर्णकांति बेसन लाडूनें तसले गोड गोड शब्द करंजीच्या कानांत ऐकविले. त्या दिवशीं तिला इतका आनंद झाला कीं, रव्याच्या लाडूशीं ओळख देखील दाखविण्याचें तिनें साफ नाकारलें.

रव्याचा लाडू खेदमिश्रित नजरेनं करंजीकडं पाहूं लागला. तिच्या आसपास त्यानं नजर टाकली.

जेव्हां त्याला तो सुवर्णकांति बेसन लाडू करंजीच्या जवळपास दिसला तेव्हां त्याला एकदम सारें कोडें उलगडलें !

परंतु आतां या जाणिवेचा कांहीं उपयोग नव्हता.

कारण करंजीच्या मनावरील सुवर्णकांतीचा मोह दूर करण्यासाठीं कांहीं उपाय योजण्याच्या विचारांत रव्याचा लाडू असतांच एके दिवशीं चिनी मातीच्या एका सुंदर बशींत मोठ्या उत्कंठेनें व आनंदानें बसून सुवर्णकांति बेसन लाडूबरोबर करंजी आपल्या दुरडीच्या चाळीबाहेर गेलेली त्याच्या दृष्टीस पडली !

जातांना रव्याच्या लाडूला भेटून त्याचा निरोप घेण्याची देखील करंजीला आठवण राहिली नव्हती.

या धक्क्यानें रव्याचा लाडू काळा पडत चालला, आणि नंतर लौकरच एके दिवशीं चाळींतून त्यानें बाहेर उडी घेतल्यामुळें त्याचा चक्काचूर झाला.

★ ★

## १५ सतीचें वाण

### ले०:—विमल यशवंत घासकडबी (एम्. ए.)

घाटाच्या पायथ्याशीं शें दोनशें झोंपड्या उभारून वसलेलं एक खेडं होतं तें ! आज त्या खेड्यांत जणुं गुढीपाडवा होता. त्याच्या मनांत आज अपार आनंदाचीं मंगलवाद्यें निनादत होतीं. पण कशाकरतां हें सारं ? सतत १४ महिने ज्याच्या पायाचें नखही त्यांनीं पाहिलें नव्हतें व ज्याच्या केवळ आशेवर आपलं खेड्यांतील ग्रामराज्य त्यांनीं हिकमतीनं चालवलं होतं तो वणवण फिरणारा वनवासी आज अखेर त्यांच्या खेड्यांत येणार होता. त्यानं खेड्याखेड्यांतून जागृति केली होती. भाई अच्युत, नाना पाटील वगैरेंचे संदेश त्यांनीं झोंपडीझोंपडींतून पोंचवले होते. खेडोपाडीं त्याच्या संदेशाची लोक कानांत प्राण आणून वाट पहात. या

खेड्याला मात्र त्याचे प्राय प्रथमच लागणार होतें. त्याच्या नांवाचा ह्या खेड्यांत जयघोष होई. मात्र हा पोरसवदा, कोवळा दिसणारा तरुण कोण हें कोणालाच माहीत नव्हतें. अखेर आज तो येणार होता. घाटमाथ्यावरच्या खेड्याला पोलिसांचा वेढा पडला होता. त्यांतून निसटून तो आश्रयाला या खेड्यांत येणार होता. घटनेच्या आनंदाबरोबरच त्या खेडुतांच्या मनांत थोडीशी धाकधूक होतीच. पण बेडरपणें लढा देणाऱ्या मराठमावळ्यांच्या ब्रीदाला जागणारे निर्भय वीर ते ! त्यांनीं त्याच्या सुरक्षिततेची शक्यतों तजवीज केली होती. खूप मनांत होतं त्यांच्या, ह्या त्यांच्या वीरांचं दणकून स्वागत करावं, त्याचं ' मोठ्ठं शहरी बाण्यावाणी ' व्याख्यान करावं. पण भोंव-तालीं शिकाऱ्यांचं जाळं पसरलं होतं अशावेळीं सिंहानं डरकाळी फोडणं म्हणजे संकटाला आपण होऊन आमंत्रण देणं. चांगलीशी वेळ येईतों गुहेत दडी देऊन बसणंच मुत्सद्दीपणाचं होतं.

मोठ्या गनिमी काव्यानं पिंजऱ्यांतून पक्षी निसटून खेड्यांतल्या घर-ट्यांत येऊन पहुडला होता. अंधार पडतांच रातोरात त्याला कडीकपारींतून ' कुठेंतरी ' पोंचवायचं होतं. घाटमाथ्यावरून येणारी गाडी रोखायला व तिची टेहळणी करून वर्दी द्यायला ५१२५ लोक नेहमींच्या दिखाऊ निर्विकारतेनें तत्पर होते. एका छोट्याशा झोंपडींत भाकरीलसणीचं तिखट अन् कांदा खात हा गरिबांचा राजा भोंवतालच्या चार लोकांची आपुलकीनं चौकशी करीत होता. बऱ्याचशा गोष्टी झाल्यावर किसन पाटलांनीं—भूमिगत पाहुण्यानं—विचारलं, " हें खोपटं कुणाचं ? "

" सखा पाटलाचं नव्हं का ? " बमुता पाटील वडिलकीच्या आवा-जांत बोलले.

" मंग त्ये कुटं हायती ? "

" गेल्याती घाटावर. " तितक्याच निर्विकारपणें त्यांनीं परत माहिती पुरवली.

" कशापायीं ? "

आतां मात्र त्यांना जोर आला. " त्यांची भाडशी व्हती शेवती शेवती म्हून ! हळद लागली न् चार दिसांत तिचं कपाळ फुटलं. तवा-धरनं व्हती इथंच मामाकडं. या धोंड्याच्या महिन्यांत कुणा चरखा-

चाल्याशीं दोस्ती क्येली तिनं. सारंच चरखावाले थोडंच गोड असतात? चार दिवस खूप कामाचं स्वांग केल्या अन् एक दिस ती गेली न कळत त्याच्या हात धरून. एक वरीस होऊन गेलं त्याला. दोन घर व्हतील पुसांत. मामाच्या तोंडावर थुंकत्याती सारं म्हून तोबी गेला पडून घाटा-वर." किसन पाटलाच्या मनांत काय विचार चालले होते कुणास माहीत. रात्र पडायला बराच अवकाश होता. अंधार पडल्याशिवाय कांहीं करतां येणार नव्हतें. तेवढ्यांत किसन पाटलानं पुढचा कार्यक्रम त्यांच्या-पुढं टाकला नी तो प्राणपणानं पुरा करायचं त्यांच्याकडून वचन घेतलं. नंतर बराच वेळ खलबतं चाललीं होतीं त्यांचीं! जाण्याची वेळ जवळ आली तशी बमुतापाटलाची म्हातारी तुळशी ताम्हनांत जळती ज्योत घेऊन आली होती; बटव्याला बांधलेल्या अडकित्याचें पातें तिनें खसकन् करंगळीवर दाबलें नी रक्ताचा टिळा तिनं भक्तिभावानं किसनपाटलाच्या कपाळीं लावला व त्या जळत्या ज्योतींनीं त्याला ओंवाळलें. गद्गदल्या-स्वरांत ती म्हणाली, "किसनभाऊ! कवळा पोर दिसतोस पन करनी थोराची. इकत्या दिसांनीं आज आलासा लगबगा चाल-लांसा बी! तुम्हीं आम्हासनी सांभाळतां देव तुमची काळजी घेईल भाऊ!" सर्वांचे गळे दाटून आले होते. किसनभाऊ दोन सुरकुतल्या पावलांवर डोकं टेकीत होते तोंच ठो! ठो! बार ऐकूं आला. कुण्या दुष्टाच्या कारवायांनीं शत्रु खेड्यांत घुसला होता. मोठी लॉरी घेऊन हजर झाली होती. खेड्याला वेढा पडला होता. सगळीकडे धरपकड नी धांवपळ सुरू झाली होती. देवदयेनें पडलेल्या अंधारांत हाता-वर तुरी देऊन किसनभाऊ निसटून समोरच्या झाडींत शिरून दिसेनासे होणार तोंच एक गोळी सूं सूं करून त्यांच्या मांडींतून आरपार गेली अन् ते कोलमडून पडले. बरोबरच्या मंगेशभाऊनें त्यांना हातावर घेऊन धूम ठोकण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसांनीं त्यांना तावडतोब अडविलें अन् त्या दोघांना घेऊन ते पूर्वीच्याच झोंपडींत आले. तुळशी थरथर कांपत होती नी शिपायाच्या नांवानें बोटें मोडीत होती. "किसनभाऊ," म्हणून तिनं हंबरडाच फोडला. दुसऱ्या एकानं भराभर समई पुढं आणली तर फेट्याच्या कानाजवळच्या चुणींतून रक्ताची धार लागली होती. मांडी-

जवळ तर रक्ताचें थारोळें जमलें होतें. एकानें जखम दुसण्यासाठीं त्यांचा फेटा कपाळावरून थेट मागें ओढला. पोलिसांपैकीं एकानं टार्चचा उजेड फेंकला अन् तुळशी एकदम ओरडली, "व बया ! ही तर सखा पाटलाची शेंवती. ग माझी माय ! माझं त्वांड जळून जाय ! तिला काय शिया येंचल्या मीनं ! काय बाप्यावानी कामं केलींस ग ! नांव राखलंस ग गांवाचं. माझी माय तूं ! "

शेवंतीचे केस रक्तानं माखले होते. ती रक्तांतच निजली होती. पण तिच्या डोळ्यांत नी तोंडावर विलक्षण तेज आलें होतें. ज्या खेड्यांतून ती बदनाम होऊन गेली तिथल्या लोकांनीं तिच्या जिवाची प्राणपणानं जपणूक केली होती. नी तिथंच तिला आतां देशाचं काम करतां करतां मानाचं मरण आलं होतं. तिच्या कपाळावर मघाशीं तुळशीनं ओंवाळतांना लावलेला रक्ताचा कुंकुमतिलक आणखीच तेजाळपणें शोभत होता.

★ ★

## १५ यक्षिणीची कांडी !

लेः—गो. ल. आपटे, बी. ए. एल्एल्. बी. (पुणें)

—त्याच्या अंगावरील अगदीं साधे कपडे सुद्धां फाटके होते. दाढी पांच दिवसांची वाढलेली. बायको अन् चार बिचारीं पोरें ! सोन्याचा फुटका मणी देखील नव्हता माउलीच्या अंगावर. पोरें शाळेंत जात, पण नादार म्हणून. तो स्थानिक नगरपालिकेच्या कचेरींत दिवसभर कारकुनी करी.

—त्यानें देवाची प्रार्थना केली. ' देवा, या दारिद्र्यांतच का आम्ही मरणार ? ' त्याच्या करुण, निराशेनें भरलेल्या, निःश्वासानें देवाच्या दयाळू हृदयाला चिमटा बसला. देव प्रसन्न झाले !

एक वर्षाच्या आंत आय्. सी. एस् ऑफिसरच्या तोंडांत मारील असा पोशाख त्याच्या अंगावर झळकूं लागला. त्यानं बंगला घेतला, मोटार ठेवली. सौभाग्यवती सोन्यामोत्याच्या दागिन्यांनीं भारावून गेली.

पोरें ऐटदार कपडे घालून शाळेच्या कचेरींत फीसाठीं नोटा देऊन, उरलेली मोड परत घेण्यास विसरूं लागलीं.

—फक्त एक वर्ष ! म्हणजे बारा महिने !

—हें स्थित्यंतर झालें तरी कसें ?

—त्यानें रेशनिंग ऑफिसांत आपली बदली करून घेतली होती.

★ ★

## १६ त्याचें हास्य

लें०:—श्री. रा. ग. कुंभोजकर, एम्. ए. बी. टी. ( सांगली )

त्याची आणि माझी ओळख झाली तो प्रसंग अजूनही माझ्या चांगला स्मरणांत आहे—

—कचेरीला जाण्याच्या माझ्या रस्त्यावरच त्याचें तें छोटें दुकांन होतें. त्यांत सिगारेट, विडी-काडी आणि पानपट्टी मिळत असे. एके दिवशीं त्या दुकानांत मी सिगारेटची एक पेटी विकत घेतली आणि तिची किंमत त्याच्या हातावर ठेवली. हंसत हंसत त्यानें ती आपल्या गल्ल्यांत टाकली. मी परत जावयास निघालों तेव्हां त्यानें हांक मारली—" रावसाहेब ! " मीं मागें वळून पाहिलें. कातरलेल्या बारीक सुपारीची एक चिमूट त्यानें माझ्या हातांवर ठेवली. सिगारेटच्या पेटीवर सुपारीची चिमूट न मागतां ठेवणारा माझ्या आढळांतला तो पहिलाच दुकानदार होता. मीं त्याच्याकडे निरखून पाहिलें. मघांचें तें हास्य अद्यापिहि त्याच्या चेहऱ्यावर विलसत होतें. " मोठा आनंदी माणूस आहे !—नाहीं तर आम्ही ! "—असेंच कांहीं तरी मनांतल्या मनांत म्हणत मी तिथून पाय काढला.

त्या दिवसापासून मी त्याचें कायमचें गिऱ्हाइक झालों. सुपारीची चिमूट मिळते म्हणून नव्हे तर दरवेळीं दिसणारें त्याचें तें हास्य मला मोठें गमतीचें वाटे म्हणून.

कधीं कधीं दोन वर्षांच्या आपल्या छोट्या मुलाला खेळवीत तो दुका-

नांत बसलेला दिसायचा. पण मला पाहतांच तो चटकन् त्या मुलाला बाजूस ठेवी आणि माझ्या आवडत्या 'ब्रॅण्ड'च्या सिगारेटची पेटी माझ्यापुढें करी.

त्याचा चेहरा एकदांहि कधीं सचिंत दिसला नाहीं. त्याच्या चेहऱ्यावरचें तें हास्य एकदांहि कधीं ढळलेलें दिसलें नाहीं. "लढाईच्या काळांत असल्या लोकांच्याच उदरीं शनि आला आहे ! ... काय मजेंत आहेत बेटे ! " असेंच कांहीं तरी म्हणून मी त्याच्या हंसण्याचा अर्थ लावीत असे.

नित्याप्रमाणें त्या दिवशींहि मी कचेरीस चाललों होतों. पण त्याचें दुकान मात्र उघडें नव्हतें. त्या दिवशीं सिगारेट न घेतांच मी कचेरीस गेलों.

दुसऱ्या दिवशींहि तोच प्रकार !—म्हणजे झालें तरी काय ? या लोकांचें हें असेंच. आहे तोंपर्यंत चैन करतील आणि नाहीं म्हणजे दिवाळें फुंकून कुठेंतरी पसार होतील. ...

माझ्या विचाराची मालिका पूर्ण होण्याच्या आंतच तो आंतून बाहेर आला. "काय मालक," मी हंसत हंसत म्हणालों. "दोन दिवस दुकान नाहीं उघडलें ? धंद्याची जरूर राहिली नाहीं वाटतं ?"

—निदान त्याच्याशीं बोलतांना तरी हंसत बोलण्याची लकब नकळत मीं त्याच्यापासून उचलली होती.—

पण माझ्या प्रश्नाला त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तो नुसता हंसतच उभा राहिला. मला राग आला त्याचा. थोडें चिडून मी म्हणालों—"बोला ! बोलाना !"

"माझा मुलगा काल गेला साहेब !" हंसत हंसत तो म्हणाला.

"गेला ? कुठें गेला ?"

"गेला म्हणजे आटपला साहेब !" आणि अजूनहि त्याच्या चेहऱ्यावर तें हास्य होतेंच. काय विचित्र माणूस आहे हा ! प्रत्यक्ष आपल्या मुलाच्या मृत्यूची बातमी सांगतांनासुद्धां हा हंसतोच आहे !

अगदीं गंभीर नजरेनें मी त्याच्याकडे पाहिलें. क्षणमात्र त्याच्या चेहऱ्यावरचें हास्य मावळलें. माझ्या नजरेला नजर भिडतांच त्याचे डोळे

टचकन् पाणावले. आणि पुढच्याच क्षणीं–तो हंसू लागला ! क्षणार्धांत माझ्या मनांत वीज चमकून गेली—

—म्हणजे त्याच्या हास्याचा उगम आनंदांत नव्हता तर ! त्याच्या चेहऱ्यावरचें तें बसकें नाक, ते देवीचे वण, तो काळसर वर्ण, हे सारे जसे त्याच्या चेहऱ्याचे नैसर्गिक भाग होते. तसेंच त्याचें हास्यहि. ....

—माणसें जगांत अकारण हंसतात आणि त्या हास्याचा अकारण विपर्यास करतात ! कटु आहे पण सत्य आहे हें !

★ ★

## १८ प्राध्यापकांची ' प्रकृति ' !

लेः–श्री. बा. द. सातोस्कर, बी. ए. (मुंबई)

' विश्राम धामा ' तर्फे होणाऱ्या कार्यक्रमास आतांपर्यंत कधींही आली नाहीं इतकी गर्दी आमच्या सभेस आली होती.

वातावरणांत उकाडा मनस्वी होत होता.. सभागृहाचीं सारीं दारें नि खिडक्या सताड उघडण्यांत आल्या होत्या. आसमंतांत घोंघावणारा वारा मधूनच आंत घुसत होता. पण आपल्याबरोबर तो धूळ नी गरम गरम वाफा या आपल्या सोबत्यांनाही घेऊन येत होता. बहुतेक खिडक्यांच्या तावदानांच्या कड्या मोडल्या होत्या, आणि वाऱ्याच्या झोताबरोबर त्यांची जोरानें उघडझांप चालली होती.

टाळ्यांचा कडकडाट झाला. आजचे महनीय प्रवक्ते प्राध्यापक बृहस्पति आंत येत होते. महाराष्ट्रांतले जाडे विद्वान् म्हणून त्यांची ख्याति होती. खगोलशास्त्रापासून संततिनियमनशास्त्रापर्यंत ज्ञानमंदिराच्या सर्व दालनांत त्यांच्या प्रतिभेनें अप्रतिहतपणें संचार केला होता. शेवटच्या विषयावर त्यांनीं एक मौलिक ग्रंथ लिहिल्यामुळें डाका युनिव्हर्सिटीनें त्यांना पीएच. डी. ची पदवी बहाल केली होती. गृहीत कृत्यें प्रमाणांनीं सिद्ध करून सिद्धांत बांधण्याची तत्त्वज्ञानांतील पारंपरिक जुनी पद्धति त्यांनीं मोडून टाकली होती. आधीं आपल्याला हवा तो सिद्धांत मांडावयाचा आणि

तो सिद्ध करण्यासाठीं हवीं तीं प्रमाणें हुडकून काढायचीं अशी ही त्यांची नवी पद्धत होती.

लोक त्यांना उत्कृष्ट वक्ता मानीत खरें. पण ते स्वतः मात्र अजूनही असंतुष्टच होते. तत्त्वज्ञानी असल्यामुळें आपल्या विचारांत गोंधळाची अस्पष्ट छायाही पडूं नये असें त्यांस वाटे. आणि म्हणूनच ते आपलें प्रत्येक व्याख्यान लिहून काढीत.

प्रा. बृहस्पति व्यासपीठावरील उच्चासनावर जाऊन बसल्यानंतर टाळ्यांचा आवाज क्षीण होत जाऊन शेवटीं तो थांबला.

महनीय प्रवक्ते उभे राहिले. एकदोनदां खोकून त्यांनीं घसा साफ केला, आणि उजव्या हातानें कोटाच्या बटणाशीं चाळा करीत ते बोलूं लागले—किंवा वाचूं लागले. "**प्रकृतीची उत्पत्ति हा जगाला शाप आहे.**" हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.

"मत्प्रिय बांधव हो," प्रा. बृहस्पति म्हणाले आणि डाव्या हातांतील पहिल्या पानावरून ते नजर फिरवूं लागले, "प्रकृति हा शब्द मी कोणत्या अर्थानें वापरत आहें हें मला वाटतं आपणाला कळून चुकलंच असेल. केवळ तन्दुरुस्ती या प्राकृत अर्थानें हा शब्द मीं आज योजिलेला नाहीं. प्रकृति म्हणजे जीवसृष्टीचं मूळकारण. मायावादाचं आदिस्थान पुरुष आणि परमेश्वर या जिवाशिवांचा संगम घडविण्याच्या कामीं आपल्या मोहमयी अस्त्रांनीं, अनंत अडचणी निर्माण करणारी, पुरुषाला त्याच्या नैसर्गिक निवृत्तिमार्गावरून स्थानभ्रष्ट करून त्याला प्रवृत्तीच्या कर्दमात जखडून ठेवणारी, ती प्रकृति—थोडक्यांत **प्रकृति ही जीवपेशींतील स्त्रीजातीची प्रतीक आहे.**

"मित्रहो, स्त्रीजातीचा मी द्वेष्टा नाहीं. स्त्रीजात म्हणजे जगांतलं एक पाप आहे असें म्हणून मला यच्चयावत् स्त्रीवर्गाचा रोष ओढवून घ्यावयाचा नाहीं. मलाही पत्नी आहे, मुली आहेत. पण तत्त्वज्ञानाला नी सत्याला नातीं माहीत नसतात. चोराला चोर म्हणतांना आपण कुणाचाही मुलाहिजा ठेवतां कामा नये."

पहिल्या पृष्ठावरील मजकूर संपवून व्याख्याते दुसरें पान वाचूं लागले. दुसरें संपवून त्यांनीं तिसरें, चौथें याप्रमाणें दहा पानें वाचलीं. स्त्रीजातीच्या

उत्पत्तीमुळें जगांत काय काय अनर्थ ओढवले आहेत याचें त्यांनीं सविस्तर वर्णन केलें. प्रा. बृहस्पतींची रसवंती गंगौघाप्रमाणें धो धो वहात होती आणि उजव्या हातानें बटन जोरजोरानें पिरगळलें जात होतें.

" सभासदहो, " वक्ते अकरावें पृष्ठ वाचीत होते, " मानवसमाजाच्या उत्पत्तीच्या इतिहासाचा आपण शांतपणें विचार करा. आद्यस्त्री ईव्हनं हट्ट धरला नसता तर ॲडमनं ज्ञानवृक्षाचं फळ तोडण्याचा मूर्खपणा केलाच नसता. या मूर्खपणामुळें काय झालं ? त्यांनीं त्यापूर्वी कधींही न अनुभवलेले विकार त्यांच्या मनांत उदित झाले. हे विकार पुढं मानवजातींत वाढीला लागले. काम, क्रोध, मोह, लज्जा, अभिमान या विकारांच्या आत्यंतिकतेमुळंच आज जगाचा अधःपात झाला आहे. आपल्या पुराणेतिहासाबद्दल योग्य तो आदरभाव बाळगूनही मी म्हणूं शकेन कीं सीतादेवीमुळंच रामरावण युद्ध झालं. हेलनमुळं ट्रॉय शहराचा सर्वनाश झाला. द्रौपदीच्या हट्टामुळंच भारतीय युद्धाचा अनर्थ ओढवला. मातृवधाचा सूड घेण्याच्या ईर्ष्येमुळंच परशुरामानं एकवीस वेळां क्षत्रियकुलाची कत्तल केली. "

आधारांवर आधार देत वक्ते आपला सिद्धांत प्रस्थापित करण्याची शिकस्त करीत होते. पुढल्या रांगांवरील श्रोते कानाला हातांचा आधार देत त्यांचें भाषण ऐकत होते. मागच्या रांगांवरील सभासद वक्त्यांच्या स्फोटक विधानांवर आपसांत चर्चा करीत होते. तर अगदीं शेवटच्या खुर्च्यांवरील सभासद झोपेच्या डुलक्यांना परतविण्याच्या प्रयत्नांत अयशस्वी होत होते.

प्रा. बृहस्पति आतां तेरावें पान वाचूं लागले, " मित्रहो, इतिहासांतील उदाहरणं सोडून मी आतां वर्तमानकाळाकडे वळतों. नुकत्याच संपलेल्या महायुद्धाचा अनर्थ जगावर कां कोसळला ? हिटलरच्या महत्त्वाकांक्षेमुळं असं आपण उत्तर द्याल. पण ही महत्त्वाकांक्षा हिटलरच्या मनांत कां उत्पन्न झाली ? एकाद्या खुनी, दरोडेखोर राक्षसाप्रमाणं जगाचा निःपात करण्याचा अघोरीपणा त्यानं कां करावा ? लैंगिक मनोविकृति असं याचं कारण आहे, असं मानसशास्त्रज्ञांनीं ठरविलं आहे. पण मी म्हणतों,

ही लैंगिक मनोविकृति हिटलरच्या ठिकाणीं कां उत्पन्न व्हावी ? स्त्री-जातीच्या अस्तित्वामुळंच ना ? जगांत स्त्रीजात नसती तर लिंगभेद उत्पन्न झाला नसता. आणि लिंगभेद नसता तर लैंगिक आकर्षण किंवा लैंगिक विकृति या गोष्टींचं अस्तित्वच भासमान झालं नसतं. गेलं महायुद्ध केवळ स्त्रीजातीच्या अस्तित्वामुळं जगावर कोसळलं आहे. 'स्त्रीजात तेवढी निमकहराम' असं कंकणाच्या अभिनिवेशानं मला म्हणायचं नाहीं. स्त्रीजात ही प्रत्यक्ष निमक आहे असं मला म्हणायचं आहे. शेक्सपीयर-प्रमाणं. Frailty, thy name is woman! इतकंच म्हणून मी थांबणार नाहीं. Salty thou art, Oh woman! असंच मी म्हणेन. विश्वाच्या अमृतकुंभांत स्त्रीजातीचा हा मिठाचा खडा पडल्यामुळंच अमृताचं हलाहलांत रूपांतर झालं आहे......"

पसंतीदर्शक टाळ्यांचा कडकडाट झाला. क्षणभर वक्त्यांनीं श्वास घेतला आणि ते पुढें वाचण्याची तयारी करूं लागले.

पण इतक्यांत बाहेर पिसाटाप्रमाणें धांवणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्याचा एक अजस्र झोत खिडक्यांतून आंत आला. डाव्या हातांतील कागदां-वरील प्रा. बृहस्पतींची पकड सुटली आणि चतकोर फुलस्केप आकाराचे ते कागदाचे तुकडे सभागृहांत इतस्ततः विखरून गेले.

कुणी तरी ते गोळा करून अध्यक्षांच्या हातांत दिले. व्याख्यानाचा तात्पुरता खंडित झालेला ओघ पुनरपि चालू झाला.

" आणि म्हणूनच माझं असं निश्चित मत झालं आहे कीं सर्वश्रेष्ठ इंग्रजी नाटककार शेक्यपीयर आणि मराठींतील नामवंत लेखक गडकरी यांनीं स्त्रीजातीवर चिखलफेक केली ती स्त्रीमानसशास्त्राच्या अपुऱ्या ज्ञानाचंच द्योतक आहे. निसर्गतःच खुनशी, क्रूर, अत्याचारी, आधि-भौतिक सुखांना लालचावलेल्या पुरुषाला प्रेमाचा दिव्य संदेश देऊन त्याची आध्यात्मिक उन्नति घडवून आणण्यास कारणीभूत कोण होतं ? स्त्रीच ना ? ... "

व्याख्यात्यांचें वाचन चाललेंच होतें. पण कुठें तरी कांहीं तरी गफलत होत आहे असा भास त्यांना होत होता. श्रोत्यांमध्यें कुजबुज सुरू झाली

होती आणि हळुहळू ती वाढत चालली होती. पुढल्या रांगांतील श्रोते आश्चर्यानें आ वासून वक्त्याकडे पहात होते. पूर्वपक्षांत उपस्थित केलेले मुद्दे आपण स्वतःच उत्तरपक्ष करून खोडून काढायचे, नी मग दक्षिणपक्ष करून मूळ मुद्दा सिद्ध करायचा असें कांहीं हें अजब तंत्र असेल असें कांहीं जण मानून घेत होते. व्याख्यानवाचन चालूच होतें.

" जगांत जें जें कोमल आहे, मंगल आहे, पवित्र आहे, दिव्य आहे, सत् आहे, शिव आहे, सुंदर आहे त्या त्या वस्तुजातांतला अंश घेऊन परमेश्वरानं प्रकृति निर्माण केली. विश्वाचा संहार होण्याची वेळ ठेपली असतांना स्त्रीनंच त्याला हात देऊन वर काढलं आहे. देवदानवांच्या युद्धांत मोहिनी प्रगट झाली नसती तर आज जगावर असुरांचं राज्य झालं असतं. स्त्रीमुळंच जगाचं रक्षण झालं आहे, प्रगति झाली आहे. नुसती प्रगति नव्हे तर जगाची निर्मिति तिच्यामुळंच झाली आहे. मानव-वंशाची परंपरा राखण्याचा भार तिनंच उचलला आहे. स्त्री ही जगाची धात्री आहे. ... "

आतां मात्र श्रोत्यांना वक्त्यांचें हें असंबद्ध वक्तव्य असह्य झालें. कॉलेजयुवकांच्या उत्साहानें ते उपहासदर्शक टाळ्या पिटूं लागले. सभा-गृहांत सर्वत्र गोंधळ माजला.

महनीय वक्त्यांनाहि आपलें कुठें चुकलें याची पूर्ण जाणीव झाली. ते पटकन् खालीं बसले. त्यांना दरदरून घाम सुटला.

कांहीं वेळानें टेबलाचा आधार घेत ते उभे राहिले व हळु स्वरांत म्हणाले, "मित्रहो, क्षमा करा. आतांचं हें भाषण आटोपून मला भगिनी-समाजांत व्याख्यानासाठीं जायचं होतं. ' **स्त्री ही जगाची धात्री आहे** ' या विषयावर मला तिथं बोलायचं होतं. दोन्ही व्याख्यानं लिहून एका-खालीं एक अशीं ठेवून दिलीं होतीं. गडबडींत कागदांना टांचणी लावा-यचं मी विसरूनच गेलों. त्यामुळें पहिल्या व्याख्यानाचा शेवट दुसऱ्या व्याख्यानाच्या आरंभानेंच झाला. मला क्षमा करा !! "

★ ★

# १९ दैववान !

ले.—सौ. संजीवनी मराठे, बी. ए. ( बेळगांव )

लोक म्हणत—दैववान आहे हो हा म्हातारा ! दैववान नाहीं तर काय ? सुना, जावई, नातवंडें, घरदार सारं कांहीं लाभलं होतं त्याला. उणीव होती एकाच गोष्टीची अन् ती म्हणजे पत्नीची. परंतु पत्नी निवर्तल्यापासून तिची जागा बगिचा व रेडिओ यांनीं घेतली होती !

लढाई सुरू झाली. म्हाताऱ्याच्या थोरल्या चिरंजीवांना पितृसेवेचा उमाळा आला अन् ते सहकुटुंब सहपरिवार त्याच्याजवळ रहायला आले. खर्च होई तीर्थरूपांचा, शिल्लक पडे चिरंजीवांची. लोक मात्र म्हणत—दैववान आहे म्हातारा ! धन्य आहे मुलाच्या पितृभक्तीची !

रेडिओ आणि बगिचा ! म्हाताऱ्याचें तें सुदैव पण इतरांचें दुर्दैव ! माळ्याच्या गैरहजेरींत चिरंजीवांना पाणी घालावें लागे अन् रेडिओच्या कटकटीनें सुनबाईचा कपाळशूळ उठे ! एक दिवस चिरंजीवांनीं बगिचा टाकला उखडून अन् रेडिओ दिला फुंकून.

"बाबा, बाबा," ते म्हणाले "आपण फोनोग्राफ घेऊं अन् घोडागाडी ठेवूं !" म्हाताऱ्याचें उत्तर यायच्या आधीं चिरंजीवांनीं आपलें म्हणणें खरें केलें. लोक म्हणत—दैववान आहे बेटा ! मुलामुळें गाडी उडवायला मिळते आहे याला !

पुढें काय झालं ? काय व्हायचंय् ? फोनोग्राफ वाजूं लागला रंगमहालांत अन् गाडी जाऊं लागली महिलामंडळांत ! अन् म्हातारा ? बिचारा खचून गेला अगदीं ! हळूहळू झुरणीला लागला अन् चार महिन्यांत पत्नीच्या भेटीला निघून गेला. लोक आपले म्हणत-दैववान् होता बिचारा ! मुलाच्या मांडीवर त्याला मरण आलं ! !

★ ★

## २० अभिरुचि

ले.—विद्याकुमार शेरे ( बी. ए. )

उग्र मुद्रेचा, गंभीर असा एक गृहस्थ लायब्ररींत गेला आणि वाचा-यला एक छानसं पुस्तक मागूं लागला.

लायब्ररीयननें प्रो. फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या नव्या कादंबऱ्या त्याच्या पुढ्यांत टाकल्या.

त्यांजकडे ढुंकूनही न पाहतां तो गृहस्थ म्हणाला,

" असल्या पांचट कादंबऱ्या मला आवडत नाहींत. "

लायब्ररीयननें त्या उचलून परत घेतल्या आणि लघुकथासंग्रहाचीं नव्या जुन्या लेखकांचीं नवीं पुस्तकें दाखविलीं.

त्यांकडे तिरस्कारानें पहात तो गृहस्थ बोलला,

" अंह ! असल्या टीचभर गोष्टी काय वाचणार ? "

लायब्ररीयननं मग त्यास काव्याचीं पुस्तकं दिलीं.

त्यांकडे न पहातांच तो गृहस्थ उद्गारला,

" काय हो ? समाजाच्या प्रगतीबरोबर काव्यास ओहोटी लागते हें तुम्हांस माहीत नाहीं काय ? "

त्याला उत्तर देण्याच्या भानगडींत न पडतां लायब्ररीयननें त्याच्या समोर इतिहासाचे बडे बडे ग्रंथ टाकले.

त्याकडे आंठ्या घालून पहात तो बोलला,

" छेः ! हीं जुन्या इतिहासाचीं भुतं आमच्या मानगुटीस कशास बसवतां ? "

मग त्या लायब्ररीयननें राजकारणावरील नवीं पुस्तकं त्याच्या पुढ्यांत टाकलीं.

तीं वरवर पहात तो उद्गारला,

" छे. ! हीं नकोत ! राजकारण हा एक घाणेरडा खेळ आहे असें कोणींसें म्हटलें आहे ना ? "

लायब्ररीयननं मग विज्ञानशास्त्रावरील प्रबंध त्यास दाखविले. पण तेही त्यास आवडले नाहींत. तो म्हणाला,

" विज्ञानशास्त्रें हीं अपूर्ण शास्त्रें आहेत! मानवाच्या संहारासाठींच तीं जन्मास आलीं आहेत... "

त्याचं व्याख्यान सुरू होऊं नये म्हणूनच कीं काय, लायब्ररीयननं त्याच्या पुढ्यांत धार्मिक व तत्त्वज्ञानपर ग्रंथ टाकले.

परंतु तेही त्यानं फेकून दिले व म्हटलें,

" वा ! मला तुम्ही अगदींच पेन्शनर समजलांत कीं काय ? "

बिचाऱ्या लायब्ररीयननें तीं सगळीं पुस्तकें पुनः होतीं तेथें ठेवून दिलीं व सविनय म्हटलं,

" माफ करा, तुम्हांस द्यावयास आमचे लायब्ररींत पुस्तक नाहीं. "

जरा खांकरून, इकडे तिकडे कोणी नसलेलें पाहून तो मनुष्य कारकुनाच्या कानाशीं लागला आणि कुजबुजत म्हणाला—"हें पहा, तुमच्याकडे तें 'अस्सल कोकशास्त्र' हें पुस्तक असलं तर काढा—लगेच मेंबर होतो मी ! "

★ ★

## २१ समरसता

लेः—श्री. **पद्माकर निमदेव**, बी. ए. ( अमरावती )

त्या दिवशीं सिनेमा पाहण्यास म्हणून मी " सरोज टॉकीज " मध्यें गेलों होतों. मी खुर्चीवर बसलों. शेजारील खुर्चीवर एकजण हळूच येऊन बसला. मीं त्याच्याकडे एक ओझरती नजर फिरविली. पड्द्यावर दृश्यें दिसूं लागलीं. खांडेकरांच्या कथानकावर आधारलेला " **संगम** " बोलपट होता तो.

खेळाला सुरवात होऊन वीस एक मिनिटें झालीं असतील. पण त्या वीस मिनिटांत—माझ्या शेजारील गृहस्थाच्या डोळ्यांत किती तरी आसवं आलीं असतील. चित्राशीं समरस होणाऱ्या त्याच्या त्या आकृतीकडे पाहतां पाहतां माझ्या मनांत येई—गृहस्थ कथानकांतील पात्रांच्या भावनांशीं अगदीं तद्रूप झाला आहे; त्याशिवायच—

शेजाऱ्याजवळून मला एक अस्पष्टसा " स्-स् " असा आवाज आला. त्याचवेळीं पडद्यावर, मुकुंद, मावशीच्या घरावर जप्ती आणणाऱ्या व हातांत बंदूक असणाऱ्या भैयासाहिबांशीं हृदय पिळवटून जाईल असें भाषण करीत होता. मला वाटलें–मुकुंदाच्या भूमिकेशीं स्वारी ' समरस ' पावली असावी.

सिनेमा संपल्यावर त्या गृहस्थाच्या मागें जातां जातां मला वाटलें–बराच भावनाशील गृहस्थ असावा हा. कथानकाच्या वास्तवतेबद्दल सुद्धां मला कौतुक वाटलें. खांडेकरांना तर मी किती तरी धन्यवाद दिले असतील.

चित्रपटगृहाच्या मुख्य दरवाजाशीं त्या गृहस्थाला आपला कोणी तरी मित्र भेटला. त्याच्या खांद्यावर हात टाकतां टाकतां मित्रानें त्याला विचारलें–" कां तात्या, कसा काय वाटला सिनेमा ? "

कानाच्या मागील भागावर हळूच हात फिरवीत तो उद्गारला–" अरे कसचा सिनेमा नि कसचं काय. सारखा कान ठणका मारीत होता. घरीं सुचेचना. म्हटलं, पडद्यावरचीं चित्रं पाहून तरी मन रमेल. पण कसचं– "

त्याचे ते उद्गार मीं ऐकले मात्र—

त्याचीं तीं आंसवं, त्याचा तो स्–स् आवाज, त्याची सिनेमांतली ती " समरसता " तावडतोब माझ्या लक्ष्यांत आली–तेव्हांपासून वाचक–श्रोत्यांच्या वाङ्मयीन समरसतेच्या खऱ्या कारणांबद्दल मला नेहमीं संशय वाटूं लागला आहे.

★ ★

## २२ चप्पल !

लेः—रामचंद्र हिंगणे ( पुणें )

अजून ती गोष्ट आठवते–!

मी शाळेंत असतांना विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाला लागूनच प्रिन्सिपॉलनें एक बाग तयार केली होती. त्या बागेला पाणी घालण्यासाठीं

प्रत्येक विद्यार्थ्यांचे गट करून कोणत्या गटानें कोणत्या दिवशीं पाणी घालावयाचें हेंहि त्याचबरोबर ठरवून दिलें होतें. त्या नियमानुसार आज पांच विद्यार्थ्यांचा एक गट संध्याकाळच्या सुमारास पाणी घालीत होता. एका गटांत एकबोटे आणि यादव ही जोडगोळी होती. एकबोटे कामचुकार म्हणून प्रसिद्ध होता. आणि यादवाची तक्रारी माणूस प्रसिद्धि होती.

पाणी घालतां घालतां सगळ्यांनीं मुद्दाम ऐकावें म्हणून यादव आपला आवाज चढवून म्हणाला, "एकबोटे, तूं कामांत चुकारपणा करूं नकोस. सगळ्यांनीं सारखें पाणी घातलें पाहिजे. तूं पाणी घालीत नसशील तर मी प्रिन्सिपॉलला जाऊन सांगेन." सगळ्यांचें लक्ष एकबोट्याकडे वळलें. एकबोट्यानें पायांतल्या चप्पलकडे बोट दाखवलें आणि तो यादवाला म्हणाला, "पाहिलीस का चप्पल !"

झालें ! इतक्या विद्यार्थ्यांदेखत यादवाला चप्पल दाखवली म्हणजे काय ! यादवाच्या अंगाचा तिळपापड झाला. तोंडाला येईल तें तो बोलूं लागला. बाचाबाचीला सुरवात झाली. तरीपण एकबोटे भांडतांना क्वचित् मधूनमधून हंसत होता. त्यामुळें यादव अधिकच संतापत होता. बाकीच्या विद्यार्थ्यांनीं चप्पल दाखवलेली प्रत्यक्ष पाहिल्यामुळें त्यांनादेखील एकबोटेचा राग आला. शेवटीं तें सारें लटांबर प्रिन्सिपॉलकडे गेलें.

प्रिन्सिपॉलच्या कानांवर यादवानें सारी हकीगत घातली. बाकीच्या विद्यार्थ्यांनीं खरा प्रकार सांगितला. त्यामुळें प्रिन्सिपॉल भडकून देखील गेले. एकबोटेची त्यांनीं चांगली खरडपट्टी काढली. शेवटीं रागाचा पारा जरा कमी झाल्यावर प्रिन्सिपॉल एकबोटेला म्हणाले, "एकबोटे, यादवांना चप्पल दाखवण्यापर्यंत तुमची मजल कशी केली ? तुम्ही माझ्याकडे कां आला नाहीं ?" एकबोटे शांतपणें म्हणाला. "साहेब ! मी यादवाला चप्पल दाखवली ही गोष्ट खरी. मीं पाणी घातलें होतें, त्यामुळें माझ्या चप्पलेला चिखल देखील लागला होता. त्या लागलेल्या चिखलावरून पाणी घातल्याची कल्पना यादवाला येईल म्हणून चिखलानें बरबटलेली चप्पल मीं यादवाला दाखविली. त्यांत माझा वाईट हेतु मुळींच नव्हता. त्यानें तें न समजतां माझ्यावर इतका गहजब केला हें मात्र चांगलें नाहीं. याबद्दल आपण त्यालाच दोन गोष्टी सांगितल्या तर बरें."

—"एकबोटेंच हे शब्द मी तेव्हांपासून विसरलों नाहीं. माझ्याबद्दल मागचें 'चप्पल प्रकरण' म्हणून कोणी मित्र एखाद्या मुलीचें नांव गोवून उगीच कुजबुजतात. त्या 'चप्पल' चं खरं रहस्य हेंच आहे!"

★ ★

## २३ रुमाल.

ले० **प्रभाकर वा. जोशी**, बी. ए. (गदग).

—अन् त्या दिवशीं Lost and found च्या सूचनाफलकावर रमेशची सुंदर हिरव्या नोटपेपरवर सुवाच्य अक्षरांनीं लिहिलेली नोटीस झळकली.

**" रेशमी रुमाल सांपडला आहे. मालकानें घेऊन जावा. "**

कॉलेजमध्यें येऊन त्याला जवळजवळ तीन वर्षें आलीं होतीं. पण सुंदर कमलिनीच्या मुखकमलावर तो दुरून नुसतं नेत्रसुखच घेत होता. प्रेमरसांत बुडाविलेले नेत्रबाण त्यानें अनेक हरिणाक्षींवर सोडले. परंतु त्यांच्या हृदयांत शिरकाव मिळण्यापूर्वीच ते बोथटून जावयाचे! आज कोठें विधात्यानें रमेशची प्रार्थना ऐकली होती. तो सुगंधी हातरुमाल!!!—किती वेळां तरी त्यानें त्याचे पटापट मुके घेतले होते. ती कोपऱ्यांतील नाजूकशी फुलवेल, त्यावरील दोन पाखरं—

तो हातरुमाल जणूं मेघरूपानें त्याला प्रेमसंदेश घेऊन आला होता. त्याच्या अतृप्त मनाला त्याचा मऊ मऊ स्पर्श किती सुखाचा वाटत होता! हातरुमाल परत देतांना त्या कोमल करांचा तो मादक पण सुखाच्या लहरी उठविणारा स्पर्श, नेत्रांतील तो प्रेमळ भाव उपकाराच्या ओझ्याखालीं गुदमरल्यामुळें खालीवर होणारें वक्षस्थळ अपरिचित तरुणाशीं बोलण्याचा पहिलाच प्रसंग म्हणून घर्मबिंदूंनीं तिच्या मुखकमलावर केलेली दाटी—अलग झालेले तिचे अधरोष्ठ—नाहीं नाहीं त्या कल्पना त्याच्या डोक्यांत येऊं लागल्या.

दुसऱ्या दिवशीं रमेश त्याच्या आवडत्या 'गॅबरडीन'च्या सुटांत इकडे-

तिकडे मोठ्या आशेनें फिरूं लागला. कपड्यांवरचा गुलाबांचा मधुर वास, नि डोक्यावर ब्रिलियन्टाइनचा मुलामा, ह्यांच्यामुळें त्याचें वास्तव्य लवकरच जाणवे. पहिले दोन तास झाले...तो खिन्न होत चालला—पण आशा ही मानवी प्राण्याला कळसुत्री बाहुल्याप्रमाणें खेळविते म्हणतात! चारीही तास संपले. त्याच्या सूचनेला अजूनही हांक आली नव्हती; बाहेर उन्हामुळें तापलेलें माळरान जास्त रुक्ष दिसूं लागलें व इकडे त्याच्या तरुणसुलभ मनाचा सहारा झाला.

निराशपणें तो जिना उतरत होता. इतक्यांत कोपऱ्यांतून एका मधुर कंठांतून एक हांक त्याच्या कानीं आली.

'मि. राजपे!' त्यानें मोठ्या आशाळभूत नजरेनें मागें पाहिलें—त्याचा हात खिशामध्यें गेला व तो सुंदरसा प्रेमखलिता बाहेर आला.

ती व्यक्ति त्याच्या जवळ आली—त्याचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना, 'कोण मिस् डिसोजा!' त्याची काळीकुट्ट, गोवानीज् प्रोफेसर! अरे बापरे! हिडिंबा भेटली असती तरी बरं यापेक्षां! "मेलों आतां!" असें मनांत म्हणत, चरफडत त्यानें हातरुमालासहित तिची बोळवण केली कशीबशी—आणि कोपऱ्यांत उभे राहून फिदीफिदी हंसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या टोळक्याकडे पाहून करकरां दांत खाल्ले!

★ ★

## २४ प्रेमाचें प्रायश्चित्त

ले. वसंत हरी कटक्कर (बी. ए.)

गांवांतील अगदीं हमरस्ता होता तो.

एक तरुण आणि तरुणी एकमेकांचे हात हातांत धरून चालले होते.

जाणारा येणारा मोठ्या कुतूहलानें त्यांचेकडे पाही.

टीका, चर्चा, उपहास यांचा एक विषय मिळाला होता.

'छे छे, अलीकडे अगदीं ताळतंत्र सोडलंय या लोकांनीं.' समाजाची फुंकट फौजदारी करणारे एक म्हणाले.

" आम्ही काय प्रेमालाप केले नाहींत ! पण असं भर रस्त्यांत—छे छे !!" आपल्या आयुष्यांतील प्रेमाचें फूल वाळल्याची जाणीव झाल्यानें एक टकले बोलले.

मागून एक मोटार येत होती.

हॉर्न वाजला.

ते बाजूला होण्याच्या आंत धाडकन धक्का लागून दोघेही खालीं पडून जखमी झाले. मोटार वेगांत पुढें निघून गेली.

' बरं झालं—आंधळ्या प्रेमाचं प्रायश्चित्त असंच मिळायचं '—कोणीतरी बोललें.

' गुलगुल गोष्टी करतांना कानाला दुसरं काय ऐकूं येणार ?—एक मार्तंड बोलले. बरीच गर्दी जमली.

आणि चौकशीअंतीं असें कळलें कीं तो आंधळा होता व ती बहिरी होती—आणि एकमेकांच्या हातांच्या आधारानें ती फिरून भिक्षा मागत. आजच एका श्रीमंत घरांतून दोघांना नवे कपडे मिळाले होते.

★ ★

## २५ ' कागद व कायदा '—

ले. **मधुकर. श्री. मंगरूळकर** बी. ए. एल्‌एल्. बी. ( नागपूर )

१९४२ च्या लढ्यांत भाग घेतलेला तो एक प्रामाणिक देशभक्त होता. देशासाठीं कांहींतरी करावें, प्राणाचे वाण देण्याची वेळ आली तरी हरकत नाहीं या इच्छेनं त्यानं उडी घेतली. विधायक कार्याला हात घालण्यापूर्वीच त्याची तुरुंगांत खानगी झाली.

—तीन वर्षं निरनिराळ्या तुरुंगांचा पाहुणचार घेतला. नातलगांची भेट घ्यायची पद्धति अपमानास्पद आहे, या सबबीवर इतर राजबंद्यांबरोबर भेटीगांठी बंद झाल्या होत्या.

वेळ जातां जाईनासा झाला. दिवस लवकर संपत असे. पण रात्री संपत नव्हत्या. नूतन परिणित पत्नीची शेजेवरची आठवण—! दिवसेंदिवस उदास वाटत होतें.

एक दिवस त्याला वर्तमानपत्रावरून समजलें. मोठीं मोठीं माणसं आपल्यासारखींच तुरुंगांत खितपत पडलीं आहेत. पण याहि प्रसंगाचा ते उपयोग करून घेत आहेत. विनोबाजी निरनिराळ्या विषयांच्या अध्यापनांत गुंग आहेत. राजेन्द्रबाबूंचा पाकिस्तानवर ग्रंथ तयार होत आहे. जवाहरलालजींचें Discovery of India तयार होत आहे. मौलानासाहेबांचें......

रोजरोज निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या लेखनाचे त्याला संदेश मिळत होते.

—अरे! आपण तीन वर्षं उगीच वायां घालविलीं. आतांपर्यंत किती तरी लिहून झालं असतं. पण अजून हरकत नाहीं.

वेळ भरपूर होता. कागद पेन्सिली मिळायला हरकत नव्हतीच. क्रांति-युद्धाचा अनुभव असल्याचें सर्टिफिकेट मिळालेलें होतेंच. अवघ्या सहा महिन्यांत तीन कादंबऱ्या व दीड डझन लघुकथा तयार झाल्या. प्रणयाला नांव नाहीं. राजकारण, रक्त, अश्रू, उसासे, क्रांति, 'चलो दिल्ली,' 'जय हिंद' वगैरे सर्व आधुनिक मसाला वापरून अस्सल स्वदेशी माल तयार झाला होता. पुढें मागें पुस्तक काढायची वेळ आली तर लाल शाईत छापावें अशी त्याची अंतरींची इच्छा!!

—आतां नवी विवंचना लागली होती. हीं हस्तलिखितं बाहेर सुख-रूप जायचीं कशीं? एखाद्या करव्या कवटाळिणीची नजर आपल्या सोनुल्याला होऊं नये म्हणून एखादी आई आपल्या मुलाला झांकून ठेवते, त्याप्रमाणें तुरुंगाधिकाऱ्यांच्या नजरेची झळ त्या लिखाणाला लागूं नये म्हणून तो प्राणापलीकडे जपत होता. 'सेन्सॉर' च्या हातून पास होऊन तीं लिखितं बाहेर जाणार नाहींत ही त्यांची खात्री होती. रक्ताचं पाणी करून तें लिखाण लिहिलं होतं ना.

चांदीची किल्ली चालली. हात ओले झाले. एक वॉर्डर कबूल झाला. ऑफिसच्या फायलींमधून त्या वह्या बिनबोभाट बाहेर गेल्या. शिवाजीची आग्र्याहून सुटका झाली. बाहेरच्या स्वच्छंद वाऱ्यांनीं त्या वह्यांचीं पानं फडफडलीं. इच्छित ठिकाणीं तीं जिवंत अक्षरं सुरक्षितपणें पोंचलीं.

राजकारणाचें वारें बदललें होतें. पूर्वीं एखाद्या राजाला मुलगा झाला

क्र. २३५५

म्हणजे सारे बंदी सुटत असत. आतां जणूं महायुद्ध जिंकलं म्हणून सारे राजबंदी सुटायला लागले होते.

त्याच्या तुरुंगाचीं दारं उघडलीं. बाहेरच्या स्वतंत्र हवेची झळ लागतांच त्यानं खूप मन तृप्त होईल एव्हढा श्वास घेतला. पहिलें पाऊल घराकडे पडण्याऐवजीं वह्या लपल्या होत्या तिकडे वळलें.

चरून आलेल्या गाईनें आपल्या वासराचें अंग कुरवाळावें, अवघ्राण करावें त्याप्रमाणें त्यानं आपल्या वह्यांवरून हात फिरवला.

प्रकाशकांच्या घरींच फेऱ्या सुरू झाल्या. कुणी म्हणे आमचा एक वर्षाचा कार्यक्रम आगाऊ ठरला आहे. मग पाहूं. कुणी म्हणे नवा टाईप मागवला आहे. कुणी कांहीं, कुणी कांहीं !—नाहीं मात्र कुणींच म्हटलं नव्हतं.

एक हरीचा लाल भेटला. त्यानं कबूल केलं. मी पुस्तक छापतों, दलालांचं चित्र घेतों, ' ऑफसेट ' मध्यें सहारंगी ब्लॉक घालूं ' रॅपर 'ला! पहात रहाल तुम्ही नुसते...पण एक अडचण आहे...

तो म्हणाला, ' सांगा,—' इतकं सगळं झालं. आतां कसली अडचण राहिली ! फार तर मोबदल्याचं म्हणेल. अं ! देशासाठीं जान द्यायला तयार झालों, तिथं या रुपयाची काय पर्वा—' त्याची कल्पना!

तो म्हणाला, ' कागदाचं परमिट मिळवून द्या तुम्ही. मग कांहीं नको. कागद द्या मला. पण तसं कशाला ? तुमच्या पुस्तकासाठीं मी काढीन कागद कुठूनही. फक्त मंजुरी मिळवून द्या तुम्ही—'

—' हो हो ! त्यांत काय आठ दिवसांत आणून देतों. '

कागदाची मंजुरी मिळवणं म्हणजे काय साता समुद्रापलीकडच्या बागेंतून गाणारा पोपट आणण्याइतकं कठीण आहे का ? त्याला वाटलं.

—तो घरीं आला. एका मोठ्या सुंदर कागदावर ' पेपर कंट्रोलर 'ला अर्ज लिहिला. कागद न मिळाला तर प्रायः देशाचं कसं नुकसान होईल, हें त्यास अत्युत्तम भाषेंत लिहिलें होतें. आपण कादंबरीकार आहोंत. आपल्या शैलीची त्या साहेबांवर छाप पडावी ही अंतस्थ इच्छा.

अर्ज पोस्टाच्या पेटींत पडला. बोटावर दिवस मोजले. आठव्या

दिवशीं On his Majesty's service चा पिवळा लिफाफा आला. कोपऱ्यांत छाप होता From dispatcher's Paper Control Office.

घाईघाईनं त्यानं आंतली चिठ्ठी काढून वाचली, अन् कागद त्याच्या हातून गळून पडला. त्यांत लिहिलं होतं.

—जरूरीपेक्षां जास्त आकाराचा कागद अर्जासाठीं वापरून, तुम्ही 'पेपर कंट्रोल ऑर्डर' चा भंग केला आहे. त्याबद्दल 'डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट' खालीं तुमच्यावर फौजदारी कोर्टांत कारवाई कां करूं नये ? याविरुद्ध कारण दाखवा—' !

★ ★

## २६ " म्हणे, नांवांत काय आहे ! "

लेः—जयवंत पवार, बी. एस्सी. ( बडोदें. )

' पहांटेचीं स्वप्नें म्हणे खरीं ठरतात ' असें विश्वास बिछान्यांतून उठतेवेळीं स्वतःशींच म्हणाला. स्वप्नसमाधिभंगानें भानावर येऊन तो कांहीं वेळां अस्वस्थ झाला होता. उठल्यावर टेबलावरील पत्र चौथ्यांदा वाचावयास त्यानें सुरवात केली.

खालसा चित्रमंदिर पुणें.
ता. ×× सप्टेंबर १९४५

श्री. विश्वासराव खोटे यांस,

सध्यां माझ्याजवळ स्वाक्षरीचा फोटो शिल्लक नसल्यामुळें पाठवितां येत नाहीं. आपण येत्या शनिवारीं संध्याकाळीं चार वाजतां चित्रमंदिरांत भेटावयास समक्षच यावें.

तुम्हांला आवडणारी
शीलवती

इतक्या लवकर उठून चहा पिण्यास आल्यामुळें हॉटेल मालकानें बोलून आश्चर्य प्रगट केलें. नंतर नेहमींच्या सलूनमध्यें जाऊन केसदाढी वाढली

नसतांना केली. घरीं आल्यावर साहजिकच त्याच्या मित्रानें विचारलें, " लवकर कां उठलास ? " परंतु ' अगोदर केलें आणि नंतर सांगितलें ' असा पोक्त विचार मनांत आणून त्यानें " कांहीं नाहीं सहजच उठलों " असें म्हणून वेळ मारून नेली. क्लबांत जेवतांना तो एकदां सुद्धां नोकरावर रागावला नाहीं. एका मित्राला कॉलेजमध्यें हजेरी लावण्यास सांगून स्वतः तेथील आवारांत भटकत राहिला. कधीं एकदां चार वाजताहेत असं झालं होतं. घरीं येतांना परीटघडीचे कपडे आणावयास विसरला नाहीं.

निदान दहापंधरा मिनिटें अगोदर जाऊन स्वतःच्या वक्तशीरपणाची छाप, स्वरूपसुंदर शीलवतीवर मारावी या हेतूनें त्यानें खोलीवरून लवकर निघण्याचें ठरविलें. रेशमी शर्ट, काश्मीर वूलनचा सूट, फेल्ट हॅट, हरिणाच्या कातड्याचे बूट,—यांपैकीं त्याच्या स्वतःच्या वस्तू किती होत्या याच्याशीं आपणास कर्तव्य नाहीं—चोपून बसविलेले केंस, गौरकांतीचा आभास उत्पन्न करणारा स्नो लावून विश्वासची स्वारी, आपल्याकडेच सारेजण पहात आहेत अशा तोऱ्यांत बाहेर पडली. दुधाची तहान ताकावर भागवावयाची म्हणून नव्हे तर पुरुषांमध्यें अजून लीपस्टिक लावण्याची फॅशन न झाल्यामुळें, विश्वासनें विड्या, सिगारेट व क्वचित् प्रसंगीं चिरूट फुंकून काळ्या झालेल्या ओठावर डबल पान पुणा मसाला खाऊन नकली लाली आणली. आणि नवीन कोऱ्या भाड्याच्या सायकलवरून तो चित्रमंदिराकडे रवाना झाला.

चित्रमंदिराच्या प्रतीक्षागृहांतील शीलवतीबाईच्या छबीकडे विश्वासची दृष्टि खिळून राहिली होती. छायाचित्रकाराची कुशलता व सौंदर्यप्रसाधनांचें कसब याची तुलना तो मनाशींच करीत होता. ' नटीचें वय आणि शील फक्त निर्मात्यालाच माहीत असतें ' हें ठाऊक असून देखील त्या छबीवरून तो वयाचा अंदाज करूं लागला. ' स्वरूपसुंदर ' या उपाधीप्रमाणें खरोखरच ती सुंदर आहे का तिला स्वतःचें रूप सुंदर वाटतें; असा विचार करीत असतांनाच शीलवतीनें प्रवेश केला. ताबडतोब विश्वासनें कपाळावरचा घाम टिपत, हंसरा चेहरा करून म्हटलें, " गुड आफ्टरनून मिस् शीलवती. "

शीलवतीनें नम्रपणें " नमस्ते " असें म्हटलें.

नटींच्या मुलाखतीमधील आत्यंतिक साधेपणाचें वर्णन लक्षांत येतांच, तिच्या साध्या सुती पातळाकडे पाहून विश्वास घाबरतच म्हणाला, "किती साध्या आहांत हो तुम्ही ? "

शीलवती, " कस्सं कस्सं. पण असे उभे कां ? बसा ना—"

विश्वास—" थँक्यू. "

शीलवती—" आपल्याला पाहून मला फार आनंद झाला. "

" खरंच " असें विश्वासानें म्हटलें खरें. पण एकदां त्या छबीकडे पहात व एकदां शीलवतीकडे पहात मनांत म्हटलें, कांहींतरी चुकलं वाटतें. ' त्याची गोंधळलेली मनःस्थिति तिच्या लक्षांत आली व म्हणाली, " तुमचं पत्र अगदीं कसं हृदयाजवळ जपून ठेवलंय " व लगेच पोलक्यांतून काढून विश्वासचें पत्र दिलें. विश्वासनें लिफाफा न पाहतां पत्र वाचण्यास सुरवात केली व परत फोटोकडे पाहिलें. तेव्हां शीलवती म्हणाली, " त्या येथल्या हिरॉईन, स्वरूपसुंदर मिस् शीलवतीबाई पाटकर आज गव्हर्नर कपच्या रेसेसना गेल्या आहेत. "

" म्हणजे तुम्ही शीलवती पाटकर नाहीं वाटतं ? "

" छे ! मी शीलवती पालकर. इकडे एक्स्ट्रांत म्हणजे राखीवमध्यें आहे. परवां एका नाचाचें शूटिंग झालें. एका कोपऱ्यांत मी नाचत आहे. ओळखाल ना मला ? आपणच मला पत्र लिहिलंत. "

" हो अगदीं नक्कीच " विश्वास म्हणाला. इंग्रजींत लिहिलेला पत्ता त्यानें पाहिला आणि कपाळाला हात लावला.

★ ★

## २७ आकाशदिवा.

लेखकः—**श्रीकृष्ण त्र्यंबक आठल्ये**, बी. ए ऑनर्स ( पुणें )

मावळत्या सूर्याच्या छटा त्याच्या देहावर पडत होत्या, आणि त्याच्या देहाचें सौंदर्य त्या प्रकाशांत विशेष खुलून दिसत होतं ! रस्त्यांतून जाणारे येणारे लोक माना उंचावून त्याच्याकडे पाहत होते. " वाः ! काय सुंदर दिसतोय हा आकाशदिवा ! "

त्या आकाशदिव्यालाही स्वतःचा अभिमान वाटत होता. आणि लोकांचे हे उद्गार ऐकले म्हणजे तर क्षणाक्षणाला त्याचा आनंद द्विगुणित होत होता.

परंतु फार आनंदानंतरच दुःख नशीबीं येत असतं ना? रजनी देवीचं साम्राज्य आतां पसरूं लागणार असं दर्शविणाऱ्या खुणा-जेव्हां हळूं हळूं दिसूं लागल्या तेव्हां इतर आकाशदिव्यांत पणत्या ठेवल्यावर तें वर चढवलेले त्याला दिसले आणि आपल्यावर अशी पाळी तर येणार नाहीं ही चिंता त्याच्या मनाला चाटून जाऊं लागली.

त्याची ती शंका अगदीं बरोबर ठरली. कारण अनंत आकाशांत इतरांचेबरोबर तोही फडकूं लागला. परंतु इतरांना वाटत असलेला आनंद मात्र त्याला वाटत नव्हता. तेवणाऱ्या पणतीकडे पाहून त्याच्या मनांत येई, 'हें संकट नाहींसं झालं तर किती छान होईल!' आणि या विचारांत मग्न झाल्यामुळें पृथ्वीवरील लोक आपल्याकडे मोठ्या कौतुकानं पाहत आहेत हें त्याला दिसलं नाहीं. आपलं देहसौंदर्य पणतीच्याच प्रकाशानं खुलून दिसतं आहे हेंही त्याच्या लक्षांत आलं नाहीं. म्हणूनच आपल्याजवळून कुजबुजत जाणाऱ्या वाऱ्याला तो काकुळतीनं म्हणाला.—

"वायुदेवा! कृपा करून माझ्यावरचं हें संकट नाहींसं करशील तर... या ज्योतीमुळं माझ्या जीविताचा नाश होणार आहे......"

वाऱ्यानंही त्याचं हें म्हणणं ऐकलंसं दिसलं. कारण वारा हंसत हंसत जेव्हां त्याचे जवळून गेला तेव्हां आकाशदिव्यांतील पणती विझली!

इतर आकाशदिवे मोठ्या ऐटीनं डोलत होते, आणि हा 'मोठ्या संकटांतून सुटलों आपण' अशा अर्थाचा निःश्वास टाकून स्वतःकडे व पृथ्वीकडे पाहत होता. लोक इतर आकाशदिव्यांकडे अगदीं डोळे लावून पाहत होते, तर वारा या आकाशदिव्याकडे उपहासानं पहात जणूं म्हणत होता.—

"काय छान शोभा आहे या आकाशदिव्याची!"

परंतु हा उपहास त्या आकाशदिव्याला मात्र कळत नव्हता!

★ ★

## २८ अकरा वर्षांचा म्हातारा !

लेखक:—वसंत अनंत शहाणे, बी. ए. (ऑ.), एल्एल्. बी.
हैद्राबाद (दक्षिण)

कोर्टांत एकच धांदल उडाली.

न्यायालय, फिर्यादी अन् फिर्यादीचे वकील या सर्वांचे डोळे एकसमयावच्छेदेंकरून विस्फारित झाले. न्यायाधिशाच्या कपाळावरच्या शिरा ताडताड उडूं लागल्या. शांतता अन् संयम हींच ज्यांच्या जीवितार्चीं चक्रें झालीं आहेत अशांना क्वचित् रागाचा पारा चढला म्हणजे त्यांच्या नाकपुड्या फुगतात तशा रागानें तांबड्या झालेल्या न्यायाधीशमहाशयाच्या नाकपुड्या अधिकाधिक फुगत होत्या. त्या संतापाच्या भरांत शाई नसलेल्या झरणीनेंच न्यायाधिशांनीं निकाल लिहिला असता ! त्यांना तो वाचतां आला असतां कीं नाहीं, कुणास ठाऊक ! कारण, त्यांचे ओठ सारखे थरथरत होते.

कारण आरोपीच्या चौथ्या साक्षीदाराची साक्ष नुकतीच आटपली होती. साक्षीदार वयस्क होता. त्याचे कपडे नीटनेटके होते. चेहऱ्यावर गांभीर्याची छटा होती. आवाजांत धीमेपणा होता. हातवारे करण्याची शैली मोठी मोहक होती. पिंजऱ्यांत उभं करण्यांत आल्यानंतर त्याला पहिला प्रश्न विचारण्यांत आला होता,

"तुमचं नांव काय ?"

"लोक मला बंडू दडके म्हणतात."

न्यायाधिशांनीं चष्मा वर करून मध्येंच विचारलं,

"तुम्ही स्वत:ला काय म्हणतां ?"

"मी स्वत:ला 'मूर्ख' म्हणतों."

न्यायाधिशानं चढेल सुरांत पुन्हां विचारलं,

"दुसऱ्यांनीं तसं म्हटलं तर तुमची हरकत आहे का ?"

यावर कोर्टानें हा प्रश्न परत घ्यावा अशी आरोपीच्या वकिलांनीं विनंती केली. ती मान्य झाल्यावर दुसरा प्रश्न असा विचारण्यांत आला कीं, "तुमचं व- किती ?"

साक्षीदारानं संथपणं उत्तर दिलं, " अकरा वर्षं. "

चाळिशी चिकटविणारा, केस पांढरे झालेला, तोंडाचं बोळकं झालेला, गालाचे कोनाडे झालेला अन् कोनाड्यांत मिणमिणणाऱ्या समईसारखा हास्याचा उजेड पाडणारा, मिशांचं उपवन झालेला, टाळूचा कॅरमबोर्ड झालेला, कानांचीं शिडं झालेला, अन् विशाल भालप्रदेशाचं नांगरलेलं शेत झालेला हा वामनाचा अवतार भरकोर्टात आपल्या वयाचं निदान करतांना खचित कुठल्या तरी काव्य–वावटळींत वहावत गेला अशी आरोपीच्या वकिलाची प्रामाणिक समजूत झाली.

न्यायाधीशमहाशयांना तें उत्तर उद्धटपणाचें वाटलें. आपला अपमान करणाऱ्या त्या साक्षीदाराचा त्यांना संताप आला.

तेवढ्यांत फिर्यादीतर्फेच्या वकिलांनीं हा साक्षीदार ' वेडा ' असल्याची शंका प्रदर्शित केली व सरकारी डॉक्टराकडून त्याची वैद्यकीय तपासणी करण्यांत यावी अशी कोर्टाला विनंति केली.

ती मान्य करण्यापूर्वी त्याला आक्षेप विचारण्यांत आला. तोंच चढ्या सुरांत साक्षीदाराचे बोल बाहेर पडले,

" ईश्वराला स्मरून सांगतों; खोटें बोलणार नाहीं; खरें बोलेन; माझी वयोमर्यादा कायद्याच्या दृष्टीनें " अकरा " हीच आहे ! "

" याचं अधिक स्पष्टीकरण करूं शकाल ? " औत्सुक्यपूर्ण जिज्ञासेनें आरोपीच्या वकिलांनीं विचारणा केली.

" याचं कारण स्पष्ट आहे. माझा जन्म दिनांक एकोणतीस फेब्रुवारी इसवी सन १९०० या दिवशीं झाला. माझ्या दुर्दैवानें माझ्या जन्म-दिवसापासून आजतागायत या क्षणापर्यंत माझे फक्त अकराच वाढदिवस झाले आहेत.

★ ★

## २९ काळी मांजरी !

लेखक–दिनकर हरि गंधे, बी. ए. ( जळगांव )

त्या गांवांतील भर रहदारीचा रस्ता होता तो. रस्ता फारसा मोठा नसला तरी गांवांतील प्रमुख चौकाकडे जाणारा असल्यामुळें व वरींचशीं दुकानें त्याच रस्त्याला असल्यामुळें नेहमीं रहदारी असायचीच–त्या रस्त्यांत एका उंच घराच्या समोर दोन मित्र बोलत उभे होते. एक दुसऱ्याला कांहीं तरी वस्तु दाखवीत होता; पण दुसऱ्याला ती धड न दिसल्यामुळें " कुठें ? कुठें ? " म्हणून तो परत परत विचारत होता ! शेवटीं चिडून पहिल्यानें दुसऱ्याचें डोकें धरून समोरच्या माडीकडे बोट करून ती पहा म्हणून म्हटलें. तोंच त्याचा आणखी एक मित्र तेथें येऊन धडकला आणि त्यानें पण उत्कंठेनें " काय रे ? काय ?" म्हणून विचारलें.

तों पहिल्यानें दुसऱ्याचा हात दाबला आणि नुकताच आलेल्या मित्राला उद्देशून म्हणाला–अरे ! ती काळी मांजरी ती पहा कौलावर—

" हं ! मग तिला काय पहायचं ! " तिसरा उत्तरला.

" काय पहायचं ? इतका तिच्या घराच्या जवळ राहतोस पण एवढी गोष्ट ठाऊक नाहीं ! अरे ! ती साधी मांजरी नाहीं."

' मग काय रानमांजरी आहे हो ? '

' अगदींच हें आहेस झालं ! तिथें एक म्हातारी होती ना ? '

' हं ! हं–ती चिक्कू म्हातारी–ती वारली ती—'

' अरे ! ती वारली कसली ? भूत होऊन बसलीय्. दररोज रात्रीं बाराला मांजरीच्या रूपानें येऊन सुनेला छळते. घरांत आली कीं, ती काळी मांजरी हातपाय वाटेल तितकी लांब करते म्हणे, आणि बोलते देखील– '

' अस्सं ! मला नव्हतं ठाऊक हें ! कुठें रे ती ? '

' ती पहा– ' म्हणून सर्व पाहूं लागले.

हमरस्ताच तो. तिथं गर्दी जमायला काय उशीर ! जवळच्या पोलीसला हे तिघे उभे असलेले माहीत होते. पण ते लवकरच जातील या समजुतीनें तो कांहींच बोलला नाहीं.

थोड्याच वेळांत रस्त्यांत खूपच मंडळी जमली आणि सर्वजण समोरच्या घराकडे पहात उभे राहिले. नवीन माणूस आला कीं, तो त्या घोळक्यांतल्या एखाद्या माणसाला विचारी–"काय हो ? काय आहे ? "

'कुणास ठाऊक काय आहे' कुणी तरी उत्तर देई.

'मग इतके लोक कशाला जमले ?' पुन्हां तो विचारी.

'भूत आहे म्हणतात बुवा ! काळी मांजरी आहे.'

भुताची ही बातमी गांवांत पसरायला मुळींच उशीर लागला नाहीं. सर्वजण भूत पाहण्यासाठीं जमूं लागले–शेवटीं सर्व रस्ता माणसानें भरून गेल्यामुळें पोलीसला तेथें जाऊन गर्दी हटवणें भाग पडलें. पण एकट्या पोलिसाचें कोण ऐकतो ! भूत पहायला जमलेली गर्दी ती ! ती काय एकट्या पोलीसला दाद देते. आसपासचे लोक सुद्धां त्या घराकडे पाहूं लागले–ते तिघेजण मात्र केव्हांच निघून गेले होते ! बराच वेळ झाला तरी भूत पहायला आलेली गर्दी कांहीं हटेना. कुणी म्हणे–पुष्कळ लोकांना पाहून तें आंत बसलंय्–तें बाहेर येतच नाहीं–रात्रीं बाराला तें परत बाहेर येईल–त्याचा रंग काळाकुट्ट असून पाय उलटे आहेत. त्याला हाताचा पंजा वाटेल तितका लांब करतां येतो वगैरे कितीतरी नवीन माहिती मिळाल्यावर तेथून हालण्याची कुणालाहि इच्छा होईना !

शेवटीं रहदारी संपूर्णपणें थांबल्यामुळें पोलीसानें ठाण्यावर जाऊन मदत आणली. लाठ्या घेऊन आलेले पोलीस पाहून कांहींनीं पळायला सुरुवात केली, तर कांहींनीं दगडफेक करायला सुरुवात केली–शेवटीं जबरदस्त लाठी हल्ल्यामुळें कांहीं लोक जखमी झाल्यावर इतर लोक पांगले–तरी पण एखाद्या अमावास्येला पहायला परत येऊं या विचारानें प्रेरित होऊन ! !

दुसरे दिवशीं गांवांत लोकांना चर्चेला विषय मिळाला–सर्वत्र लाठीहल्ल्याची चर्चा होत होती–कुणी म्हणे–'लोक भूत पहायला जमले तर सरकारचं काय गेलं ?–कुणी म्हणे तेथें कांहीं तरी कट चालला असला पाहिजे–' वगैरे वगैरे. दुसऱ्या दिवशीं पूर्ववत् ते दोघे मित्राला (नारायणला) भेटायला निघाले व त्याच्या घरासमोर येऊन थोडे थांबले. तों

जवळच्या पोलीसानें दोघांनाही पकडलें–दोघेही आश्चर्यचकित होऊन मनांत म्हणाले–हा भुताटकीचा तर प्रकार नव्हे ?–

पोलीस–‘ काल तुम्ही येथें उभे होतां कीं नाहीं ?’

एक–‘हो ! होतों. मग त्यांत काय आहे ? हा रस्ता आहे ! ’

‘ तें ठीक आहे ! रस्ता रहदारीसाठीं असतो. गप्पा मारण्यासाठीं, अन् लोकांना भूत दाखवतों म्हणून बनवण्यासाठीं नाहीं ! तुम्ही इकडे कोणाकडे निघालांत ! ’

‘माझा नारायण नांवाचा मित्र आहे त्याचेकडे–’

‘ काल तुम्ही दोघे उभे असतांना समोरच्या घरांतून नंतर आला तोच नारायण काय ! ’

‘ होय ! ’

‘मग तुम्ही त्याला–ती पहा काळी मांजरी भूत आहे म्हणून कां सांगितलं ? त्यामुळें काल येथें केवढी गर्दी जमली. त्यामुळें लाठीहल्ला करावा लागला. तुम्हीच त्याला कारणीभूत आहांत.’

‘ पोलीससाहिब, माफी कराल तर सांगतों.’

‘ सांगा तर खरं ! माफी मग पाहूं–! ’

‘ अहो ! माझ्या या मित्रानं नारायणची बहीण कधींच पाहिली नव्हती. म्हटलं मित्राची बहीण कोणती माहीत असावी. नाहीं तर एखाद दिवशीं हातून भलतंच घडायचं ! म्हणून ती गॅलरींत उभी होती ती याला दाखवत होतों. पण या बावळटाला ती कांहीं लवकर दिसेना–म्हणून मी ‘ ती पहा–ती पहा–’करीत होतों तोंच तिचा भाऊ नारायण आला–त्यानें पण काय म्हणून विचारतांच–समोर असलेली काळी मांजरी त्याला दाखवणें भाग पडलं ! आणि हें नाटक पुरं करण्यासाठीं भुताची कहाणी जोडावी लागली– !’

★ ★

# ३० खेळविते ललना

श. दा. गोखले, बी. ए. ( पुणें )

श्यामसुंदर घनश्याम बोरनारकर म्हणजे एक वल्ली होती. तुम्ही कधींहि पी. वाय्. सीच्या बाजूनीं गेलांत तरी 'डी लक्स'च्या धुराचे फवारे सोडीत, भपकेबाज कपडे घातलेला एक गृहस्थ भाव मारीत फिरतांना दिसेल. तोच हा श्याम बोरनारकर. बापानं गडगंज पैसा मिळवला होता. तो उधळायचा कसा हाच याला प्रश्न होता. बापाचं आणि चिरंजीवांचं कधींच पटलं नाहीं. त्यामुळं आज चार वर्षांत दर महिना येणारी मनिऑर्डर आली नाहीं तरच श्यामला वडिलांची चौकशी करावी लागे. बरं चार वर्षांत या कुलदीपकानं परीक्षा दिल्या का एकाच परीक्षेचा चार वर्षं सखोल अभ्यास केला याची बापानं काळजी केली नव्हती. घनश्यामराव कोल्हापूर सोडून पुण्याला आले नाहींत कीं, हा कधीं कोल्हापुरला गेला नाहीं.

...श्यामनं हल्लीं एक नवा व्यवसाय पत्करला होता. हल्लीं तो स्वतःचं लग्न जमविण्याच्या खटपटींत होता. आपण 'स्थळ' असल्याची जाणीव त्यानं आजवर अनेक मुलींना दिली होती. पण बिचारा श्याम. पुण्यांत कोणींहि त्याच्यावर प्रेम करीना. बरं श्यामचे वडील कांहीं खटपट करतील अशी मुळींच आशा नव्हती. घनश्यामरावांनीं एक राख ठेवली होती म्हणे. बाकी त्यांच्यांत कोणतेच गुण कमी नव्हते. ते दारू पिण्यासाठीं शुद्धीवर येत आणि शुद्ध हरपावी म्हणून दारू पीत असत. त्यांनीं मिळविलेल्या अलोट पैशाचं त्यांनीं काय करावं हाच प्रश्न होता.

...नयनतारा ही चित्रपटचंद्रिका पुण्याला आल्यापासून श्यामराव तिच्यावरच खुष झाले होते. तहि श्यामच्या पैशाला व त्याला भाळली होती जणु. आजकाल श्याम तिच्या गाडींतून जाई व श्यामला महिन्यांतून दोन मनिऑर्डरी मागवाव्या लागत. दिवसरात्र श्याम तिचीं स्वप्नं पहात होता. ती हें त्याचं सर्वस्व झालं होतं. तिच्या पायाशीं नोटांची रास ओतून तिचं हृदय जिंकायचा प्रयत्न होता तो. तिलाही कोणीतरी जोडीदार हवा होतासा वाटत होतें. नजरेच्या चार घावांत

तिनं श्यामला घायाळ केला होता. ती एक हात गळ्यांत घालून दुसरा हात खिशांत घालत असे. आपल्या पैशांच्या आड आपलं रूप दडून जाईल असा श्यामला विश्वास होता. त्यानं आपल्या वडिलांच्या अमूप इस्टेटीचं वर्णन तिला ऐकवलं. शिवाय वडिलांचं वय पन्नाशीच्या घरांत आल्याचं सांगून वडील म्हातारे होतांच आपल्याला जवळ करतील ही आशा दाखवली. त्या गडगंज संपत्तीचें वर्णन ऐकून नयनतारासुद्धां भाळलेली दिसली.

...असे सरासरी चार महिने गेले. श्यामरावानं आपल्या इस्टेटीची साविस्तर हकीगत कागदोपत्रीं दाखवून तिची खात्री पटवली. व चारदोन वर्षांत इस्टेट शामरावांच्या हातांत येण्याचें आश्वासन दिलें. पण लवकरच कठीण प्रसंग ओढवला. नयनतारा शूटिंगकरितां कोल्हापूरला गेली. श्याम अगदीं विरहांत जळत होता. रोज पत्रं पाठवीत होता. पण एकाही पत्राचं उत्तर येईना. सरासरी पंधरवडा गेला. पण संकटं येतात तींसुद्धां कळपाकळपानं येतात. श्यामची काळजी वाढत होती. तो कोल्हापुरलाच जायला निघणार होता. नयनतारेला कोल्हापुरला जाऊन भेटणार होता तो. पण तो ती बातमी वर्तमानपत्रांत पहातांच चकितच झाला. " नयनतारेचं लग्न " तें शीर्षक पहातांच त्याला धक्काच बसला. पूर्ण बातमी वाचतांच त्याला कळलं. नयनतारेनं त्याच्या वडिलांशीं, घनश्यामराव बोरनारकरांशींच लग्न केलं होतं. !

★ ★

## ३१ शृंखला !

लेः०—श्री. ह. न. जोशी ( औदुंबर )

विद्याधरला इरिगेशन ऑफिसमध्यें पाऊल टाकतांना कैदखान्याची आठवण झाल्यावांचून राहिली नाहीं. जिकडे तिकडे शांत. त्या शांततेंत एक प्रकारची भयाणता त्याच्या स्वच्छंदी मनाला जाणवली.

आजपर्यंत तो येथें केव्हांच आला नव्हता. कॉलेजमधलं फुलपांखरी जीवन त्याचं. त्याच्या वडिलांचे एक स्नेही–गंगाधरपंत या ऑफिसांत

कारकून होते. त्यांना कांहीं जरूरीच्या कामानिमित्त घरीं नेण्यासाठीं तो आला होता.

तपास करीत विद्याधर गंगाधरपंतांच्या हॉलमध्यें आला. गंगाधरपंत आणि त्यांच्यासारखेच कांहीं कारकून खालीं माना घालून लिहिण्यांत गुंतले होते. विद्याधरला वाटलें—हीं माणसें नसून माणसांचे निर्जीव पुतळेच आहेत. त्यानें गंगाधरपंतांना हांक मारली तेव्हां कुठें थोडीशी हालचाल आणि कुजबूज झाली. व त्याच वेळीं त्यांच्यांत कांहीं तरी चैतन्य असल्याची विद्याधरला खात्री पटली.

घरीं जाण्याची परवानगी काढण्यासाठीं गंगाधरपंत पलीकडे हेडक्लार्कच्या खोलींत गेले आणि विद्याधर शेजारच्या खुर्चीवर बसला एक निश्वास टाकून कारकूनमंडळींनीं पुन्हां लिहायला सुरवात केली. विद्याधरला तिथला प्रत्येक सेकंद तासासारखा वाटूं लागला.

विद्याधरचें घड्याळाकडे लक्ष गेलें. त्यांत पांच वाजले होते. त्यानें सहज शेजारच्या गृहस्थांना विचारलें—"कांहो—पूर्वी पांच वाजतां सुटत होतं ना तुमचं ऑफिस ?"

टाक जमिनीवर झाडीत आणि अवघडलेला पाय लांबवीत तो गृहस्थ म्हणाला—"हो—ऑफिसची वेळ सहा तासच. पण हल्लीं काम अधिक असल्यामुळें एक तास वाढविला आहे साहेबांनीं."

विद्याधरला वाटलें, हे कारकून म्हणजे मेंढरेंच जणुं ! वाटेल तेव्हां कोंडावींत व वाटेल तेव्हां सोडून द्यावींत. हूं कीं चूं करायचीं नाहींत कधीं.

विद्याधरला नोकरीविषयीं पहिल्यापासूनच तिरस्कार वाटे. शाळेंतल्या मासिकांतून तो नोकरीच्या ठराविक चाकोरीवर नेहमीं कोरडे ओढी. डिबेटिंगमध्यें—नोकरी ही लोखंडी बेडी आहे—ती मोडून तोडून फेकून दिली पाहिजे—असें त्यानें अनेकदां जोरानें प्रतिपादिलें होतें.

शेजारच्या खोलींतून मोठ्यानें आवाज येत होता म्हणून विद्याधरचें लक्ष तिकडे गेलें.

हेडक्लार्कसाहेब बोलत होते—"लाज नाहीं वाटत ! हजारदां सांगितलं तरी समजत नाहीं या लोकांना. तुमचीं कामं रोज निघतील—म्हणे नड

आहे—नर्डी असतील तर घरांत बसा—इथली कामं काय तुमच्या बापानं करायचीं ? ''

विद्याधरनें पुढें ऐकलें नाहीं. गंगाधरपंतांना हा आहेर आहे—हें त्यानें ओळखलें. हेडकारकुनाच्या अरेरावी भाषणाची त्याला चीड आल्यावांचून राहिली नाहीं. थोड्या वेळानें गंगाधरपंत आले. घरीं जाण्यास परवानगी मिळाल्याचें समाधान त्यांच्या मुद्रेवर दिसत होतें. गंगाधरपंतांनीं दप्तर बांधून ठेवलें—आणि विद्याधरबरोबर ते बाहेर पडले.

विद्याधरला वाटलें—सुटलों एकदां या कोंडवाड्यांतून. बाजूला वाहणाऱ्या कॅनॉलच्या कांठावर पक्षी किलबिलाट करीत इकडून तिकडे उडत होते. समोरच्या मैदानावर मुलें फुटबॉल खेळण्यांत दंग झालीं होतीं. विद्याधरला ऑफिसमधल्या नि बाहेरच्या वातावरणांत जमीनअस्मानाचें अंतर भासलें. आंत पारतंत्र्य होतें—बाहेर स्वातंत्र्य होतें. रस्त्यावर कुणी गात होतें—" त्यजा हा नोकरीपेशा, कशाला शृंखला पायीं ! '' विद्याधर घरांत आला तो देखील, " त्यजा हा नोकरीपेशा, कशाला शृंखला पायीं ! '' हा चरण गुणगुणतच. त्यानें गंगाधरपंताच्या लाचार जिण्याला खूप नांवें ठेवलीं. गंगाधरपंत मान खालीं घालून मुकाट्यानें सर्व ऐकत होते.

* * * *

त्यानंतर दोन वर्षें केव्हांच निघून गेलीं. आज इरिगेशन ऑफिसांत नव्या हेडक्लार्कच्या आगमनानिमित्त मोठा समारंभ होता. ऑफिसमधले कारकून नि गडीमाणसें अहमहमिकेनें झटत होतीं. अन् त्यांत विद्याधरची धांदल तर विचारूंच नका !

कुणाला सांगूनही खरें वाटलें नसतें कीं, कॉलेजमध्यें असतांना कारकुनीपेशावर भरमसाट टीका करणारा विद्याधर तो हाच ! ! पण जाणाऱ्या हेडक्लार्कचा तो आवडता कारकून बनला होता, आणि येणाऱ्या हेडक्लार्कची मर्जी कशी सांभाळावी याचे बेत तो आंखीत होता. कारण दरम्यान त्याचें लग्न झालें होतें, संसार वाढला होता आणि ध्येयें विसरलीं गेलीं होतीं !

## ३२ मोती.

लेखक : सौ. मीरा पुराणिक (मुंबई)

दरवर्षीप्रमाणें यंदाही मला डॉक्टरनें उन्हाळ्याच्या सुट्टींत मुंबईला बोलाविलें होतें. माझ्याशीं डॉक्टर व वहिनी फार सहानुभूतीनें वागत असत व त्यांची सात वर्षांची छोटी मीना तर मी त्यांच्याकडे गेल्यावर मला पळभर सुद्धां सोडत नसे. दुर्दैव लहानपणापासूनच माझ्या मागें हात धुऊन लागलं होतं. वडिलांना स्वर्गांत पाठवून एक महिन्यानें मी पृथ्वीवर आलों. पैशाच्या अभावीं शिक्षण झालं नाहीं. कसाबसा मॅट्रिक होऊन मास्तरकी केली व यंदांच सेवानिवृत्त झालों. मला जवळचे असे कोणी नातेवाईक नव्हते. बरं जाऊंद्या त्या गोष्टी. काय सांगत होतों तुम्हांला ! हो, मला डॉक्टरनें बोलावल्यामुळें उन्हाळ्याची सुट्टी लागतांच दुसऱ्या दिवशीं आमची स्वारी वऱ्हाडांतल्या एका लहान स्टेशनवर गाडींत बसून दुसरे दिवशीं मुंबईस पोंहचली.

स्टेशनवर बापू ( डॉक्टरला बापू म्हणत असत ) एकटाच पाहून मीं मीनाची चौकशी केली. दरवर्षी बापूबरोबर ती सुद्धां मला घ्यायला स्टेनवर येत असे. बापूनें " मीनाला सर्दी झाल्यामुळें आणलं नाहीं " असें सांगितलें. मीना—माझी मीना—मला उगीचच हुरहुर लागली अगदीं.

मीना गरम कोट अंगांत घालून माझी वाट पहात दिवाणखान्यांत उभी होती. मला पाहतांच, " काका आले ! काका आले " म्हणून तिनें टाळ्या वाजवून नाचायला सुरुवात केली. चहा वगैरे झाल्यावर तिनें बापूची व वहिनींची गाऱ्हाणीं माझ्याजवळ सांगावयाला सुरुवात केली. तिचे आईवडील नेहमीं कामांत असत. मी रिकामटेकडा होतों व मुलांचाच मास्तर असल्यानें मोठेपणा विसरून जाऊन मीनाशीं तिच्याच वयाचा होऊन खेळत असे. त्यामुळें ' काका ' तिला अगदीं मायेचा वाटे. ती म्हणाली " किनई काका, मला चौपाटीवर जाऊन शिंपा गोळा करायला आवडतात व वाळूचे किल्ले पण करायला आवडतात. पण दोनचार दिवस झाले मला सर्दी झाली म्हणून आई न् बाबा मला समुद्रावर फिरायला जाऊं देत नाहींत हो काका. आईला म्हटलं ' तूं

शिंपा आणून दे, तर' ती म्हणाली ' मला काम आहे. ' बाबांना सकाळीं फिरायला जातांना म्हटलं, ' तुम्ही आणून द्या शिंपा ' तर त्यांनीं दोन-तीनच आणल्या. मी ' थोड्या कां आणल्या ' म्हणून विचारलं तर म्हणाले ' माझी दवाखान्यांत जायची वेळ झाली. उद्यां तुझे काका येतील त्यांना पुष्कळ शंख शिंपले आणायला सांग आणि तुझी सर्दी बरी झाली म्हणजे काका बरोबर रोज फिरायला जात जा. मग काका मी बरी झाल्यावर फिरायला येईन पण उद्यां मला शिंपा आणून द्याल नं ? '' मी तिला शिंपा गोटे वाळू सगळें आणून द्यायचें कबूल केलें. दिवसभर ती माझ्याशीं खेळली आणि निजतांना सुद्धां माझ्याकडून शिंपा आणण्याचें कबूल करवून माझ्याजवळच ती निजली. मला वाटे, अशी मुलगी मला असती तर किती जीवंतपणा आला असता माझ्या निर्जीव जीवनांत !

बापूचा पहाटें फिरावयाला जावयाचा नियम असे. मला आळस आला होता तरी मीनाला कबूल केलें होतें म्हणूनच त्याच्या बरोबर चौपाटीवर गेलों. समुद्र दूरवर आंत गेला होता. मी वाळूंत बसून शिंपा गोळा करूं लागलों. बापू पुढें फिरावयाला गेला. शिंपा—रिकाम्या शिंपा......

एकाएकीं बापूनें मला ' शाम ' ' शाम ' म्हणून जोरानें हांका मारल्या. मीं हातानें ' नाहीं येत ' म्हटलें, पण त्यानें ' हा पहा मोती सांपडला ' म्हणून जोरानें आरोळी दिली. मला फटिंगाला मोत्यांची काय किंमत ? पण मीनाची आठवण येतांच मीं धांवतच बापूकडे गेलों.

तिथें जाऊन पहातों तो काय ? बापू एका नवजात मुलीच्या गळ्या-भोंवतालचा नाळेचा वेढा काढून तिला मफलरमध्यें गुंडाळीत होता. मला पाहतांच त्यानें त्या गोजिरवाण्या बालिकेला माझ्या समोर धरून म्हटलें, '' हा पहा मोती ! तूं नेहमीं म्हणत असतोस मला जीवन रुक्ष वाटतं—मला ना लहान मूल ना बाळ. आमच्या मीनासाठीं वऱ्हाडांतून येतोस येथवर दरवर्षीं. जीवनाच्या कांठावरचे रिकामे शिंपले चिवडीत बसला आहेस तूं ! कुणीतरी अभाग्यानें फेंकून दिलेला हा मोती तुझ्या स्वाधीन करीत आहे मी. तुझं सारं जीवन उजळील तो. '' मी त्या जीवाला जवळ घेतलें आणि म्हणालों '' मीना—माझी मीना !''

★ ★

## ३३ कलावन्त.

लेखकः—श्री. दि. वि. जोशी.

दरवर्षीप्रमाणें यंदांही प्रदर्शन भरलें.

या वर्षीचें प्रदर्शन विशेष पाहाण्यासारखें होणार ही आशा प्रत्येकजण व्यक्त करीत होता.

त्याला कारणही तसेंच होतें. ज्या दोन कलावन्तांना गतवर्षी पारितोषिकें देण्यांत आलीं त्यांतला एक भोपळ्यासारखा बुटका नि एक पडवळासारखा उंच होता. त्यांपैकीं बुटक्याला पहिलें पारितोषिक मिळालें. उंच कलावन्त थोडा हिरमुसलाच झाला!

दोघांनींही एकमेकांकडे पाहिलें. बुटक्याच्या डोळ्यांतून गर्व ओसांडून वाहत होता. तो म्हणत होता, "तुला कुठलं पहिलं पारितोषिक मिळणार?"

तर उंच कलावन्ताच्या डोळ्यांतून तिरस्कारी भाल्याची फेक होती. तो म्हणत होता—

"पुढच्या प्रदर्शनांत बघ! मलाच पहिलं पारितोषिक मिळतं कीं नाहीं तें!"

त्या प्रदर्शनापासून आपल्याला पहिलें पारितोषिक मिळावें म्हणून दोघेही जेरीस पेटले होते.

याचमुळें या वर्षी शिल्पकला प्रदर्शनाकडे माणसांची ही रीघ लागली होती! कुणीतरी शिगोशीग भरलेल्या "वेस्टपेपर बास्केट—" मधल्या कागदांच्या चिपाट्या फेकल्याप्रमाणें मंडपाबाहेर माणसं इतस्ततः पसरलीं होतीं. जो तो प्रदर्शनांत ठेवलेल्या एका मूर्तीची—'एका हाताची' प्रशंसा करीत होता. कांचेआड ठेवलेल्या त्या हातावरच्या शिरान् शिरा, रोमन् रोम, नखें, सुरकत्या इतक्या सुंदर काढल्या होत्या कीं कुणी म्हणत—"हा कलावन्त प्रति ईश्वरच आहे."

त्या हाताला पहिलें पारितोषिक मिळालें हें जाहीर झालं. बक्षिससमारंभाचे दिवशीं त्या कलावन्ताचें नांव पुकारण्यांत आलें. उंच कलावन्त बुटक्याकडे उपहासाचा तीव्र कटाक्ष फेकून पुढें गेला. तोंच बुटका ओरडला.

" हा हात यानें दुसरीकडून घडवून आणला नसेल कशावरून ? "

सभामंडप शान्त झाला !

व्यासपीठावर चढून तो उंच कलावन्त म्हणाला:–"या हातासाठीं मला किती प्रयास पडले याची कल्पना नाहीं तुम्हांला ! पण खरा कलावन्त कलेसाठीं आपलं जीवनसर्वस्व खर्च करतो. हा हात माझाच आहे. याचा मजजवळ पुरावा आहे. "

इतकें बोलून त्यानें अंगावरचा कोट नि शर्ट काढला. आणि–आणि–साऱ्यांना दिसलं–त्या कलावन्ताचा डावा हात कोंपरापासून कापून काढलेला होता–ती जखम अजून ओली होती !

तोच हात त्या पेटींत ठेवलेला होता.

★ ★

## ३४ रंभा

लेखक : राजा कुलकर्णी, (सांगली)

" सर आहेत का घरीं ? " बाहेरून कोणाचातरी आवाज आला.

" कोण आहे ? " असं म्हणत निर्मलाताई–प्रोफेसरीणबाई–माजघरांतून बाहेर ओटीवर आल्या.

" जेवायला बसलेत. थोडंसं थांबा. कोण आलंय् म्हणून सांगायचं त्यांना ! "

" एफ्. वाय्. मधली मिस् रंभा रांगणेकर आलीय् म्हणून सांगा सरांना. डिफिकल्टीज आहेत. म्हटलं विचाराव्यात सरांना. असं ती मुलगी बोलत असतांच अरविंद माजघरांतून टॉवेलाला हात पुशीत बाहेर आले.

प्रो. अरविंदनीं रंभाच्या शंका समजावून सांगितल्या. रंभा घरीं परतण्यासाठीं निघाली. जातां जातां रंभा म्हणाली, " आभारी आहे मी आपली. तुमचा अमूल्य वेळ..." हें वाक्य पुरें होतें न तोंच अरविंद उद्गारले, " आभार कसले मानायचे यांत. येत जा नेहमीं, शंका विचारीत जा तुम्ही. " यावर रंभानं अरविंदाकडं कृतज्ञतेनं पाहिलं.

*  *

त्यानंतर दोन वर्षं रंभा वरचेवर अरविंदकडं येत असे. रंभा निर्मलाताईंची मैत्रीण झाली होती. ती अरविंदकडं येई नि त्यांच्याशीं तासन्‌तास गप्पा मारीत असे. निर्मलाताईंच्या सुशिक्षित मनाला रंभाच्या नि अरविंदच्या या वागणुकीचा केव्हांही संशय आला नाहीं. पण आज—

वाड्यांतल्या सगळ्या बायका एकत्र जमून गप्पा मारीत होत्या. निर्मलाताई सहज बाहेर आल्या. "...पण त्यांच्या बायकोला—निर्मलाताईंना—नको का कळायला हें ? चांगली शिकलीसवरलेली आहे म्हणे. आज विद्यार्थिनी म्हणून घरीं येतीय् उद्यां सवत म्हणून नाकावर टिच्चून येईल तेव्हां कळेल निर्मलाताईंना !" पुढचे शब्दही ऐकवेनात त्यांना. निर्मलाताईंना पायाखालची जमीन सरकतीय् असें वाटलं. निर्मलाताईंच्या डोळ्यांना अंधेरी आली नि 'रंभा रांगणेकर' नि 'सवत' हींच अक्षरं चकाकत आहेत असं दिसूं लागलं त्यांना.

निर्मलाताई अरविंदांच्या खोलीकडं आल्या. अरविंद खोलीत नव्हते. त्या जास्तच चिडल्या. त्यांचा गडी बाहेरून आला. "काय रे ? कुठं गेला होतास इतका वेळ ?"

"पोस्टांत गेलों होतों माईसाहेब ! पत्र आजच्या आज जायला पाहिजे होतं तें. सायबांचं रंभा रांगणेकरांना एक पत्र होतं. तें अगदीं जलदी पोचायला पाहिजे व्हतं." गडी उद्गारला.

'रंभा रांगणेकर' या शब्दानं त्या भयंकर चिडल्या.

नि "पुरे पुरे तुझी बडबड !" निर्मलाताई कडाडल्या.

"सर आहेत का ?" बाहेरून ओळखीचा आवाज आला.

"कोण आहे !" निर्मलाताई खेकसल्या.

"मी—रंभा रांगणेकर"—बाहेरून आवाज आला.

निर्मलाताईंच्या कपाळाला आठ्या पडल्या. रागानं तोंड लाल झालं.

"केव्हां येतील ?"

"मला नाहीं ठाऊक !" निर्मलाताई त्राग्यानं उत्तरल्या.

*　　*　　*

अरविंद त्यावेळीं कॉलेजला गेले होते. चहाची वेळ होती. सैंपाकघरांत

निर्मलाताई नि एक पाहुणा बसला होता. निर्मलाताई पाहुण्याला उद्देशून हुंदके देत नि डोळ्यांत आसवें आणीत म्हणाल्या, " असं झालंय् बघा भाऊजी. दैवच माझ्यावर उलटलंय्. "

" पण निर्मलावहिनी, मला नाहीं वाटत अरविंद असं करील म्हणून !" नवा पाहुणा उद्गारला.

" मलासुद्धां असंच वाटत होतं पण..." निर्मलाताई सद्गदित होऊन म्हणाल्या. " पण भाऊजी, कालच त्यांनीं पत्र टाकलंय् तिला ! "

" खरंच ! "

" हो ना ! त्यांच्याच कॉलेजांत असते ती. "

" हो का ! मग अरविंदला विचारतोंच काय तें. "

बाहेरून अरविंदच्या बुटाचा टक् टक् असा आवाज आला. टायची गांठ सैल करीत तो सैंपाकघरांत आला. तिथं गंभीर वातावरण होतं. अरविंद पाटावर येऊन बसला.

" मित्रानं खरं पाह्यलं तर मित्राच्या खाजगी भानगडींत पडूं नये. पण मला राहवत नाहीं. अरविंद, तूं असा असशील असं वाटलं नव्हतं मला. निर्मला वहिनींसारखी सद्गुणी पत्नी मिळाली असून—"

" म्हणजे आहे तरी काय भानगड ? "

" भानगड आहे तुझीच. तुझ्या प्रेमाच्या चाळ्याची. कालचाच पुरावा. कालच तूं एका पोरीला जरुरीचं पत्र..."

" अरे पण ऐकून तरी घे. "

" मला तें कांहीं ऐकायचं नाहीं. "

वरील संवाद चालूं असतांच " निर्मलाताई ! निर्मलाताई !!" अशी बाहेरून हांक आली. रंभा आंत आली. तिच्या हातांत एक पाकिट होतं. " निर्मलाताई ! आपल्याकडं कोणी पाहुणे आलेत का ? "

" हो, का ? तोच मीं. " पाहुणे म्हणाले.

" त्याचं एक पत्र आलंय् पत्ता बदलून माझ्याकडे. पोस्टमन रंभा रांगणेकर म्हणाला म्हणून तें मीं घेतलं नि फोडलं तों मजकूर दुसऱ्याचाच अगदीं निराळाच, एस्क्यूज मीं, हं ! " असं म्हणत तिनें निर्मला-

ताईच्या हातांत पाहुण्याचं पत्र दिलं. निर्मलाताई पत्ता न्याहाळीत म्हणाल्या,

"भाऊजी, तुमचं नांव काय ?"

"रंगनाथ भास्कर रांगणेकर"—पाहुणे उद्गारले.

"इश्श्य ! तुमच्या नांवानंच माझी फसगत केली कीं ? इकडच्यंच परवां पाठविलेलं पत्र आहे वाटतं हें."

त्या पत्रावर रं. भा. रांगणेकर असा पत्ता लिहिला होता.

* *

## ३५ दोन आगी.

लेखक : कुमार गोविंदानुज.

—एवढी मोठी इमारत जळाली. हळहळ वाटणं साहजिक होतं.

—सहानुभूति दाखविण्याला आम्ही गेलों.

—'असं नुकसान होऊं नये कुणाचं !' वगैरे समजूत घालूं लागलों.

—शेटजी हंसून म्हणाले, 'लेको, कां वाईट वाटून घेतां ? इच्यावर मला आतां दोनतीन असल्या इमारती बांधतां येतील...मीं विमा काढला होता.'

* * *

—एका उदात्त हृदयाचा प्रेमभंग झाला होता.

—हृदयाला लागलेली आगच ती. हळहळ वाटणं साहजिक होतं.

—सहानुभूति दाखविण्याला आम्ही गेलों.

—कविराज हंसून म्हणाले, 'हात्रे. वाईट एवढं कां वाटून घेतां ? या प्रेमभंगाच्या पुंजीवर मला आतां छप्पन्न असलीं प्रेमं मिळवतां येतील...मीं खंडकाव्य लिहिलंय् यावर एक !'

* *

# ३६ त्याचा आदर्श

ले. श्री. नारायण दत्तात्रय ताडफळे ( महाड ).

कॉलेजें नुकतींच सुरू झालीं होतीं. ज्यूनियर बी. ए. चें स्वच्छंदी वर्ष घालवावयाचें होतें यंदा ! परंतु फुलपांखरी जीवनाचें सुख माझ्या नशिबीं नसल्यामुळें त्या वर्षाबद्दल ज्या कादंबरीमय कल्पना प्रसृत होतात त्यांकडे लक्ष देण्यापेक्षां या वर्षीं जीविनोपयोगी असा कांहीं कार्यक्रम आखावयाचें ठरविलें. अभ्यास होताच ! त्यांत मुख्याध्यापकांनींच एका सूचनेद्वारां आमचा मार्ग मोकळा केला. टी. डी. च्या परीक्षेला बी. ए. चा अभ्यास चालू असतांनाच बसतां येणार होतें. मीं माझ्या चारपांच सहकार्यांकरवीं या गोष्टीचा फायदा करून घ्यावयाचें ठरविलें. वर्गांत नांवें घातलीं. व्याख्यानें सुरू झालीं. प्रात्यक्षिकें सुरू झालीं.

प्रो. अनंतराव सप्तमुखे यांचें आज पहिलेंच व्याख्यान होतें. प्रो. सप्तमुखे हे आमच्या शाळेंत शिक्षक होते. टी. डी. चा अभ्यासक्रम सुरू झाल्यावर त्यांची बढती झाली होती. आजचे प्रोफेसर म्हणून पहिलेंच व्याख्यान मी ऐकत होतों. सुंदरशी प्रस्तावना झाली. सडेतोड युक्तिवाद व धावती भाषाशैली यामुळें प्रोफेसर मजकुरांची छाप विद्यार्थी शिक्षकांवर पडली यांत नवल तें काय ? शिक्षणकलेबाबत एका ख्यातनाम पंडितांचीं वचनें सांगत सांगत ते शिक्षक कसा असावा या मुद्यावर आले. त्यांची विषय मांडण्याची हातोटी मोठी विलक्षण होती. त्यांच्या मुखांतून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द आमच्या अंतःकरणांत जाऊन पोहोंचत होता— अगदीं घर करून राहात होता. ते म्हणाले, " शिक्षक, मग तो प्राथमिक असो, दुय्यम असो व प्रोफेसर असो. तो निर्व्यसनी असावा. त्याला सुपारी सिगारेटींचेंही व्यसन असूं नये. He must be above suspicion. He must be morally par excellence. टाळ्यांच्या गजरांत वर्ग सुटला. प्रोफेसर सप्तमुखे यांची तारीफ करीत सारे शिक्षक बाहेर पडले. परंतु मी मात्र शेवटल्या त्यांच्या वाक्यानें जरा नाराज झालों होतों. त्यांच्या विद्वत्तेबद्दल शंकाच नव्हती. वक्तृत्वाची कमाल होती. परंतु—

★ ★

रात्रीं बाराचा सुमार असेल. प्रो. सतमुखे यांच्या फ्लॅटच्या पुढील दरवाजांत उभा होतों मी. माझ्या टोळभैरवांसमवेत शेजारच्या फ्लॅटमध्यें राहात असे! आंत बाटल्यांचें बूच फाडफाड उडत होते, आणि सोड्याच्या बाटल्या थाडथाड फुटत होत्या. दरवाज्याच्या फटींतून आंतल्या पार्टीकडे पहातांच He must be above all suspicion ची पूर्ण कल्पना आली—आणि प्रवचन आणि आचरण यांतला फरक चांगला कळून आला.

★ ★

## ३७ पंडित

लेखक : दी. ना. पळशीकर, (हैद्राबाद दक्षिण)

तो एक अति विद्वान् पंडित होता. सदा न् कदा तो आपलें डोकें गूढ ग्रंथांत खुपसून बसलेला असे. अध्ययनांत त्याला इतर व्यवसाय करतां येत नसत, व मग त्याजवर उपाशी राहण्याची पाळी येई. आतां त्याला कोणीच माधुकरी अथवा भीक घालीनासे झाले होते. प्रत्येकजण म्हणे,

" निरुद्योगी आहे लेकाचा! कष्ट करावेत अन् अन्न मिळवावं.. जगांत कुणी कुणाला फुकट पोसायचा पत्कर घेतला नाहीं. "

—तरी पण तो बिचारा पंडित पोटाला मारून आपलें ग्रंथाध्ययन करीतच होता. त्याला वाटे, पोटापेक्षांही बौद्धिक भूक अधिक श्रेष्ठ प्रतीची आहे. पोट काय कुत्रेंसुद्धां भरतें !

एके दिवशीं तो असाच नेहमींप्रमाणें एक अमूल्य नि दुर्मिळ ग्रंथ अभ्यासित असतांना त्यांतील कांहीं पानें किडीनें खाल्ल्याचें त्याच्या निदर्शनास आलें. त्या ग्रंथाची ती दुरवस्था पाहून त्याला फार वाईट वाटलें.

—इतक्यांत त्याची नजर ग्रंथाचीं पानें खात असलेल्या एका लहान किड्यावर गेली. ती मूर्ति लहान होती, पण तिचा पराक्रम—

त्याला अस्सा राग आला त्या किड्याचा. क्रोधानें तो आतां त्याला चिरडणार, इतक्यांत तो किडा नम्रतेनें म्हणाला,

" पंडित महाराज, मला गरिबाला मारून पापांत पडूं नका. आपण दोघे एकाच जातीचे—अगदीं सख्खे भाऊ आहों. ग्रंथ आपणां दोघांनाहि सारखेच पूज्य आहेत. "

पंडित त्याच्याकडे तुच्छतेनें पहात उत्तरला,

" मूर्खा, ग्रंथ निदान तुला तरी 'पूज्य' आहेत यांत शंका नाहीं. अन् लहान तोंडीं घांस घेऊन मला पापपुण्याची शिकवण देतोयस् ! आजपर्यंत पापपुण्याच्या विषयावर शेंकडों ग्रंथ मीं वाचले आहेत, आणि तूं रे मला काय शिकविणार चिमुरड्या ! "

यावर किड्यानें आपल्या लांब मिशा हलवीत ऐटींत उत्तर दिलें,

" पंडितमहाराज, तसे तर मीं आजपर्यंत अनेक ग्रंथ पचविले आहेत. मग आपल्या म्हणण्याप्रमाणें ' पंडित ' या बहुमानाला मीच अधिक योग्य नाहीं का ? "

किड्याचें तें अहंकाराचें भाषण पंडिताला रुचलें नाहीं. त्याची परीक्षा घेण्यासाठीं त्यानें त्या किड्याला अनेक ग्रंथांतील असंख्य प्रश्न विचारले. किडा उत्तरला,

" पंडितमहाराज, मला आपल्या या गहन प्रश्नांचीं उत्तरें आणखी अनेक जन्म ग्रंथांच्या सहवासांत घालविले तरी देतां यावयाचीं नाहींत. आतां मी आपणास एक साधा, ग्रंथाबाहेरील व्यवहारांतला प्रश्न विचारतों. त्याचें उत्तर आपण द्यावें. आपण आजपर्यंत अनेक जाडजूड ग्रंथ दिवस-रात्र अभ्यासिले आहेत; 'पण त्यांवरून जीवन कसें जगावें ? ' हें आपण शिकलां काय ? जगांत नुसतें ' पंडित ' बनून चालत नाहीं. नुसत्या विद्वत्तेनें मधल्या वेळची भूक मागत नाहीं. आपण जीवन जगण्याचा ' महाग्रंथ ' वाचलां का ? "

पंडित निरुत्तर झाला. त्याचा अहंकार विरला. त्यानें शरमेनें खालीं मान घातली. किडा पुढें म्हणाला,

" या ग्रंथावरून जीवन कसें जगायचें ? तें मी शिकलों आहे, नव्हे, हे ग्रंथ हेंच माझें जीवन आहे. या ग्रंथाची समाप्ति म्हणजेच आमच्या

जीवनाची समाप्ति, इतकें आम्ही एकजीव झालों आहों; पण आपला 'जीवनग्रंथ' उघडून आपण तो कधीं चाळला आहे का, कीं त्याची समाप्ति—"

पंडिताची वाचा बसली. त्यानें हातांतील ग्रंथ त्या किड्याचें पुन्हां दर्शन नको म्हणून जोरांत बंद केला. शिलकींतील इतर सर्व ग्रंथ बाहेर काढले व त्याचा एक भला मोठा गठ्ठा बांधून तो माळ्यावर अडगळींत फेकून दिला आणि कांहींतरी काम मिळविण्यासाठीं म्हणून तो बाहेर पडला.

★ ★

## ३८ क्रान्तिवीर

लेखक : श्री. दिगंबर प्रल्हाद रेखी (पुणें)

अंगावरचं पांघरूण जरा त्यानं सांवरल्यासारखं केलं अन् किलकिल्या डोळ्यांनींच समोरच्या टेबलावरील टाईमपीसकडे नजर टाकली—आतांशीं कुठं साडेसहा वाजत होते. आज रविवारच असल्यामुळें आणखीन् एक दीड तास तरी उठण्याचा त्याचा विचार नव्हता अन् म्हणून तो उजव्या कुशीवर वळला...

आणि तो डोळे मिटून घेतो न घेतो तोंच कुणीतरी दारावर टिक् टिक् करीत असल्यासारखं त्याला वाटलं "काय कटकट आहे बुवा सकाळींच इतक्या लवकर "असं कांहींसं त्रासिक मुद्रेनंच पुटपुटत अंगावरलं पांघरूण दूर लोटलं अन् त्यानं दार उघडलं.

चांगलाच चमकला तो! डोळ्यावर काळा चष्मा चढविलेली, दाढी वाढविलेली नि पोशाखावरून जरा भयानकच वाटणारी एक अपरिचित व्यक्ति दारांत उभी होती!

अरविंदनं "कोण आहांत आपण?" असं कांहींतरी विचारण्याच्या आंतच आपल्या हातांतली ब्याग सांवरीत ती व्यक्ति एकदम आंत

शिरली नि आपल्या हातानें दार लावून घेऊन बोल्टही लावून टाकला त्या व्यक्तीनं. आश्चर्यंच वाटलं या साऱ्या गोष्टींचं अरविन्दला !

आणि मग अरविंदच्या जवळ येत ती व्यक्ति हलकेंच कांहींतरी कुजबुजली...

अरविन्दच्या मुद्रेवर आतांपर्यंत दिसून येत असलेल्या आश्चर्याच्या छटा मावळल्या अन् त्यांची जागा आनंदाच्या छटांनीं घेतली. आपला पत्ता शोधीत शोधीत एक प्रसिद्ध क्रान्तिवीर आपल्या खोलींत येऊन आपल्याशीं बोलतो—नव्हे आपल्यावर संपूर्ण विश्वास टाकून धोक्यांत असलेला एक जीव—भारताच्या स्वातंत्र्याचा प्राण—निर्धास्तपणें आपल्या खोलीचा आश्रय घेतो." आनंदाचे रोमांचच उभे राहिले त्याच्या अंगावर या विचारानें. खरंच किती भाग्यवान् आहोंत आपण !

मग तीं दोघेहि किती तरी वेळ गप्पा मारीत होतीं. अरविन्दनं आज खोलीवरच जेवण मागवलं. त्या क्रान्तिवीराच्या सहवासांतील क्षणन् क्षण त्याला मोलाचा वाटत होता. आठ ऑगस्टवाल्यांत नी नऊ ऑगस्ट-वाल्यांत कुठं तीव्र मतभेद आहे, भूमिगत क्रान्तिवीरांनीं कार्याचा काय आराखडा आंखला आहे—अन् बाहेर असलेल्या स्वातंत्र्यप्रेमी जनतेनें या वेळीं काय केलं पाहिजे, प्रत्येक प्रश्नाचा उहापोह होत होता अन् आपल्या अधिकारवाणीनं हलक्या आवाजांत तो क्रान्तिवीर त्याला कांहीं सूचना देत होता अन् तोहि गंभीर मुद्रेनं सारं कांहीं ऐकत होता.

कसल्यातरी अननुभूत आनंदाच्या लहरी चमकून जात होत्या अरविंदच्या मनांत ! रात्रींहि बराच वेळ ते निरनिराळ्या विषयांवर गंभीर चर्चा करीत होते.

डोळ्यावर झांपड येऊं लागली आणि मग मात्र पाहुण्यांची झोपण्याची व्यवस्था करून अरविन्दनं बिछान्यावर अंग टाकलं अन् मग मात्र झोप कधीं लागली हें त्याला समजलं नाहीं.

सकाळीं उठला तों जरा नेहमींपेक्षां लवकरच जाग आल्याचं त्याला आढळलं. पडल्यापडल्याच त्यानं खोलींत नजर टाकली आणि तो एकदम दचकला.—

अनुक्रम ७७

पाहुण्यांचं अंथरूण व्यवस्थित गुंडाळून ठेवलेलं दिसत होतं आणि काल पलीकडच्या कोपऱ्यांत ठेवलेली त्यांची ब्याग तिथं दिसत नव्हती. त्याला एकदम कसलीतरी शंका आली आणि झटकन् उठून तो टेबला-जवळ गेला......

त्याची शंका खरी होती तर ? रात्रीं झोपण्यापूर्वी काढून ठेवलेलं त्याचं गोल्डन् रिस्टवॉच तिथं कुठंच दिसत नव्हतं ! शेजारच्या खुंटाळ्याला अडकविलेल्या कोटाचे खिसे त्यानें चासपले. खिशांत ठेवलेलं फौन्टन्पेन अन् पैशाचं पाकीटहि अदृश्य झाल्याचं त्याच्या लक्षांत आलं !

मग मात्र त्याच्या चेहरा एकदम उतरला. अन् विषण्ण मुद्रेनं झालेल्या अकल्पित प्रकाराबद्दल विचार करूं लागला—

असाच तो बराच वेळ बसला आणि मग कल्पना नसतांहि भैय्या कुलकर्णीनं जोरानं दार ढकलून आंत प्रवेश केला आणि त्याच्या मागो-माग एक देखणा ऐटबाज कॉलेज तरुणहि खोलींत शिरला...

" आश्चर्यच वाटलं ना तुला ? " भैय्या कुलकर्णीनं बोलायला सुरवात केली. " हे माझे मुंबईचे स्नेही—सतीश गोडबोले—मुंबईला असतात कॉलेज-मध्यें—मागं एकदां कधींतरी त्यांच्या नाट्यकलेंतील अभिनयकौशल्याचा तुझ्याजवळ उल्लेख केलेला तुझ्या स्मरणांत असेलच. "

—आणि मग बोलतां बोलतां अरविन्दनं झालेली अकल्पित नि चमत्कारिक गोष्ट सचिंत मुद्रेनं सांगितली.

दोघांनींहि अगदीं गंभीर मुद्रेनं तो काय सांगत होता तें ऐकलं अन् शेवटीं भय्यानं आपल्या खिशांतून त्याचं रिस्ट वॉच, फौन्टनपेन नि पैशाचं पाकीट काढलं अन् अरविन्दच्या हातीं देत तो म्हणाला, " अरू, मागें तूं बढाई मारली होतीस कीं आपण कधीं फसले जाणार नाहीं सोनेरी टोळीवाल्यांकडून. " त्या वस्तूकडे अरविन्द अद्यापहि विस्फारित नजरेनं पहात होता.

" पहातोस काय वेड्यासारखा असा " भैय्या चटकन् म्हणाला, अरे हाच तुझा कालचा क्रान्तिवीर ! बाकी आपल्या अभिनयनैपुण्यानं चांगलंच चकवलं हं तुला स्वारीनं ! मित्र होता म्हणून ठीक—नाहींतर चांगला फटका बसला असता शेंदोनशेंचा "

आपण मात्र कसें सहज बनलों गेलों याचंच अरविन्दला सारखं आश्चर्य वाटत होतं !

—यापुढें त्यानें कधीं पुन्हां आपल्या कौशल्याची बढाई मारली नाहीं!

★ ★

## ३९ भुर्दंड

लेखक :श्री. शंकर वामन कुलकर्णी (नागपूर)

काश्मीरची सफर संपवून आम्ही परतलों.

गाडी लेट असल्यामुळें घरीं पोहोंचायला रात्रींचे अकरा वाजले.

प्रवासांतील ताण नि गाडींतील शीण आम्हांला झोपेच्या कुशींत लोटूं पहात होता—

तर पोटांतील काव काव स्वयंपाकघराची वाट दाखवीत होती.

स्वतःच्या जन्मसिद्ध हक्कानं म्हणा किंवा नाइलाजानं म्हणा—

जेवणाच्या तयारीला ही लागली !

मीहि तोंपावेतों थोडासा आडवा झालों, तितक्यांत—

ही धापा टाकीत आली—

" अहो ! पहिलें डॉक्टरला आणा पाहूं ? "

मी ताडकन् उठून बसलों नि आश्चर्यानें म्हणालों—

" अग पण ! कुणाचा प्राण कुठं चालला आहे ? कांहीं स्पष्ट तर सांगशील ? "

" आधीं डॉक्टरला आणा; मागाहून सांगेन सर्व कांहीं. "

हिनं सोडलेल्या फरमानापुढं अपीलच नव्हतं...

डॉक्टरला आणतांच बाजूच्या खोलीकडे ती आम्हांला घेऊन गेली. कसला तरी आवाज ऐकूं येत होता. तिनं खुलासा केला, ' ऐकलंत डॉक्टर ! ऐकूं येते ना घरघर ? आम्ही गांवाला निघालों तेव्हां आमची मनू मोलकरीण आजारी होती या खोलींत. बिचारी अत्यवस्थ झालेली दिसते. कसंहि करून वांचवा विचारीला ! "

मनूताईच्या खोलीचं ती दार ढकलूं लागली, पण तें उघडेना ! दोन हांका दिल्या पण उत्तर मिळेना !

भोंवतालीं काळोख असल्यामुळं मी खोलीवर टॉर्च फेंकला, तों काय ! खोलीला कुलूप ! !

आम्ही चाट बनलों ! पण घरघर चालूच होती !

हिच्या मूर्खपणाबद्दल, डॉक्टरला पांच रुपयांचा भुर्दंड भरीत, मी म्हणालों,

' भलतीच हळवी आहेस तूं, सुलू ! '

आपलंच नाणं खरं करून दाखविण्याकरितां ती माझ्यावर उलटली,

" मी हळवी ? मग ही ' घरघर ' कसली आहे सांगा पाहूं ? "

खरंच घरघर कसली होती हें मला देखील कळलं नाहीं ! तोंच ती उद्गारली,

" अगबाई ! आतां आलं माझ्या ध्यानांत ! अहो, ती आपली मनी मांजरीच आजारी असली पाहिजे ! नव्हे माझी पक्की खात्री आहे. तेव्हां ढोर डॉक्टरला कसंहि करून घेऊन या गडे ! "

तिच्या विचित्रपणाबद्दल नवल वाटत असलं तरी घरघर ऐकल्यापासून मला देखील हिची भीड मोडवेना. आणि म्हणूनच तेवढ्या रात्रीं मी ढोर डॉक्टरला घेऊन आलों.

डॉक्टरला पाहून तिच्या जिवांत जीव आला. आपल्या मागनं येण्यास तिनं आम्हांला खुणवलं.

दबकत दबकत आम्ही तिचा पाठलाग करूं लागलों. तिनं हलकेंच स्नानगृहांतलि बटन दाबून दिवा लावला. डॉक्टर ढोर आपलीं उपकरणीं घेऊन मांजरीला तपासण्याकरितां पुढें सरसावले. पण—

मनी मांजरीचाहि तिथं पत्ता नव्हता !

आम्हांला दुसरी चाट बसली ! परंतु घरघर तशीच चालू होती. आमची अक्कल चालेना !

तितक्यांत, डॉक्टर ढोरांनीं धांवत जाऊन किल्ली फिरविली—

आणि काय आश्चर्य !

---उघड्या असलेल्या रिकाम्या तोटींतून शिरणाऱ्या वाऱ्यामुळं होणारी नळाची घरघर एकदम थांबली !

पण डॉक्टर ढोरला पांच रुपयांचा दुसरा भुर्दंड भरतांना मात्र मलाच घरघर लागायची पाळी आली होती !

* *

## ४० नकोत ते पाहुणे !

लेखक : श्री. नरहर अ. दांडेकर

" बाई ! बाई ! सुशीला वन्सं, नाहीं तरी अलीकडे तुमचा भारीच थंड कारभार झालाय्, बरं का ! बाहेर वाजलेत किती कल्पना आहे का ? म्हटलं एक वाजला ! "

" तुमचं ठीक आहे हो ! राजाराणीचा संसार. आमच्यासारख्यांचे मात्र हाल आहेत. आणि मेली पाहुण्यांची साडेसाती आहेना सारखी आमच्या पाठीशीं ! "

" आज पण आलेच वाटतं ? "

" कांहीं विचारूं नका ! गेले पंधरा दिवस नुसता कहर झालाय. पाहुण्यांशिवाय एक दिवस सुना जात नाहीं ! " आणि यावर भांडें आदळल्याचा आवाज !

घरांत सुशीला वहिनी नि शेजारची कुणीतरी बाई यांच्यामध्यें हा संवाद चालला होता.

मी बाहेरच्या पडवींत आरामखुर्चीत सिगारेटचे झुरके घेत बसलों होतों. बाहेर धो धो पाऊस पडत होता आणि आंतून माझ्यावर शाब्दिक मारा चालला होता.

माझ्यावरच नाहीं, तर काय ! मी वसंतकडे–माझ्या मित्राकडे–पाहुणा म्हणून आलों होतों आणि त्याच्या अर्धांगीकडून माझी अशी संभावना होत होती !

ते शब्द माझ्या हृदयाला जाऊन भिडले आणि सारखे शल्यासारखे बोचूं लागले.

योगायोग किती विचित्र असतात पहा! माझी नि वसंताची नागपूरला मॉरिस कॉलेजमध्यें अकस्मितपणें ओळख झाली. वास्तविक मी नागपूरचा नि वसंत थेट कोंकणांतला! आमची भेटण्याची इच्छा अनावर. पण आमचा वियोग झाल्यावर पांच वर्षें लोटली तरी वसंत नागपूरकडे फिरकला नाहीं नि माझे पाय कोंकणाला लागले नाहींत.

यंदा मात्र वसंतानं अगदीं निर्वाणीचा खलिता पाठविला. मलाहि पडल्या फळांचीच आज्ञा हवी होती. अखेर वैतागलों नि भर पावसाळ्यांत कोंकणचा रस्ता सुधारला. माझ्या अनपेक्षित आगमनानं वसंत चाट पडला. पण तितकाच आनंदहि झाला त्याला. पण—

जिथं मधाच्या आशेनं हात घालावा, तिथं माशांनीं कडकडून चावा घ्यावा असं झालं होतं. मी पाहुणा वसंतच्या पत्नीच्या रोषाला बळी पडलों होतों.

मला अतिशय वाईट वाटलं. पण आतां इथं राहण्यांत हंशील नाहीं हेंहि उघड होतं. माझ्या मनांत आलं, वसंतला सरळ एक थाप द्यावी नि येथून काढता पाय घ्यावा. पण थाप तरी काय देणार मी? मी खूप डोकें खाजविलें. पण या द्वंद्वांतून सुटण्याचा मार्ग दिसेना!

पण इच्छा उत्कट असली, कीं मार्ग दिसूं लागतात. विमनस्क मनःस्थितींत मी बसलों होतों. रस्त्यावरून पोस्टमन जात होता. माझ्या मनांत कशी कोणास ठाऊक एक कल्पना विद्युतवेगानं येऊन गेली. लागलीच नोटपेपर्स घेऊन मी पत्र लिहायला बसलों. डोकं जरा खाजवलं नि झरणींतून एकामागून एक अक्षरं कागदावर उमटूं लागलीं. माझ्या काल्पनिक मित्राकडून मला आलेलं तें काल्पनिक पत्र पुढीलप्रमाणें होतंः—

प्रिय दिनकर,

तूं खामगांवला पोंचतो आहेस तोंच हवं तर अगोदरच हें पत्र तिथं येऊन थडकेल आणि माझ्या निर्लज्जपणाची तुला खूपच मौज वाटेल. पण खरंच दिनकर, आज साऱ्या जगांतली लाचारी मी पत्करली आहे. परिस्थितीची जाणीव तुला आहेच. मी अगदीं भांबावून गेलों

आहे. तरी पत्र पोहोंचतांच मुंबईला निघून ये. सूज्ञांस अधिक लिहिणें नलगे.

सदैव तुझाच,
विनायक.

मीं पत्र एकदां वाचलं नि मला समाधान झालं. आतां वसंत आल्यावर त्याच्या तोंडावर तें पत्र टाकायचं नि गंभीर चेहरा करून: म्हणायचं, " पाहिलंस वसंत, इथं राहण्याकरितां माझं मन सारखं ओढ घेतंय... पण योगायोग विचित्र दिसतात"...वगैरे.

आणि या माझ्या कल्पकतेवर मी इतका खूष झालों कीं, त्या भरांत एक सबंध सिगरेट मीं दोन मिनिटांत खलास केली. वसंताला यायला अजून अवकाश होता. तो आल्यावर मला माझं नाटक वठवून दाखवायचं होतं नि त्याची रंगीत तालीम मी मनांतल्या मनांत सारखी करीत होतों.

" काय पाहुणं ? "

मीं दचकून मागें पाहिलं. वसंतकडला म्हातारा गडी—महादू ओटी झाडीत होता.

" आमच्या या पाहुण्यांनीं तुम्हास्नी अजूनशानी इंगा दाखवला नाय काय ? होतं ना इथं धा दिवस ? कळेल, कळेल इंगा ! बाकी ह्ये बी पाहुनं नि तुम्ही बी पाहुनंच ! "

आणि असं म्हणत महादू खूष होऊन हंसूं लागला अन् मी बुचकळ्यांत पडलों.

" ही पाहुण्यांची भानगड काय आहे बुवा ! " मीं विचारलं.

" पाहुणे कसले, भाऊजी ! " वहिनी बाहेर येत मंद हास्य करीत बोलूं लागल्या. " आमच्या कोंकणांत या मेल्यांचा अस्सा दरवर्षी उपद्रव असतो. लहान लहान मुंगळ्यांसारखे हे लाल प्राणी असतात. कुणी चांचड नाहींतर वाळंवे म्हणतात. आम्ही पाहुणे म्हणतों. एकदां आले कीं, पंधरा पंधरा दिवस नको जीव असं होऊन जातं ! "

वहिनी आंत गेली—आणि मी हंसून स्वतःला लिहिलेलं पत्र फाडून टाकलं.

★ ★

# ४१ अनाथमहिलाश्रम

**लेखक** : श्री. विष्णु गणेश भिडे, बी. ए. ( पुणें )

सरला एक अनाथ विधवा होती. ती दीराच्या आश्रयाला राहात होती. तिथें तिचा नाहक छळ होत होता.

सर्व निमूटपणें सहन करणें सरलला भाग होतें. कारण तिला दुसरा कुठचा आधारच नव्हता.

तसें पाहिलें तर तिला दोन भाऊ होते. दोघेही कर्ते सवरते होते. त्यांची सरलवर निरतिशय भक्ति होती. तथापि...

त्यांच्याजवळ पैसा नव्हता. स्वतःचें पोट जेमतेम भरेल इतकेंच सरलचे भाऊ कमावीत असत.

सरलला लिहितां येत होतें. कधीं कधीं ती भावांना पत्र टाकीत असे. बन्धुराजहि पोष्टानें तिला खुशाली कळवीत.

पत्रव्यवहारासाठीं दीराकडून सरलला तीन पैसेसुद्धां कालोकाळ मिळत नसत. तसें घडलेंच तर ती सरलला अमृतवेळ भासे.

* * * *

एकदां सरलच्या दीराला हुक्की आली—कांहीं देवस्थानें बघण्याकरतां म्हणून घरच्या साऱ्याच मंडळींना घेऊन तो निघाला.

दीराला भावजयीस देखील बरोबर घ्यावं लागलं होतं.

मधेंच ' अनाथमहिलाश्रम ' पाहण्याची संधि आली. ती दवडण्यास सरलचा दीर तयार नव्हता. बरोबरच्या लवाजम्यासह त्यानें अनाथ-महिलाश्रमाला भेट दिली.

सगळ्यांत सरलनें तो आश्रम जास्त आत्मीयतेनें पाहिला. तिला तिथें आपल्यासारख्या विधवा कितीतरी आढळल्या. त्या तिथें कशाला आल्या याबद्दल सरलनें बारकाईनें चौकशी केली.

समजलेल्या हकीगतीनें सरलचें असमाधान झालें.

कांहीं स्त्रिया गुंडांनीं पळवून नेल्या असतांना सोडवण्यांत आल्या-नंतर कायमच्या अनाथमहिलाश्रमांत राहात होत्या. कांहींजणी त्यांच्या

इच्छेविरुद्ध अनीतीच्या मार्गाला लागल्या व त्या गटारांतून वर येण्या-साठीं आश्रमांत रहिवासत होत्या. त्या धडधाकट बायांना कोणतेंतरी काम शिकवून स्वावलंबी न बनवतां निव्वळ जनतेच्या पैशावर जन्मभर पोसण्यांत येणार होतें. आणखी बऱ्याचशा बायकांचा केवळ वशील्यानें अनाथ-महिलाश्रमांत शिरकाव झाला होता व तिथेंही प्रत्येक ' वशिलाबेन ' बाहेरच्या धकाधकीची झळ न लागतां सुखानें कालक्रमणा करूं शकत होती.

लोकांच्या पैशाचा थोडातरी दुरुपयोग होतो आहे याची बोचक जाणीव सरलच्या हृदयाला झाली. तिनें आश्रमांतून परत निघाल्यावर दीराला विचारण्याचें साहस केलें,

' भावोजी, या बायकांना मरेपर्यंत इथें कां ठेवतात ? त्यांना उद्योग-धंद्याला लावून नवीन अभागी बायाबापड्यांची तेवढ्या पैशांत थोडीफार सोय नाहीं होणार ?

नेहमींच्या संवयीप्रमाणें दीरानें भावजयीला हिडीस फिडीस करून तुच्छतापूर्वक हेटाळणीचा कसलातरी जबाब दिला.

* * *

चार महिन्यांनीं वर्तमानपत्रांत बातमी झळकली.

' सरला नांवाची एक विधवा स्त्री तिन्हीं सांजचे सुमारास गांवा-पासून अर्ध्या मैलाचे अंतरावर असलेल्या मार्कंडेयाच्या देवळांतून माघारी येत असतां पाळत राखून असलेल्या कुणी पठाणानें तिच्यावर हल्ला केला. सदरहू विधवा बाईला पळवून नेण्याचा पठाणाचा इरादा स्पष्ट दिसला. परंतु याचवेळीं देवदर्शनाहून येणाऱ्या एका तडफदार जवानानें पठाणास पिटाळून लावलें. सरलेची सुटका झाली आणि तिला अनाथमहिलाश्रमांत पोचवण्याची व्यवस्था त्या तरुणानें ताबडतोब केली ''

* * * *

अंदरकीबात अशी होती—

पठाण झालेला इसम सरलचा थोरला भाऊ होता.

मदतीला धावणारा तरुण सरलचा मधला भाऊ.

दीराच्या असह्य जाचांतून मुक्त होण्यासाठीं सरलनें स्वतःच्या भावंडांना पत्र धाडून एकदम बेत आखला.

तो फलद्रूप होऊन सरल ' अनाथमहिलाश्रमांत ' दाखल झाली.

तिला आतां आयुष्यभर–निदान आश्रमाचें चालू धोरण बदलेपर्यंत तरी–दीराच्या छळणुकीचें मुळींच भय नाहीं.

★ ★

## ४२ अमरचित्र !

लेखक : ग. गं. जतकर (मालाड)

प्रफुल्लवदन एक नामांकित चित्रकार होता. रंग आणि कुंचल्याच्या सामर्थ्यावर त्यानें अनेक जीवंत चित्रें काढलीं होतीं.

एखादें अमरचित्र काढून, आपल्या कलामंदिरावर कळस चढविण्याची त्याची एकच अखेरची मनीषा होती.

यासाठीं त्यानें कित्येक कल्पना तपासून पाहिल्या. शेंकडों चित्रें अभ्यासिलीं, दूरदूरचा प्रवास केला, असंख्य चेहेरे निरीक्षिले; आणि अखेर विरोधाभास उत्पन्न करणारें सज्जनदुर्जनाचें प्रतीकात्मक चित्र काढण्याचें त्यानें ठरविलें. आपल्या अंतश्चक्षूपुढें सज्जनाच्या जागीं कृष्ण आणि दुर्जन म्हणून कंस अशा दोन मूर्ती त्यानें उभ्या केल्या. परंतु पोथ्यांत दिसणारीं कृष्ण आणि कंसाचीं केवळ काल्पनिक चित्रें त्याला मान्य नव्हतीं. या दोन मूर्तींसाठीं त्यानें आधुनिकतादर्शक अशा स्वतःच्या कांहीं विशिष्ट कल्पना आंखल्या होत्या; आणि त्याबरहुकूम तो आपल्या चित्रांत सज्जन दुर्जन रंगवूं इच्छित होता. परंतु समोर प्रतिमा ठेवल्याशिवाय त्याला हें जमेना. म्हणून प्रतिमेच्या शोधार्थ तो बाहेर पडला.

एके दिवशीं एका गरीब वस्तींतून फिरतां फिरतां त्याला एक आठ दहा वर्षांचा मुलगा दिसला. मुलाच्या बाह्यांगावरून तो दारिद्र्यांत जन्माला आला असला तरी त्याच्या चेहऱ्यावर असे कांहीं दैवी भाव होते कीं

जणूं एखाद्या कृष्णानें एखाद्या गरीबाच्या पोटींच अवतार घेतला आहे ! त्या मुलाला पाहतांक्षणींच, आपण कल्पिलेलें सज्जनाचें प्रतीक जीवंत होऊन आपल्या समोर उभें आहे असेंच प्रफुल्लवदनला वाटलें. चटकन् तो त्या मुलाला आपल्याबरोबर घेऊन आला.

मुलानें शांतपणें समोर बसावें आणि प्रफुल्लवदननें आपल्या चित्र-कौशल्याची पराकाष्ठा करून सज्जनाचें प्रतीक रंगवावें असें कित्येक दिवस चाललें होतें. कांहीं दिवसांनंतर सज्जनाची प्रतिमाचित्रें फलकावर जीवंत होऊन उभीं राहिलीं. चित्रकाराला असीम आनंद झाला. आपली अखेरची इच्छा सफळ होण्याची त्याला खात्री वाटूं लागली. मुलाला योग्य प्रेमोपहार देऊन त्यानें परत पाठविलें.

आतां फक्त दुर्जनाची प्रतिमा रंगविण्याचें बाकी होतें. यासाठीं त्यानें पुष्कळ शोध केला. प्रयत्नांची शिकस्त केली. परंतु कित्येक वर्षें गेलीं तरी हवा तसा निर्भेळ दुर्जनाचा चेहरा त्याला सांपडेना. जवळ जवळ तो निराशच झाला होता. आपल्या कलामंदिरावर कळस चढविण्याचें काम अपूर्ण राहतें कीं काय अशी त्याला शंका वाटूं लागली होती. अशांत एक दिवस अचानक एक मनुष्य त्याच्या दारांत येऊन उभा राहिला. इतरानें त्या मनुष्याला प्रथमदर्शनींच हाकलून लावलें असतें. परंतु त्याला पाहतांच प्रफुल्लवदन प्रफुल्लित झाला. त्याच्या चेहऱ्यावरच्या निराशेचें रूपांतर आशेंत झालें. त्यानें कल्पिला होता तसाच तो दुर्जन होता. त्याच्या चेहऱ्या-वरील तामसी भाव, डोळ्यांतला उन्मत्तपणा, हालचालींतून व्यक्त होणारा उद्दामपणा वगैरें सर्व लक्षणें जातिवंत दुर्जनाला शोभतील अशींच होतीं.

प्रफुल्लवदननें त्याचें स्वागत केलें. चोहोंकडे अवज्ञा होत असतां, एका व्यक्तीकडून स्वागत झालेलें पाहून तो अभ्यागत चकित झाला. चित्र-कारानें आपला हेतु त्याला सांगितला. पैशाच्या आमिषानें त्यानें चित्रा-करितां दुर्जनाची प्रतिमा म्हणून कांहीं दिवस चित्रकारासमोर बसण्याचें कबूल केलें.

दुर्जनाचें चित्र जसजसें तयार होऊं लागलें, तसतसें सज्जनाच्या चित्राला अधिकाधिक उठाव मिळूं लागला; आणि आधींच उत्कृष्ट चितारल्या गेलेल्या सज्जनाच्या चित्रामुळें दुर्जनाचें चित्र खुलूं लागलें.

अभिनव कल्पना आणि जीवंत प्रतिमांच्या सहाय्यानें काढलेलें सज्जन-दुर्जनाचें, सत्याभास उत्पन्न करणारें आपलें हें चित्र अमर होईल याबद्दल प्रफुल्लवदनला आतां फारशी शंका उरली नव्हती. दुर्जनाच्या चेहऱ्यावरच्या कांहीं छटाच रंगविण्याच्या बाकी होत्या. अशांत तिसरे दिवशीं दुर्जन म्हणून जो मनुष्य बसला होता त्याच्या चेहऱ्यांत एकदम बदल झाला. चित्रकाराला आश्चर्य वाटलें. त्यानें त्याला याचें कारण विचारलें. त्या मनुष्यानें उत्तर दिलें, " कांहीं वर्षांपूर्वीं तुम्हीं मलाच सज्जन म्हणून निवडलें होतें, हें विसरलां वाटतें—'

* - *

## ४३ " साभार स्वीकार "

लेखक : श्री. शंकर. कृ. कुलकर्णी (चिकोडी)

कॉलेजच्या जगांत पाऊल टाकण्यापूर्वी—राजाभाऊनं किती तरी उच्च आशा-आकांक्षा आपल्या मनाशीं बाळगल्या होत्या ! खूप खूप मजा करायची, चिकार लेखन करायचं, आणि 'लेखक' म्हणून मिरवायचं ही त्याची फार दिवसांची हौस होती !

कॉलेज म्हणजे पृथ्वीतलावरील मूर्तिमंत 'स्वर्ग' अशी त्याची ठाम समजूत होती ! प्राध्यापकांच्या मुखांतून नित्य होणारी उच्च विचारांची अमृतवृष्टि,......अस्मानच्या परींचा उन्मादकारक सहवास...पण अरेरे ! लौकरच त्याला कळून चुकलं कीं, पाठ केलेलं म्हणून दाखवण्याची कसरत प्रोफेसर्स करीत असतात आणि लग्नाच्या बाजारांत न खपणाऱ्या पोरी नाइलाजानं कॉलेजांत येतात !

राजाभाऊच्या "आशा-अपेक्षांचा" अशा रीतीनें संपूर्ण फज्जा उडाला होता, तरी पण त्याची "महत्वाकांक्षा" जबरदस्त होती !—'लेखक' होणं हें त्याच्या आयुष्याचं लाडकं ध्येय होतं !...

अपेक्षाभंगानं खट्टू झालेला राजाभाऊ आतां 'महत्वाकांक्षे'च्या मागें लागला होता !

राजाभाऊनं 'लेखना'चा धूमधडाका चालू केला...म्हणजे तो धूमधडाक्यानं लिहीत होता; पण अद्याप कोणतेच संपादक महाशय प्रसन्न झाले नव्हते ! तसा राजाभाऊ "दुर्दम्य आशावादी" होता...तो बिलकूल डगमगला नाहीं !

हळूहळू लिखाण साभार परत येऊं लागलं...पण अपयश ही यशाची गुरुकिल्ली आहे हें त्याला माहीत होतं....राजाभाऊ ईर्षेला पेटला...!

परीक्षा हळूहळू जवळ येत होती, पण आपली "खरी परीक्षा" निराळीच आहे असं राजाभाऊचं म्हणणं होतं ! त्याची ध्येयनिष्ठा और होती !...

परीक्षेचा "निकाल" लागला नि राजाभाऊच्या वडलांनीं त्याचं कॉलेज बंद केलं...राजाभाऊची ध्येयनिष्ठा सुतराम् ढळली नाहीं !

बेकार 'राजा'ला पोसणं त्याच्या वडलांना शक्य नव्हतं...त्यांनीं त्याला रॅशन-ऑफिसमध्यें चिकटवून दिला...

लौकरच या 'स्वप्नाळू' ध्येयवाद्याचं एका लग्नाळू मुलीशीं लग्न झालं आणि नुकतचि नोकरी लागलेला राजाभाऊ हक्काची छोकरी घेऊन टाऊन-हॉलमध्यें गोड-गुंजनांत गुंतलेला आढळूं लागला...

आतां "राजाभाऊ"ला सुखी असावयास कांहीं हरकत नव्हती पण...
...ध्येयवादी माणसाला 'ध्येय-पूर्ति'वांचून कोठलें आलें आहे समाधान ! आपला एकहि लेख अद्याप छापून आला नाहीं, ही गोष्ट राजाभाऊच्या काळजास लागून राहिली होती ! लिहून पाठवण्याचा त्याचा क्रम अव्याहतपणें चालू होता;......पण अद्याप एकाहि संपादकास दया आली नव्हती !

आज परत आलेला लेख, राजाभाऊचा शंभरावा लेख होता. ....आतां मात्र राजाभाऊच्या सहनशीलतेची 'शंभरी' भरली ! सहनशीलतेला झाली तरी कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ?...त्याच्या तळव्याची आग मस्तकाला भिडली, डोकं गरगर फिरूं लागलं, साऱ्या संपादकजातीची त्याला चीड आली !

अख्खी रात्र जागून, आजचा लेख परत पाठवणाऱ्या संपादकाला

त्यानं एक जळजळीत पत्र लिहिलं! साऱ्या संपादकजातीचा त्यानं त्यांत खरपूस समाचार घेतला होता. एवंच, त्याचं तें पत्र म्हणजे संपादकजातीवर त्यानं टाकलेला तो अॅटमबॉंब होता!

दुसऱ्या दिवशीं तें पत्र पोस्ट करून, आपल्या हातानं त्यानं आपल्या प्रतिभेचं प्रेत गाडलं ......यापुढं कारकुनी कार्याखेरीज लेखणी उचला-यची नाहीं अशी त्यानं भीष्म प्रतिज्ञा केली!!

* * *

एक आठवडा लोटला असेल. कारकुनी करून शिणलेला "राजा" घरीं पाऊल टाकतो न टाकतो तोंच त्याच्या राणीनं एक पाकीट पुढं करून, तें एका 'मासिकाकडून' आल्याचं सांगितलं! राजाच्या छातींत धस्स झालं! चुकूनमाकून राहिलेलं आपलं 'लिखाण' तर परत आलं नसेल ना? या कल्पनेनं तो मटकन् खालीं बसला! दुसरीहि एक कल्पना त्याच्या तल्लख मेंदूस चाटून गेली!..." आपण पाठवलेलं तें पत्र देखील "साभार परत" पाठवण्याचा खोडसाळपणा त्या मिस्किल संपादकानं केला नसेल ना?" या विचारवेगासरशीं तो गरजला, "दे तें फेकून केराच्या टोपलींत!!'

"इश्श! वाचून तर पहायचं ना!" राणीनं गोड मुरका मारला! राजा पत्र वाचूं लागला. ...

"आपलें पत्र पावलें. अनुभवजन्य लिखाणांतून जो जिव्हाळा असतो, त्यांनीं ओतप्रोत भरलेल्या आपल्या पत्रांतील आपल्या तक्रारी, ही होतकरू लेखकांची प्रातिनिधिक कैफियत आहे असें आढळून आल्यावरून योग्य मथळ्याखालीं यथावकाश प्रसिद्ध करीत आहों....आपला..."

राजाचा स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसेना. त्यानं राणीस मिठी मारली! ध्येय-साफल्याचा आनंद कांहीं और असतो हेंच खरं!

★ ★

## ४४ दाढीचें दातृत्व !

**लेखक :** श्री. पु. वा. जोग, बी. ए. (ऑनर्स)

ती गोष्ट मीं तुम्हांला सांगितली तर त्यावर तुमचा विश्वासच बसणार नाहीं. पण सांगतोंच.

१९३५ च्या सुमारीचे बेकारीचे दिवस होते ते. अशावेळीं घरदार, आईबाप व शिक्षण यांस पारखा झालेला मी लग्नाची घोरपड गळ्यांत बांधून घेऊन बसलों होतों. शेवटचा एक आणा खिशांत राहिल्यावर, विनातिकीट मुंबईस आलों. हिंडहिंड हिंडून सायंकाळच्या सुमारास भर रस्त्याच्या एका कडेस विजेच्या खांबाशेजारीं, दाढी वाढलेली, अंगांत एकहि धड कपडा नसलेला असा मी उभा होतों. एक भिकारीण मजजवळ आली. माझ्या खिशांतील ऐवजाची चौथाई वसूल करणाऱ्या देशमुखी-कडे मीं तिरस्कारानें पाहिलें. पण पुन्हां काय वाटलें कोणास ठाऊक ? एक पैसा देऊन तिला वाटेला लावून, तीन पैशांचें बजेट मी बसवूं लागलों. थोड्या वेळानें तीच म्हातारी आनंदी मुद्रेनें मजकडे आली. तिला पाहून मी पुढें झटकणार तोंच—

" महाराज ! तुमच्या हाताला लइ यस हाय बगा, " म्हणून तिनें जमलेल्या चार आण्यांपैकीं दोन आणे (वरकरणीं) नको असतांहि मला दिले. माझा आनंद गगनांत मावेना. दुसरे दिवशीं सकाळीं तिला तिथेंच एक पैसा दिला व सायंकाळीं चार आणे घेतले. तिसरे दिवशीं माझ्या हाताचा खरेखोटेंपणा ठरविण्यासाठीं बकाल वस्तीकडे जाऊन, चार भिकाऱ्यांना एकेक पैसा दिला. त्या दिवशीं सायंकाळीं मी एक रुपयाचा धनी झालों. आतां मी दिसतांच कामकरी, भिकारी मला 'महाराज' म्हणून नमस्कार करीत.

हळूहळू माझा धंदा व दाढी वाढूं लागली. दिवसांतून तीनहि ठिकाणीं जाऊन मी पैसे देई अन् सायंकाळीं कधीं दोन तर कधीं तीन रुपये मिळवूं लागलों. महिन्याच्या अखेरीस बायकोस पन्नास रुपयांची मनी-ऑर्डर गेली.

दुसऱ्या महिन्यास ८०. तिसऱ्यास १०० ! चढती मागणीच !

पुढें एकदां माझ्या बायकोचें माझ्या धंद्याची विचारणा करणारें पत्र आलें अर्थात् माझ्या पोषाखासह माझ्या राहाणीची हकीकत कळवावी लागली. पण तिचें उलट उत्तर आलें कीं, " धंदा करायचा तर फकीराचा वेश कशाला ? " त्याच दिवशीं सायंकाळीं एका सलूनच्या गल्ल्यांत दोन आण्यांची भरती झाली.

दुसरे दिवशीं नेहमींप्रमाणें माझ्या ऑफिसला गेलों. रोजची येणारी म्हातारी माझ्या अंगावरून गेली. पण बोलली नाहीं ! मी तिला हाक मारली. पण शिव्याशापाचें उत्तर आलें ! तीनहि ठिकाणीं तीच तऱ्हा ! " पूर्वीचा मी तो नव्हे. " हीच साऱ्यांची कल्पना. त्यांना मी खूप समजावलें. पण छेः !

" तूं रं कुठला आलायास ? त्या देवमानसाच्या दाढीची बी सर यायची नाहीं तुला. " हा जबाब ऐकून मी थंडलों.

अन् त्या दिवसापासून रोकड्या पैशाचा माझा धंदा पार बुडाला ! !

अशा रीतीनें **हिंदुस्थान एका सत्पुरुषाला** मुकला !

★ ★

## ४५ नंदा.

**लेखकः** वैजनाथ श्रीधर शास्त्री ( धरणगांव, पू. खा. )

आज तीन दिवसांपासून नंदा उपाशी होता. भुकेनें त्याचा जीव कासावीस झाला होता.

त्यानें पाहिलें—रामलाल शेट मिठाईचे पुडे घेऊन वानरांना देण्याकरितां देवीकुंडावर जात आहेत.

अगदीं व्याकुळतेनें तो म्हणाला, ' शेटजी, उपासानें प्राण चालला. डोळ्याला अंधेरी येते. तीन दिवसांपासून पोटांत अन्नाचा कण नाहीं. थोडीशी मिठाई मलाही द्या हो. '

—' उपाशी आहेस तर शहरांत जाऊन भीक माग. ' हे हनुमंताचे पुढे तुला कसे देऊं !

—' शेटजी शहरांत जाण्याची हिंमत नाहीं. मला, भुकेकंगालाला— जीवदान दिलं तर मारुती आपणाला प्रसन्न होईल.

—' मला तुझ्या उपदेशाची गरज नाहीं !' शेटजीनें अतिप्रेमानें ती सर्व मिठाई वानरांना वांटून दिली. आणि ते परतले तेव्हां नंदा रस्त्यावर निजला होता. तिरस्कृत स्वरांत ते स्वतःशींच गुणगुणले.—' आतांपर्यंत हा बदमाष भुकेनें तडफडत होता. आणि इतक्यांत हा आरामांत झोंपला आहे झाडाखालीं—बदमाष—ऐतखाऊ.

—पण नंदाला अशी झोंप लागली, कीं त्यांतून तो कधींच उठला नाहीं—परंतु गांवाला त्याची पर्वा नव्हती. रामलाल शेटजींच्या जिलबी-वर माकडें मात्र अधिकाधिक गलेलठ्ठ बनत चाललीं होतीं एवढें खरें.

★ ★

## ४६ नवें तन्त्र—

लेखक : श्री. मा. वा. पाळंदे ( पुणें )

ती एक पडलेली कादंबरी होती. तिचा लेखक प्रसिद्ध नव्हता. पण इतक्यांत एक अकल्पित अशी घटना घडून आली, आणि त्या कादंबरीचा अगदीं पहातां पहातां उठाव झाला. त्याचें तें असें झालें.

ती कादंबरी प्रसिद्ध होऊन कांहीं दिवस जातात न जातात तोंच एक वाङ्मयफौजदार उत्पन्न झाला व एका साप्ताहिकाचे कचेरींत ठाण मांडून देऊन तेथून त्यानें त्या कादंबरीकारावर वाङ्मयचौर्याचा जाहीर आरोप केला. त्यावर लेखकानें आपली बाजू मांडली व मग मोठी खळबळ उडाली. त्यामुळें ही कादंबरी आहे तरी कसली हें पाहण्यासाठीं म्हणून कित्येकांनीं ती विकत घेतली. आणि मग मात्र वादाला खरा रंग चढला. अनेक उत्तरें प्रत्युत्तरें झालीं व खुलासे प्रतिखुलासे अगणित असेच झाले. पुष्कळ प्रसिद्धिलोलुप व हावरट असे साहित्यिक, लेखक व लुडबुडे

ह्यांनीही ह्या वाहत्या गंगेंत आपले हात धुऊन घेतले. तथापि या वादांत खरी गंमत शेवटीं शेवटीं अशी झाली कीं, मूळ भांडणारांचें पुढें कोठें नांवही ऐकूं येईना आणि मग इतर लोकच आपल्या लेखण्या झिजवीत बसले.

अखेर एक दिवस मूळ लेखकानें व वाङ्मयफौजदारानें आपण हा वाद यापुढें संपविल्याचें जाहीर केलें. त्यामुळें अर्थातच इतर लुडबुड्यांनाही आपला धंदा मोठ्या दुःखानें बंद करावा लागला. इतकेंच काय पण त्यांना लवकरच एक जबर धक्काही बसला.

* * *

एक छोटासा साहित्यमेळावा भरलेला होता आणि त्यांत सर्व वावदूक व तो नुकताच प्रसिद्धीस आलेला लेखकही होता. वरील खळबळीचा वाद नुकताच गाजलेला असल्यामुळें त्याच विषयावर आतांही चर्चा चालूच होती. इतक्यांत एकजण तेथें आला आणि लेखकाच्या पाठीवर थाप मारीत म्हणाला, " मग काय अप्पा, शेवटीं माझी युक्ति सफल झालीच की नाहीं ! अन् म्हणे मला प्रसिद्धि मिळत नाहीं. "

" म्हणजे ? कसली युक्ति ? " सर्वांनीं एकदम प्रश्न केला.

" माझ्या कादंबरीच्या प्रसिद्धीची ! " लेखकानें शांतपणें सांगितलें.

" अहो, म्हणजे बोलतां तरी काय तुम्ही? " एक वावदूक चिडक्या स्वरांत म्हणाले.

" म्हणजे त्याचं असं झालं. " लेखक घसा साफ करून सांगूं लागला; " मी पडलों नवोदित लेखक ! त्यामुळें मला भरपूर प्रसिद्धि मिळेना कीं माझी कादंबरी खपेना, तितक्यांत या मित्राच्या डोक्यांतून ही अजब कल्पना बाहेर पडली. तेव्हां तिचाच अवलंब करून शेवटीं आम्ही असं ठरवलं कीं, प्रथम कोणींतरी माझ्यावर वाङ्मयचौर्याचा आरोप करायचा, त्याला मी उत्तर द्यायचें व शेवटीं इतर शिष्ट मध्यें पडले म्हणजे हळूच बाजूला व्हायचें. अन् अगदीं तसंच घडलं. मला प्रसिद्धि भरपूर मिळाली. इतकंच काय पण कादंबरीची दुसरी आवृत्ति काढावी लागली अन् हें तुम्ही जाणतांच.

" पण या जोडाजोडीनंतर तुम्हां दोघां भांडणारांचें मात्र आजन्म वैर जडलें असेल ना ? " कोणीं विचारलें.

" छे ! – अहो, तो आरोप करणारा मीच ! आरोप आणि उत्तरें दोन्हीं टोपण नांवांनीं मीच लिहीत होतों ! " लेखक उत्तरले.

* - *

## ४७ पांढरीं फुलें.

**लेखक :** श्री. कालिदास कुलकर्णी ( नागपूर )

बागेंत फुलांना बहर आला होता. प्रातःकालच्या शांत वातावरणांत चोहींकडे सुगंध दरवळत होता. प्रत्येक फुलझाडाला वाटे आज आपलीं फुलें शंकराला वाहिलीं जावींत. जे ते शक्य तितका आनंद आणून टवटवी प्रगट करीत होते. वाऱ्याच्या झुळकीसरशी मधूनमधून तीं हलूं डोलूं लागत. जणूं तीं माळ्याला "आपली फुलं तोड" म्हणून सांगत असावीं !

पण बिचारें पांढरें फूल ! ना सुवास, ना सौंदर्य ! नेहमींप्रमाणेंच आपल्या फांदीवर तें निराश स्थितींत बसलें होतें. रोज आपल्या दुर्दैवाबद्दल अश्रू गाळीत तें स्वतःशीं म्हणे, " अरेरे, आपण किती अभागी ! रोज इथंच जन्मास यावं नि इथंच या फांदीवर निर्माल्य होऊन पडावं ! यांतच माझ्या जीविताचं सार आहे काय ? ईश्वरास खरोखरीच आमची कांहींच करुणा येत नाहीं काय ? "

माळी बागेंत परडी घेऊन केव्हांच आला होता. गुलाबाच्या ताटव्यांत तो फुलें तोडीत असतांना एक आठ नऊ वर्षांची बालिका धांवत धांवत तेथें आली.

' धोंडीबा ऽ ऽ ए ऽ धोंडीबा– ' धापा टाकीत ती माळ्याला हांका मारूं लागली.

" काय जी, ताईसाहेब ? " त्यानें परडी खालीं ठेवीत चौकशी केली.

' अरे, तीं फुलें नकोत आज. आजची शिवरात्र ना ! शंकराला पांढरीं फुलें हवींत असं आईनं सांगितलं. '

'जी ताईसाहेब' असें म्हणत तो पांढऱ्या फुलांकडे वळला. पांढरीं फुलें डुलत असलेल्या सुवासिक फुलांकडे पाहून तुच्छतेनें हंसलीं.

पांढऱ्या फुलांच्या भारानें महादेव झांकून गेला. आज पांढऱ्या फुलांना महत्त्व होतें. देवानें त्यांची हांक ऐकली होती.

* *

## ४८ प्रोफेसरांशींच लग्न !

लेखक : श्री. व. कृ. वऱ्हाडपांडे ( नागपूर )

प्रो. धुरंधरांच्या आवेशपूर्ण भाषणाचा विमलेच्या मनावर इतका परिणाम झाला कीं तिनं एकदम एक निश्चयच केला !

":—करीन तर प्रोफेसरांशींच लग्न ! नाहीं तर ... "

आणि या तिच्या निश्चयाला आज पंधराच्या वर दिवस लोटले होते. या दोनतीन दिवसांत आपला हा निश्चय असफल होणार नाहीं, याची तिला पक्की खात्री झाली होती.

तिला प्रो. देशपांडे यांची ओळख झाल्याचा दिवस आठवला.

वास्तविक त्या रविवारीं नेहमींप्रमाणें ती कमलकडे जायची. पण तिचा पति प्रोफेसर असल्यामुळें कमलचा तिला हेवा वाटे. म्हणून ती सरळ 'निडहॅम' पार्कमध्यें फिरायला गेली.

तिची आई म्हणतच होती—

" विमे, चाललीस कुठं या वेळची ! आभाळ बघ किती आलंय्. "

विमल कांहींच बोलली नाहींसें पाहून तिची आई पुन्हां म्हणाली होती—

" अन् त्या जोशाकडील मंडळी 'बघायला' येणार आहे तुला... "

यावर स्तब्ध राहाणं मात्र विमलला जमलं नाहीं. ती एकदम म्हणाली— " आई, तुला एकदां सांगितलं ना मीं, की प्रोफेसरांशिवाय कुणाशीं विवाह करायची नाहीं मी म्हणून ... "

ती पार्कमध्यें पोंहचली आणि एकदम पावसाच्या सरी कोसळूं लागल्या. संरक्षणासाठीं तेथील माळ्याच्या झोंपडीचा तिला आश्रय घ्यावा लागला.

थोड्याच वेळांत त्या ठिकाणीं एक तरुण पावसाच्या सरीपासून स्वत:चें आणि स्वत:च्या छत्रीचें रक्षण करण्याचा निष्फळ प्रयत्न करीत अखेर विमला होती तिथंच आला.

त्याची ती तिरपिट बघून विमलला तशाही स्थितींत हंसूं आलं!

" कां हंसलांत ! " त्यानं विचारलं.

" उगीच. "

पावसाचा जोर कमी होतांच त्यानं आपली छत्री उघडली आणि तो निघणार इतक्यांत त्याला विमल म्हणाली—

" मिस्टर, प्लीज थांबतां का ! कुठं जायचं आपणाला—"

" टिळक स्टॅच्यू—"

" मला येऊं देतां तिथपर्यंत...मलाही जायचं तिकडेच—"

" चला कीं..."

ते नरकेसरी प्रेसपर्यंत आल्यावर तो तरुण थांबला. एका घराकडे बोट दाखवून तो म्हणाला—

" हेंच माझं घर ! छत्री घेऊन जा आतां. मात्र पाऊस उघडल्यावर परत करा हं ! "......वाक्याचा उत्तरार्ध म्हणतांना तो थोडा हंसला.

" हो ! " त्या तरुणाच्या घरावरील पाटीकडे दृष्टि फेंकीत ती म्हणाली. सुंदर अक्षरांत रंगवलेल्या पाटीवरील सुंदर अक्षरं पाण्यामुळं अधिकच चमकत होतीं,

प्रो. देशपांडे, एम्. ए.

आणि दुसऱ्या दिवशीं ती गेली छत्री पोहोंचवून द्यायला, तेव्हां खूप आभार मानले विमलनं त्याचे नव्या ओळखीबद्दल!

निरोप घेतांना ती म्हणाली—

" ओळख वाढवणं आपल्याच हातांत आहे आतां—"

" असं का ! मी तर जन्मांत विसरणार नाहीं बुवा तुम्हांला......"

हें सारं तिला आठवलं.

'ओळख गुणिले सहवास बरोबर प्रेम' आणि 'प्रेम गुणिलें धाडस बरोबर विवाह' हीं दोन समीकरणं त्यांच्या बाबतींत खरीं ठरलीं.

आईवडिलांच्या अडथळ्यांना न जुमानतां आपल्या इच्छेप्रमाणें विवाह करण्याच्या त्यांच्या धैर्याचं वर्तमानपत्रकारांनीं खूप कौतुक केलं!

एका वर्तमान-पत्रांत आलेली बातमी तिनं वाचायला घेतली आणि...

तिच्या हातांतील पत्र गळून पडलं. असहाय्यतेनं तिनं आपली मान मागें टेकली. डोळे फिरवायला सुरवात केली.

तिच्या पतीनं तिच्याकडे एकदम बघितलं!

विमलच्या मांडीवर पडलेल्या पत्रांतील 'अभिनंदनीय विवाह' या मथळ्याखालील मजकूर हंसत होता.

तिच्या नवऱ्याचं पूर्ण नांव मनोहर आत्माराम देशपांडे होतं आणि एका बड्या किराणा दुकानाचा तो प्रोप्रायटर होता!

तिची निराशा पाहून तो म्हणाला, "हें बघ, मी एम्. ए. झालों. प्रोफेसरही होतों, पण तिथल्या शें-दीडशेंवर काय भागणार! म्हणून दुकान काढलं, आज महिना हजार रुपये कमावतोंय् मी...तेव्हां दोन्हीं अर्थांनीं प्रो. मागं लावण्याचा हक्क आहे मला—घाबरूं नकोस!

★ ★

## ४९ शेरास सव्वाशेर.

लेखकः श्री. प्रभाकर केंडे (पुणें)

लष्करांत मौज असते खरी—पण कोठवर! खिसा गरम असेपर्यंतच.

महिना अखेरीचे दिवस होते. पगारास अजून ४ दिवस अवधि होता. खिशांत एकही पैसा शिल्लक नव्हता. मोठ्या मुष्किलीनें तंबूंत शेजारच्या खाटेवर झोपणाऱ्या सुब्रह्मण्यमूकडून ८ आण्याचें कँटीनचें तिकीट मीं उधार घेतलें होतें.

एकंदरींत माझ्याजवळ आज ८ आणे होते. केव्हां कँटीनमध्यें जाऊन दोसा आणि इडली खाईन असें झालें होतें. जावं म्हणून उठणार तोंच

राजेश्री पडवळांची स्वारी दत्त म्हणून उभी ! नाइलाजानें खाटेवर पडलों. परेड, किटइन्स्पेक्शन सारें आटपलें होतें. पैसे नसल्यानें उगीच ड्रेस घालून गांवभर हिंडण्यांत मजा नव्हती.

पडवळ नी मी मात्र बांके फाट ! स्वतःच्या खिशाला चाट न पडतां दुसऱ्याकडून कॅंटीनमध्यें जाऊन ८–१२ आणे कसे खर्च करावे ह्यांत आम्ही दोघं पूर्ण वाकबगार होतों. आज मात्र पडवळांचें तोंड सुकलेलें दिसत होतें.

मी पडल्या पडल्या म्हणालों, " हं पडवळ–कसें काय ? आज सकाळ-पासून चहा नाहीं. कुणाला तरी गंडवलें पाहिजे नाहीं ? "

पडवळ माझे शेजारीं खालीं बघत, बसत म्हणाला, " हं आज आम्ही पण अगदींच रिकामे आहोंत. " कुणास ठाऊक एकदम चमकून तो म्हणाला– " पण हो, तो निरंजनसिंग आहे ना ? त्याच्याकडून मीं घेतले आहेत ८ आणे उसने. चलतोस का ? मींही पण अजून चहा घेतला नाहीं."

मनांत म्हणालों, " आंधळा मागतो एक, देव देतो दोन– ! चला परस्पर पडवळाच्या खिशाला चाट ! दुपारीं गुपचीप जाऊन इडली व दोसा खाऊं म्हणजे झालें. " आम्ही कॅंटीनमध्यें गेलों, नी पांच मिनि-टांत आठ आण्यांचा माल फस्त केला.

मीं मनांत विचार केला– " कधींही एक दिडकीही खर्च न करणारा हा प्राणी आज एका वेळीं ८ आणे खर्च कां करूं लागला ? "

पडवळानें कौन्टरवर ८ आण्याचें तिकीट फेकलें. मी तें पहातांच ओरडलों– " म्हणजे ? "

मीं दोन्ही हात खिशांत घातले–तिकीट नव्हतें.

पडवळ हंसत म्हणाला, " आहे कीं नाहीं शेरास सव्वाशेर– ! तूं खाटेवर पडला होतास तेव्हांच खिशांतून तिकीट बाहेर पडलें होतें. तें मी–हा ऽ हा ऽ ऽ हा ऽ ऽ ऽ !

★ ★

अनुक्रम

## ५० न छापण्यासाठीं लिहिलेली लघुतमकथा !

**लेखक** : श्री. ल. मो. कुकडे, बी. ए. पुणें.

" कुठं सफर काढताय् वाहिनी, !" सामानाची बांधाबांध करणाऱ्या सरलाबाईना, सदोबाच्या घरांत पाऊल टाकतांच, मीं विचारलें.

" मरतें मी आपली माहेरीं, " सरलावहिनी त्राग्यानें म्हणाल्या, " माझा इतका कंटाळा आलाय् यांना तर सरळ सरळ कां सांगत नाहीं, मला दुसरा संसार थाटायचाय् म्हणून ! मी कांहीं यांच्या सुखा-आड येणारी नाहीं. एक सोडून चार का बाया नाचवीतना घरांत—"

" काय बोलतां हें वहिनी ? " त्यांचा वाक्प्रवाह थोपवीत मीं म्हटलें.

" मी नको झाली आहे बरं कुकडे भाऊजी यांना ! " वहिनी साभिनय म्हणाल्या.

सरला सुंदर, सुशिक्षित, शीलवान्, श्रीमंत घराण्यांतली व मनमिळाऊ स्वभावाची होती. सदोबा म्हणजे आतांचा डॉक्टर सदाशिव हा माझा लंगोटीमित्र. एम्. बी. बी. एस् नंतर अवघ्या वर्षांतच त्यानें धंद्यांत लौकिक मिळवला. सदाशिव व सरला यांचा विवाह माझ्या मध्यस्थीनें झाला. ह्या अनुरूप जोडप्याचा संसार सुखानें चालला होता. परंतु आज एकाएकीं झालेलें हें वादळ पाहून मला दुःख तर झालेंच· पण त्यापेक्षां जास्त आश्चर्य वाटलें, कीं हा निर्व्यसनी सदोबा इतका बहकला कसा !

" झालं तरी काय ! सांगा ना. " मीं म्हटलें.

" सांगा कशाला ! तुम्हीच पहा डोळ्यांनीं तुमच्या मित्राचे पराक्रम. कोण एक बया आणलीय् आणि खोलीचीं दारें-खिडक्या लावून, मारे चालल्यायत् लग्नाच्या आणाशपथा. म्हणणं होतंय, ' निर्मला, तुझ्यासाठीं हिमालयावरून उड्डाण करीन, अरबी समुद्राच्या तळावरून रांगत रांगत जाईन. तू माझी हो ! "

" सद्या, सद्या, !" मीं म्हटलें, " चला पाहूं वहिनी खोलीकडे. " मी तडक तिकडे वळलों.

" निर्मला, आतां शेवटचें सांगतों. तू माझी झाली नाहींस तर हा देह उद्यां तुला जिवंत दिसणार नाहीं. " आंतला आवाज.

हें वाक्य ऐकून वहिनीला भोंवळ आली; आणि माझें डोकें भडकलें. दाराला लाथ मारून मीं तें उघडणार इतक्यांत सद्याच दार उघडून जोर-जोरानें " सरला, सरला, " असें ओरडत बाहेर आला; आणि मला पाहून म्हणाला, " लख्या, लख्या, अरे तू आलास होय ? काय मजा आली आहे बघ ! "

" मजा आली ! सरलेच्या सर्वस्वाची होळी केलीस आणि तुझी मजा आली, नाहीं ! "

सदोबानें मोठा ' आ ' वासला. " अरे झालं काय ? "

" काय व्हायचं राहिलंय् आतां ? कांहीं शरम, लाज ? "

" अरे, पण—"

" कुठं आहे ती निर्मला ? "

सदोबाच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. " निर्मला होय ? ही इथं आहे ती. " सदोबा हातांतल्या कागदाकडे पहात म्हणाला, " अरे लख्या, मी गोष्ट लिहीत होतों गोष्ट. तुम्हीं ऐकलेलें भाषण गोष्टींतल्या नायकाचें होतें. सरलेशीं बोलत बसण्याचा मोह आवरत नाहीं, म्हणून दार लावून बसलों. आणि गोष्ट पुरी होतांच तिला ती दाखविण्यासाठीं हा बाहेर आलों !"

" पण तिनें तर माहेरीं जाण्याची तयारी केली. "

" वेडी कुठली. "

" कुठं, छापायला पाठविणार होतास काय ? "

" अरे डॉक्टरांचं वाङ्मय छापतो कोण ? गोष्ट गंमत म्हणून. छापण्यासाठीं ती लिहिली नव्हतीच, पण ह्या शेवटच्या या सुंदर अनपेक्षित कलाटणीमुळं आतां मात्र ही गोष्ट प्रोफेसर गोरे यांच्या संग्रहासाठीं देतों धाडून ! "

★ ★

अ. भा. म. ... २३५

## ५१ तल्लफ

लेखक : श्री. मो. रा. अडवलपालकर ( कोल्हापूर )

गाडी भरधांव चालली होती. खिडकीजवळ बसून तो विमनस्कपणें बाहेर पहात होता. छोटीं सुंदर निसर्गदृश्यें त्याच्या दृष्टीपुढून धांवत होतीं. पण—त्याचं तिकडं लक्ष नव्हतं. शून्य दृष्टीनें अंतराळांत कुठेंतरी पहात तो बसला होता—मध्येंच दोन्ही हात एकमेकांत गुंतवून त्यानें बोटें काडकन् मोडलीं. चेहरा, खसखसा चोळला, व लालसर झालेल्या डोळ्यांनीं डब्यांत सभोंवार नजर फेंकली—सगळीकडे कसा आनंद उसळला होता ! कुणी हंसत खिदळत होते, कुणी चिवडा बिस्किटांच्या फक्क्या मारीत होते. कुठें गप्पांना ऊत आला होता; आणि बरेचसे मनसोक्त धूम्रमान करीत होते—हो धूम्रपान ... नानातऱ्हेच्या सिगरेट्सच्या सुगंधी धुरानं वातावरण धुंद झालं होतं आणि हीच गोष्ट त्याला चैन पडूं देत नव्हती. त्याला विलक्षण ‘ तल्लफ ’ आली होती. आणि त्याच्या खिशांत तर एकहि सिगरेट शिल्लक नव्हती. मघाशीं गाडींत चढण्याच्या घाईत सिगरेटचें नवें पाकीट घ्यायचें तो अजिबात विसरला होता. पुण्या-मुंबईकडल्या गाडींतील “ पानपट्टी विडी माचीस ” विकणाऱ्या पोऱ्यांची व्यवस्था या बाजूच्या गाड्यांतून असूं नये याचा मनाशीं खेद करीत त्यानें खिशांत हात घातला, व कधींकाळीं आंत टाकलेलें एक सुपारीचं खांड काढून त्यानें तोंडांत टाकलें ... त्यानें आजुबाजूला पाहिलें—आणि काय आश्चर्य ! त्याच्या बाजूसच बसलेल्या गृहस्थाच्या मांडीवर, सुंदर हिरवं अवगुंठन असलेला त्याचा चिरपरिचित “ थ्री कासल्स ” सिगरेटचा डबा मोठ्या ऐटींत विराजमान झाला होता ! ... त्यानें बसल्या-जागीं चुळबुळ केली. त्या गृहस्थानें टाईम्समध्यें खुपसलेलें डोकें वर करून त्याच्याकडे पाहिलें, व जरा हंसल्यासारखें करून परत टाईम्समध्यें बुडी मारली ! !— हिरमुसला होऊन तो पुन: खिडकीबाहेर पाहूं लागला. तोंच त्याच्या शेजाऱ्यानें त्याच्या खांद्यास स्पर्श करून म्हटलें, “ मिस्टर, काड्याची पेटी आहे का !— ” त्याचा चेहरा खुलला ... आली !— शेवटीं आली म्हणायची वेळ ... घाईघाईनें त्यानें खिसे चांचपून काड्याची पेटी त्या गृहस्थाच्या हवालीं केली. —हं ... आतां ती

मंजुषा उघडली जाईल. तो कनवाळू गृहस्थ ती आपल्यापुढें धरील. आपण एक नाजूक सिगरेट काढून हातांत घेऊं, आणि मग ... त्या श्वेतसुंदरीचें आकंठ अधरपान करूं. तो बळेंच खिडकीबाहेर पाहूं लागला. ... पण छे ! अजून डब्याचें झांकण कांहीं उघडेना. त्यानें चोरून आपल्या शेजाऱ्याकडे पाहिलें. त्यानें टाइम्स केंव्हांच मिटून मांडीवर ठेवला होता, व त्यावर तो हिरवा डबा आरूढ झाला होता. खिशांत हात घालून त्या गृहस्थानें थोडा वेळ संशोधन केलें व एक चाकू काढला. तो उघडला मग एक सुरेख काडी काढून त्यानें ती तासली, व चांगली टोंकदार झाल्यावर शांतपणें दांत कोरण्यास प्रारंभ केला. त्याचा चेहरा गोरामोरा झाला. ओठावरून जीभ फिरवीत त्यानें त्या हिरव्या डब्याकडे पाहिलें. ...

—दांत कोरून झाल्यावर त्या गृहस्थानें फिरकीच्या तांब्यांतून एक भांडेंभर पाणी वर काढलें— आणि तो हिरवा डबा उघडला.

त्यांतील सोडाबायकार्बची फक्की मारून त्यानें ढसांढसां पाण्याचे घोट घेतले. प्राणांतिक तल्लफ कशाला म्हणतात हें त्याला त्यावेळीं कळलें !

★ ★

## ५२ जयमाळ

लेखक : श्री. शेषमल सुरजमल छाजेड.

कांहीं न् कांहीं सौंदर्य प्रत्येकांत असतेंच, पण त्याच्यासारखा काळा, कुरूप मनुष्य जगांत कदाचितच दुसरा कुणी असेल. मोठे आणि काळे ओंठ हत्तीसारखे लांब कान त्याच्या चेहऱ्याला आणखीच भयानक बनवीत.

पण बाह्यांगाशीं त्याच्या अंतरंगानें कांहींच साम्य नव्हतें. तसलें माधुर्य, तसली कोमलता, आणि तसले शांतभाव फारच कमी माणसांच्यां हृदयांत सांपडतील.

जरी त्याचें मुख सौंदर्यविहीन होतें, तरी कधीं कधीं त्याच्या चेहऱ्यावर या प्रकारचें हास्य विलसूं लागे, ज्याचें वर्णन करणें मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. त्याचे डोळे केंव्हां केंव्हां स्वर्गीय छटेनें इतके उज्ज्वल होत कीं ज्यामुळें असें प्रतीत होई, जणूं काय त्याचें आंतील

सौंदर्य बाहेरच्या काळ्या आवरणाला छिन्न–भिन्न करून प्रकाशित होण्याचा प्रयत्न होत आहे.

अंतरंगांत असल्या प्रकारचें सौंदर्य असून सुद्धां तो कुणालाही आपल्याकडे आकर्षित करू शकला नाहीं. कुणीच त्याला ओळखलं नाहीं. कुणाचीही स्नेह–दृष्टी त्याच्यावर पडली नाहीं.

त्याच्याजवळ कुणीच बसत नसे आणि कुणी त्याचें कांहीं ऐकतही नसत !

पण......

—तो कवि होता !

आपलें दुःखी जीवन आधार बनवून तो कविता करी ! मनांतल्या मनांतच त्या कविता तो गाई ! त्याच्या कविता कुणी ऐकत नसत !

प्रेमीही होता तो !

त्याचें हृदय प्रेमानें परिपूर्ण होतें, पण त्याच्या प्रेमावर कुणाचाहि मुळींच विश्वास नव्हता.

* * *

ज्या देशांत तो राहत असे, तेथल्या राजकन्येला त्यानें पाहिलें होतें एकदां !

पाहतांच आपलें सर्व प्रेम त्यानें तिला अर्पण केलें, पण आपल्या त्या प्रेमाला त्यानें हृदयाच्या गाभाऱ्यांत लपवून ठेवलें. कुणालाही त्याचा पत्ता लागला नाहीं.

राजानें एकदां " सर्वांत श्रेष्ठ कवि कोण ? " याचा विचार करण्यासाठीं देशांतल्या समस्त मोठमोठ्या कवींना आपल्या दरबारांत बोलाविलें. याच दरबारांत राजकन्येचं स्वयंवरही होणार होतं. तीच निवडलेल्या वराला माळ घालणार होती.

मोठमोठे श्रेष्ठ कवि आले. तोही आला. त्याला पाहतांच लोकांनीं असंतोष प्रगट करण्यास सुरवात केली. त्याला हें सगळं कळलं—पण तो कांहीं एक न बोलतां–ऐकतां गप बसला.

कुणींच त्याला निमंत्रण दिलं नव्हतं !

राजदरबारांत आज जो स्वतः याचकासारखा उपस्थित झाला होता, तर केवळ आपल्या दुःखाचें ओझें हलकें करण्यासाठीं ! अपमान सहन करतां करतां त्याच्या हृदयाचे तुकडे तुकडे झाले होते. आतां त्याला तें सहन करतां येईना ! यासाठींच संपूर्ण सभेमधें आपलें दुःख रडण्यासाठीं तो आज उपस्थित झाला होता ! राजकन्येला तरी प्रेमाची पारख असेल अशी वेडी आशाही त्याच्या मनांत होती.

पाळीपाळीनें कवींना बोलविण्यांत आलें. कुणी संध्येचें वर्णन केलें, कुणी प्रभातचें, कुणी राजाचें, कुणी स्त्रीसौंदर्याचें, कुणी कशाचें.

सगळ्यानंतर तो उठून उभा राहिला, आणि लोक त्याची टिंगल करूं लागले. त्यानें त्यांच्याकडे पाहिलें सुद्धां नाहीं.

सभेंत उपस्थित असलेल्या सर्वांना सम्बोधून कवितेच्या रूपांत तो आपलें स्वतःचें दुःखी जीवन ऐकवूं लागला. आर्त उत्कट प्रेमाची आळवणी करूं लागला.

क्षणभरांत सारी सभा स्तब्ध झाली.

वीणेच्या तारा-प्रतितारांत ज्याप्रमाणें झंकार निघतात, त्याप्रमाणें कवितेच्या छंदातिछंदांत त्याच प्रकारच्या लहरी उठूं लागल्या.

समस्त सभेंत कारुण्याच्या धारा वाहूं लागल्या.

सर्वच आश्चर्यचकित झाले. ज्या लोकांनीं घृणेनें सुद्धां त्याच्याकडे पाहिलें नव्हतें ते आज विस्मित होऊन त्याच्याकडे पाहूं लागले.

कुठें गेला तिरस्कार ? कुठें गेली त्याची काळी-कुरूप मूर्ति ?

सर्वांनीं पाहिलं. त्यांना वाटलें जणूं काय एक दिव्य पुरुष स्वर्गांतून खालीं उतरून आला आहे.

पण तो कवि मात्र आत्म-विस्मृत होऊन आपली दुःखकहाणी सर्वांना ऐकवीतच होता.

त्याचें गीत संपतांच राजकन्येनें जवळ येऊन त्याच्या गळ्यांत माळ घातली ! चहूंबाजूला हर्ष-ध्वनि झाला. डोळे उघडून त्यानें पाहिलें-समोर राजकुमारी उभी होती ! तिनें घातलेल्या हाराच्या पुष्पांचा सुगंध चोहों बाजूला दरवळत होता ! !

तो म्हणाला—“ राजकुमारी ! तूं माझ्या प्रेमाचा स्वीकार केलास, स्वयंवरांत मला वरलंस, मी धन्य झालों. खरं प्रेम सौंदर्य अथवा कुरूपतेवर अवलंबून नसतं हें तूं आज जगाला सिद्ध करून दाखविलंस. आज मी धन्य झालों.

—पण ती राजकुमारी नाक मुरडून मागें वळली—ती म्हणाली—“ ही माळ स्वयंवराची नव्हे—कवितेंत आपण श्रेष्ठ ठरलांत त्याची जयमाळ आहे ही.

स्वयंवराची माळ ही दुसरी......

आणि तिनें पुढें जाऊन ती माळ दुसऱ्या एकाच्या गळ्यांत घातली —अत्यंत भिकार कविता म्हणण्याबद्दल ज्याला लोकांनीं पहिल्या पांच दहा क्षणांतच गप्प बसविलें होतें त्यालाच तिनें माळ घातली होती— मात्र तो मदनासारखा सुंदर होता, आणि त्याच्या अंगावर हिऱ्या-मोत्याचे अलंकार झळकत होते ! !

त्या दिवसानंतर जयमाळ मिळालेल्या या कवीनें पुन्हां प्रेमाची काय कसलीच कविता लिहिली नाहीं !

★ ★

## ५३ अन्याय.

लेखक : श्री. श्री. कों. गोडबोले.

काय झालें होतें कोण जाणे. पण त्या दिवशीं त्या शहरांत जिकडे तिकडे अगदीं सामसूम दिसत होतें.

एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून इतर वाहनांची पर्वा न करितां बेदरकारपणें गांवांतून भटकण्याकरतां तेथील तरुण सायकलस्वार प्रसिद्ध होते. कोणत्याही हॉटेलच्या कोपऱ्यावर एकमेकांच्या पाठीवर थाप मारून हंसत खिदळत उभे राहणारा त्या शहरांतील कॉलेजचा विद्यार्थीवर्ग सर्वांच्या परिचयाचा होता. निरनिराळ्या रंगांचीं पातळें नेसून आणि रोज नवीन तऱ्हेची केशभूषा करून सतरा ठिकाणीं लचकत उगीचच

इकडून तिकडे मिरविणाऱ्या कॉलेजच्या तरुणी हें या नगरीचें एक वैशिष्ट्य होतें.

आज मात्र वरील प्रकारचें कोणतेंच लक्षण तेथें दिसत नव्हतें. कोपऱ्या-कोपऱ्यावर अगदीं गळून गेलेल्या सुतकी चेहेऱ्याचे अनेक तरुण एकमेकांत अगदीं हळू परंतु गंभीर अशी चर्चा करीत असतांना दिसत होते. मधेंच एकादा नवखा तरुण त्यांच्यांत येई आणि एकाद्याला विचारी, "काय रे, काय झालं ? "

यावर एकाद्या अजबखान्यांतील वस्तूकडे पहावें त्याप्रमाणें त्याच्याकडे " तुला माहीत नाहीं ? " अशी प्रश्नार्थक नजर रोखली जाई आणि मग कोणीतरी हलकेंच त्याच्या कानांत कांहींतरी कुजबुजे. तें ऐकल्यानंतर मात्र ' असं का ! ' असें म्हणून तोही भकास चेहेऱ्यानें इकडे तिकडे पाहूं लागे.

जें दृश्य तरुणांच्यांत दिसत होतें तसेंच थोड्याफार फरकानें तरुणीं-च्यांतही दिसत होतें. आपली सर्व कला नटण्यांत खर्च करणाऱ्या त्या शहरांतील युवतींना आज कपड्यांत अगदींच राम वाटेना. उभ्या आयु-ष्यांत काळजीची रेषा आजच प्रथम त्यांच्या चेहेऱ्यावर उमटली होती. काजळ घालून डोळे पाणीदार करण्याची आज त्यांना जरूर नव्हती. ' आतां कसें होणार ' या एकाच काळजीनें सर्वांना पछाडलें होतें.

मध्येंच एकाद्या युवकाचें ' आम्ही हा अन्याय कधींही सहन करणार नाहीं' असें चिडून तावातावानें उद्गारलेलें वाक्य ऐकूं येई, तर मधेंच एकाद्या फाजील भावनाप्रधान तरुणीचें मुसमुसणें ऐकूं येई.

एका जमावांत मात्र याच्या अगदीं उलट वातावरण दिसून येत होतें. " खाशी झाली " अशा प्रकारचें विजयाचें हास्य त्यांच्या मुखावर चम-कत होतें. ' बरं झालं बुवा ' असें म्हणून पुष्कळजण समाधानाचे निश्वास टाकीत होते. हा जमाव फिरून परत येणाऱ्या वृद्ध पेन्शनरांचा होता हें कोणींही ओळखलें असतें.

" काय झालं होतं तरी काय आज ! " या उत्साही आणि खेळकर तरुणतरुणींवर अशी कोणती आपत्ति कोसळली होती कीं ज्यामुळें गांवांत अशी स्मशानशांतता दिसत होती ! मला कांहींच सुचेना.

याच्या बुडाशीं कांहीं तरी विलक्षण कारण असलें पाहिजे. त्याशिवाय गांवांत इतकी सामसूम होणें शक्य नव्हतें. मी आपल्याच विचारांच्या तंद्रींत होतों. पण इतक्यांत, " युनिव्हर्सिटीची मुलींचें कॉलेज काढण्यास परवानगी " असें मोठ्यानें ओरडत जाणाऱ्या एका वर्तमानपत्र विकणाऱ्या पोऱ्यानें मला जागें केलें. माझ्या डोक्यांत एक दिवा लागला. त्याच्या प्रकाशांत मात्र मला सर्व प्रश्नांचीं उत्तरें दिसूं लागलीं.—यापुढें मुलींनीं मुलींच्याच कॉलेजांत गेलें पाहिजे—मुलांच्या कॉलेजांत मज्जाव होणार—असा हुकूम उद्यां निघणार या बातमीनें तरुणतरुणींत ही खळबळ उडाली होती !

★ ★

## ५४ "स्त्री-स्वभाव."

लेखक : "राजीव" ( पुणें )

सुमती आणि तिच्या मैत्रिणी आपापसांत बोलत चालल्या होत्या. आणि त्यांच्या समोरून वसंत येत होता. सुमती जवळ आल्यावर तिच्याकडे जाऊन वसंत तिला म्हणाला, " आजच्या सुयशाबद्दल मी तुमचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. "

—आणि न कळतच संवयीनुसार त्याचा हात हस्तांदोलनासाठीं पुढें झाला ! पण सुमतीनें त्याला नमस्कार करीत म्हटलें, " आभार मानतें त्याबद्दल..."

आपल्याशीं, आपण हात पुढें केला असतां सुमतीनें हस्तांदोलन न करतां नमस्कार केला हें पाहून तो खजील झाला. अधिक न बोलतां त्यानें तेथून काढता पाय घेतला. तो दूर गेल्यावर सुमती आपल्या मैत्रिणींना म्हणाली, " पाहिलंत ना, कसा धडपडत होता माझ्या स्पर्शासाठीं ! सारी पुरुषजातच मेली अशी हपापलेली असते नुसती स्त्री-स्पर्शासाठीं ! "

यावर तिच्या मैत्रिणी हंसल्या.

त्या मुली पुढें जातात तोंच त्यांना हेमंत भेटला. यंदा तो बी. ए. ला पहिल्या वर्गांत आला होता. त्याला पाहतांच सुमती पुढें होऊन म्हणाली, " कॉंग्रॅच्युलेशन्स, हेमंत !"

—आणि आपला नाजुक हात हस्तांदोलनासाठीं त्याच्यापुढें केला! पण हेमंत तिला नमस्कार करीत म्हणाला, "थँक्स हं."

तो गेल्यावर सुमती आपल्या मैत्रिणीला म्हणाली," पाहिलंस ना, किती उर्मट आहे तो! ज्याच्या मनांत पाप असतं तोच स्त्रीला स्पर्श करायला कचरतो! हेमंताच्या मनांत माझ्याबद्दल वाईट भावना आहे, म्हणूनच तो माझा हात हातांत घेण्यास धजूं शकला नाहीं. चोराच्या मनांत चांदणं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं बाई. सारी पुरुष जातच मेली अशी पापी!"

यावर तिच्या मैत्रिणी हंसल्या खऱ्या; पण कोणत्या अर्थानें कुणास ठाऊक!

★ ★

## ५५ लता आणि फुलं

**लेखक :** श्री. भि. ज. नेवगी (म्हापसा; गोवा)

बँडचा मधुर आवाज ऐकूं येत होता.

नानातऱ्हेच्या जयघोषानें रस्ता दुमदुमून जात होता.

लता आपल्या घरांतून बाहेर आली. केवढी प्रचंड मिरवणूक जात होती ती!

तिच्या बालिश मनाला ती मिरवणूक पाहून आनंद झाला.

रस्त्यावर ठिकाठिकाणीं नानातऱ्हेचीं फुलें उधळण्यांत येत होतीं. नी तीं फुलं पाहूनच तिच्या आनंदानें उचल खाल्ली.

लता!...एका गरीब आईबापाची मुलगी होती—

फुलांची तिला किती आवड!

आळींतील मुलं डोक्यांत फुलं घालतांना पाहून तिलाहि आपल्याला फुलं मिळावीं ही जाणीव तत्परतेनें होई.

पण!...

तिचे आईबाप गरीब होते.

नि त्यामुळें तिला दररोज नवीं नवीं फुलं मिळणं अशक्य होतं.

तिला पुष्कळ, पुष्कळ वाईट वाटे.

रडूं सुद्धां येई तिला कधीं कधीं.

नि ती रडतांना पाहून तिच्या आईला फार वाईट वाटे.

पण आज तिला किती आनंद झाला !

तिचे चिमुकले डोळे अत्यानंदानें भरून आले.

ती चटकन् रस्त्यावर गेली व आपल्या ओटींत भरून घेतां येईल तितके फुलांचे गुच्छ तिनें भरून आणले.

तिच्या चेहऱ्यावर आज अत्यानंद ओसंडत होता.

ती आईकडे आली नि आनंदानें बेहोष होऊन म्हणाली.

" आई, आई, हीं पहा फुलं ! किती सुंदर फुलं !–आई, यांची मला माळ करून देशील ना, ग आई ? " ती आनंदानें बेहोष होऊन एका-मागून एक प्रश्न आईला विचारूं लागली...

" अग कुठून आणलींस हीं फुलं ? " आईनें चटकन् विचारलें.

" रस्त्यावरून मिरवणूक गेली होती ना, तिनं शिंपडलीं होतीं आई तीं रस्त्यावर. किती छान, छान गुच्छ आहेत. आई, पहा ना ! किती छान आहेत नाहीं ?..."

ती आनंदानें बेहोष होऊन नाचूं लागली.

आईच्या डोळ्यांत चटकन् पाणी आलं.

तें एका महान् देशभक्ताचं प्रेत रस्त्यावरून जात होतं नि त्या प्रेता-वरचीं फुलं होतीं तीं ! तिनं मुलीकडं पाहिलं–तिचा आनंद पाहिला–आणि ती उसासा टाकून म्हणाली.

" देईन बरं करून. आपल्यासारख्या गरीबांना हींच फुलं ! "

★ ★

## ५६ भिकारीण–

लेखक : श्री. वसंत माने

शहराच्या अगदीं बाहेरचा असा रस्ता होता तो. माणसांची फारशी ये जा तिथं नसायचीच. फक्त संध्याकाळच्या वेळीं शहराच्या दगदगीपासून दूर, दोन घटका एकांतवास इच्छिणारीं जोडपीं मात्र तिथं येत !

—आणि तरीहि ती भिकारीण तिथं बसे. रहदारीच्या रस्त्यावर कांहीं लाभ तरी झाला असता...पण तिला कोणीं इतरत्र पाहिलें नाहीं, एवढें मात्र खरें !

त्या दिवशींहि ती तशीच बसली होती. सबंध दिवसांत तिला कांहीं मिळालें नसावें बहुधा—तिची मुद्रा दीनवाणी दिसत होती...सगळेच लोक भिक्षा घालतात थोडेच ?

काळोख पडूं लागला. तिच्या पोटांत भुकेनें आग पडली होती ! हळूहळू दोन आकृत्या तिला जवळ येतांना दिसूं लागल्या. मोठ्या आशेनें ती तिकडे पाहूं लागली.

तीं जवळ जवळ आलीं. त्यांना ती ओळखत होती.—नवविवाहित जोडपें होतें तें.

फांदीवर बसून मानेंत मान घालून किलबिलणाऱ्या पांखरांप्रमाणें एकमेकांला बिलगून तीं कुजबुजत चाललीं होतीं. तीं जगाला विसरलीं होतीं. ढगांत चालत होतीं. फुलांत डोलत होतीं.—स्वर्गसुखाच्या गोड गुंगींत धुंद झालीं होतीं तीं !

तीं अगदीं जवळ आलीं. त्यांची स्वर्गीय समाधि मोडण्याचें तिच्या जिवावर आलें पण...भुकेल्या पोटाची आर्त हांक तिच्या तोंडून नकळत बाहेर पडली ! त्या नवपरिणित वधूचें तिच्याकडे लक्ष गेलें. कुणाला माहीत, तिला कांहीं वाटलेंहि असेल. पण त्या अनिर्वर्णनीय आनंदाची ओढ तिला पुढें पुढें खेंचीत होती ! ती आपल्या सख्याला बिलगली. दूरदूर काळोखांत त्या दोघांची आकृति एक झाली... !

त्या बिचारीचें भुकेलें पोट तळमळलें. आत्मा कढून कढून आंतल्याआंत रडला...पण लगेच तिनें स्वतःला सावरलें !—तिचे अश्रुपूर्ण डोळे

आकाशाकडे वळले. थरथर कांपणारे सुरकुतलेले हात जोडले गेले. आणि ओठ पुटपुटले, " हे भगवन्! त्यांना सुखी ठेव. माझ्या पापी आत्म्याचे शाप त्यांना न बाधोत...एकदां मीहि याच रस्त्यानें अशचि जात होतें!"

★ ★

## ५७ अंगठीचें मोल

लेखक : श्री. द. मा. मिरासदार (पंढरपूर)

सुमित्रेनं आपल्या बोटांतल्या अंगठीकडं पुन्हां एकवार पाहिलं. " हीं विकावी कीं काय " असा ती विचार करूं लागली. " पण...पण वसंताला काय वाटेल? लग्नाची आठवण म्हणून त्यानं ही अंगठी मला भेट दिलेली. ती विकली हें त्याला मुळींच सहन होणार नाहीं. पण विकल्याशिवाय गत्यंतरच नाहीं म्हणा...! "

आणि खरोखरीच ती विकणं तिला भाग होतं.

वसंताचं आणि तिचं लग्न होऊन दोन वर्षं झालीं होतीं. तिचा स्वभाव पहिल्यापासूनच उधळा आणि वसंताला तर बेताचाच पगार! तें कांहीं तिच्या चैनीला पुरत नसे. मग ती खुशाल स्वतःच्या खात्यावर निरनिराळ्या वस्तू खरेदी करून घेऊन येई. साड्या, पातळं सारं कांहीं. वसंतानं विचारलंच तर ती दडपून सांगे " बाबांनीं मला पैसे दिलेले होते ना? त्यांतून आणलं. "

आतां त्या सगळ्या दुकानाचीं सुमारें पांचशें रुपयांचीं निरनिराळीं बिलं तिच्या टेबलावर येऊन पडलीं होतीं.

...आणि तीं कशीं भागवावीं हाच सध्यां तिच्यापुढं मोठा प्रश्न होता.

त्या हिऱ्याच्या अंगठीकडं बघतां बघतां तिला मोहनरावांची आठवण झाली. मोहनराव वसंताच्या ओळखीचे होते. मधून मधून सहज ते घरीं येत असत. त्यांनीं तिच्या हातांतील हिऱ्याची अंगठी जेव्हां पाहिली तेव्हां ते तिला म्हणाले होते,

" खरोखर ही अंगठी फारच सुंदर आहे. विकली तर हिची पांचशें रुपयांपर्यंत किंमत यायला कांहींच हरकत नाहीं. "

यावर ती रागानं म्हणाली होती,

" छे: ! छे: ! विकायची विकायची नाहीं मला ती ! लग्नाची आठवण म्हणून त्यांनीं मला दिली आहे. मी ती विकेन असं तुम्हांला वाटलं तरी कसं ?..."

" मी कुठं तसं म्हणतों ! सहज आपलं एक सांगितलं. मात्र हिचं खरोखरच कांहीं करायचं असेल तर प्रथम मला विचारा बरं का !..."

आणि यावरच ती विचार करीत होती.

समोरच्या बिलाकडं तिनं पुन्हां एकदां टक लावून पाहिलं आणि मोहनरावांना चिठ्ठी पाठविली " मी अंगठी कांहीं अडचणींमुळं विकायची ठरविली आहे. तुम्ही पांचशें रुपये घेऊन दुपारीं या. मात्र ही गोष्ट आपणां दोघांशिवाय कुणालाही समजतां कामा नये. अंगठी हरवली अशी कांहींतरी मी वसंताजवळ बतावणी करीन. "

मोहनराव दुपारीं आले. त्यांनीं नीट न्याहाळून खिशांत अंगठी टाकली आणि पांचशें रुपयांचा चेक फाडून तिच्या टेबलावर ठेवला.

संध्याकाळीं घरीं आल्यावर वसंतानं विचारलं,

" अं...? मोहनराव आज दुपारीं घरीं आले होते का ? "

" होय. " तिनं कसंबसं सांगितलं.

" त्यांनीं पांचशें रुपयांचा चेक इथं ठेवला ? "

" हं ! " तिनं उत्तर दिलं. खोटं बोलण्याचं धाडस तिला झालं नाहीं.

" बरं झालं बुवा ! वसंत समाधानाचा निश्वास टाकून म्हणाला, आज माझ्या ऑफिसांत येऊन त्यानं माझ्याकडून पांचशें रुपये रोख नेले. म्हणाला दुपारीं तुझ्या घरीं चेक ठेवून जातों म्हणून. ओळख असली तरी पैशाच्या बाबतींत त्याचा मला विश्वास नव्हता म्हणून वाटलं गुंगारा देतो कीं काय ! पण नाहीं......! "

...आणि यावर ती काय बोलणार होती !...

(कल्पना इंग्रजीवरून)

★ ★

## ५८ सूड

लेखक : श्री. गो. शं. मुळगांवकर

जातीय दंगा फोफावला होता. जणूं वाऱ्यावर फैलावलेली आग.

हिंदूंच्या वस्तींत मुसलमानांच्या प्रेतांचा ढीग सांचला होता. आणि मुसलमानांच्या मोहल्यांत हिंदूंचीं प्रेतें कुजत होतीं.

सैय्यद, मुल्लाचा एकुलता एक मुलगा. बापानें तंबी दिली होती.

..."सैय्यद, घराबाहेर पडायचं नाहीं. तंगडी तोडून टाकीन."

पण...कुणीतरी संध्याकाळीं बातमी आणली.

'सैय्यद मारला गेला—'

एकही खून न केलेल्या मुल्लाचें रक्त सळसळलें. डोळे लालीलाल झाले. सरकन एक सुरा घेऊन तो बाहेर धांवला.

कर्फ्यू चालू होती. सामसूम असलेल्या रस्त्याच्या कडेकडेनें कुणीतरी दबत दबत चाललें होतें.

हिंदूंच्या वस्तीला तिथूनच सुरुवात झाली होती.

मुल्लाच्या डोळ्यांत खून चढला आणि...

त्या निबिड अंधारांत त्यानें अचूक वार साधला.

उन उन रक्ताची चिळकांडी, त्याच्या सूडानें पेटलेल्या तोंडावर पडतांच तो शांत झाला.

रक्तानें भरलेला सुरा घेऊन दारांत पाऊल टाकतांच आंतून मरिना ओरडली, 'ऐकलं का, आपला सैय्यद चचांकडे सुखरूप आहे. कर्फ्यू सुरू झाली कीं हळूहळू येतों असें त्यानें सांगून पाठविलें आहे. आतांच हा रफी आला ना तिथून तो सांगत होता...'

पण पुढचें ऐकायला मुल्ला होता कुठें ?

पोराच्या रक्तानें माखलेला सुरा बापाच्या छातींत खुशाल जाऊन झोंपला होता.

* *

## ५९ प्रचंड सभा.

लेखक : श्री. दि. वा. अजगांवकर (रत्नागिरी)

त्या गांवांत जिकडे तिकडे निवडणुकीची धामधूम होती. मोटारी, सायकली, प्रभातफेऱ्या, वर्तमानपत्रें यांतून प्रचार तर सर्रास चालला होता....

शिवाय दर २।४ दिवसांनी 'आझाद चौकांत' प्रचंड सभा भराव-याच्या—वडे पुढारी यायचे—लोक जमायचे.

—आज पण "आझाद चौकांत" ही गर्दी झाली होती. जो तो अगर्दी पुढें पुढें सरकत होता......

एका देशभक्ताला लांबून ही गर्दी दिसली. धांवतच तो गर्दीत घुसला.

देशप्रीतीनं ओथंबलेलं त्याचं हृदय त्याला आवरेना. लोकांच्या पायावर पाय देत देत तो पुढें सरकत मध्यभागीं आला....

मध्यभागीं एक सामान्य माणूस उभा होता, व त्याच्या समोर एक नंदीबैल मान डोलवीत होता—एखाद्या देशभक्ताला पहाण्यासाठीं जेवढी गर्दी जमे तेवढी गर्दी हें दृश्य पहाण्यासाठींहि जमली होती.

—देशभक्तानें कपाळाला हात लावला.

★ ★

## ६० उपकाराचा मोबदला !

लेखक : श्री. दत्तात्रय पेडगांवकर, हैद्राबाद (दक्षिण)

मंजु मधुर गीत गात एक निर्झर खळाळत होता.

त्याच्या स्फटिकासारख्या स्वच्छ जलांत आजूबाजूचं मनोरम सौंदर्य मोहकतेनं नाचत होतं.

तहानेला हरिण क्षणभर त्या मधुर संगीतानं तल्लीन होऊन गेला.

—अन् एकदम समोर त्यानं नजर फेंकली. दोन जळते निखारे जवळ येत असलेले त्याला दिसले.

क्षणभर निश्चल राहिला तो. भीतीची छटा त्याच्या चिमुकल्या

मनांत उद्भवली. आपला जीव वांचवण्याकरितां तो सैरावैरा धांवूं लागला. ते जळते निखारे —सिंहाचे ते जुल्मी डोळेसुद्धां त्याच्या मागें लागले. कुठंवर धांवणार तो चिमुकला जीव ?

सिंहानें त्याच्यावर झडप घालण्यासाठीं पंजे उचलले अन्—

वाऱ्याच्या गतींनं एक बाण आला न् सिंहाच्या पोटांत शिरला.

त्यानं तो घायाळ होऊन गतप्राण झाला अगदीं !

त्याचा बचाव करणाऱ्या व्यक्तीबद्दल त्याला अतोनात आदर वाटला. आपला जीवितरक्षक कोण आहे तें पहाण्याचा मोह त्याला आवरला नाहीं.

—मागें वळून पाहण्याचा अवकाश इतक्यांत तो त्याच्या जवळ आला. खो खो करीत त्यानं आपला तीक्ष्ण सुरा त्या हरिणाच्या नाजुक मानेवर चालवला ! "असा छान खिमा होईला याचा—कोंवळा लुसलुशीत!" तो म्हणाला.

* *

## ६१ खिडकींतून.

**लेखकः श्री. अनंत पेडगांवकर**

हॉस्पिटलच्या त्या रूममधें दोन रोगी होते.

एकाची कॉट अगदीं खिडकीशेजारीं होती. दुसरा त्या खिडकीपासून दूर होता.

दुसऱ्याला पहिल्याचा हेवा वाटे अगदीं ! त्याला वाटे, आपली कॉट खिडकीलगत असावी. भरल्या नेत्रांनीं तिथून दिसणारी सृष्टिशोभा बघावी.

'काय दिसतंय त्या खिडकीतनं ?' दुसऱ्यानें पहिल्याला अधीरतेनें विचारलं.

'मनोरम सौंदर्य—हिरव्या तृणानं सुशोभित झालेले डोंगर, प्रशांत-तरंग निर्माण करणारं नील जलाशय नि. ... !'

पहिल्या रोग्याच्या या शब्दानं दुसऱ्याचे डोळे उत्सुकतेनें नाचूं

लागले— जणुं त्याला अदृश्य असलेलं सृष्टिकाव्य त्याच्या हृदयांत प्रतिबिंबित पावलं होतं.

दुसऱ्याच्या मनांतली ईर्षा अधिकच प्रबळ झाली !

त्याच्या डोक्यांत एकच विचार थैमानत होता ' **खिडकी.** '

—इतक्यांत पहिल्याला एक मोठी खोकल्याची उबळ आली.

तरीहि नेहमींप्रमाणं दुसऱ्यानं ' बेल ' दाबून नर्सला सूचना दिली नाहीं. पहिला त्या असह्य वेदनेनें गतप्राण झाला ! दुसऱ्याची कॉट त्या खिडकीशेजारीं आली. उत्सुकतेनें त्यानं खिडकीबाहेर नजर फेंकली.

—दूरवर निसर्गशोभा हांसत होती. डोंगराच्या पायथ्याखालीं तलावांत तें सौंदर्य हलकेंच डोंकावत होतं अन् तलावाच्या बाजूला—?

त्या ओसाड नि भेसूर स्मशानांत पहिल्याचं प्रेत जळत होतं. त्याच्या चितेंतून उठणाऱ्या ज्वाला हवेंत भेसूरपणं हांसत उफाळत होत्या.

त्याच्या डोळ्यांतून अश्रु झिरपले न् कां कुणास ठाऊक, त्यानं कॉल-बेल वाजवली—तो नर्सला म्हणाला, " ही खिडकी बंद करून टाक— कायमची बंद ! "

★ ★

## ६२ कला आणि जीवन

**लेखक** : श्री. शंकर दत्तात्रय भोंसले ( कोल्हापूर )

दोन साहित्यिकांची वाटेंत भेट झाली.

वहिवाटीप्रमाणें विचारपूस झाल्यावर ते ' कला आणि जीवन ' या विषयावर बोलूं लागले.

एक म्हणे, " कलेकरितां कला. "

दुसरा म्हणे, " जीवनाकरितां कला. "

कांहीं वेळ त्यांच्या चर्चेची गाडी राजमार्गानें चालली होती.

पण नंतर तिनें वाममार्ग धरला.

त्यांचे आवाज चढले. डोळे फड्याच्या बोंडाप्रमाणें लालबुंद झाले.

मारक्या म्हशीप्रमाणें ते एकमेकांकडे पाहूं लागले.

आणि शेवटीं ते मुद्यावरून गुद्यावर आले.

चाळीच्या नळावरील बायकांप्रमाणें शिवीगाळ व मारामारी सुरू झाली.

हां हां म्हणतां लोक जमले.

तेवढ्यांत तिकडून एक श्रीमंत संपादक निघाला. त्यानें खिशांत हात घालून आंतले रुपये खुळखुळ वाजविले, आणि साहित्यिकांकडे पाहिलें.

...वर चढविलेल्या अस्तन्या खालीं सारून, दोन्ही भांडणारे साहित्यिक हातांत हात घालून त्याच्या मागोमाग चालूं लागले.

★ ★

## ६३ दूरदृष्टि.

**लेखक : श्री. बाळ सामंत रुईया कॉलेज.**

तें एक केमिस्टचें दुकान होतें.

कॅशवर, मालक टाइम्स वाचण्यांत गुंग झाला होता. पण त्याच्या ह्या तंद्रीचा भंग झाला ! कोणी तरी कट् कट् केलें. त्यानें वर पाहिलें, तर एक गृहस्थ उभा होता. " काय पाहिजे आपल्याला ? "

मालकानें विचारलें. " कांहीं नाहीं पण जरा टेलिफोन हवाय्."

" अं–घ्या तो " मालक म्हणाला. " हॅलो ! —कोण राणे कंपनी का ? मी–मी होय, वामन श्रीधर पाटील...आपला असाच एक गरजू... आपल्याकडे क्लार्कची जागा खाली आहे असं समजलं म्हणू...काय ?

जागा खाली नाहीं ? कोण वाडेकर नांवाचे गृहस्थ आहेत म्हणतां ?

बरं...नाहीं–मला माहिती हवी होती म्हणून तसदी दिली... बरं...तसदीची क्षमा...अच्छा ! "

आनंदित मुद्रेनें त्यानें रिसीव्हर खालीं ठेवला व केमिस्टचे आभार मानून जाऊं लागला.

पण केमिस्टनें त्याला हांक मारली, " अहो मिस्टर, जरा इकडे या. तुम्हांला नोकरीच हवीय् ना ? मग राहा आमच्याकडे. पहा बुवा जमलं तर ! " " नो नो थँक्स ! आपला जरा गैरसमज झालाय " तो म्हणाला. " अहो त्याचं असं आहे कीं मी आहे या राणे कंपनीतच

भरपूर पगारावर. मालक आहे जरा चंचल स्वभावाचा. कालच त्यानें उगीच दम भरून ' काढून टाकतों ' अशी धमकी दिली. तेव्हां म्हटलं खरं खोटं काय त्याचा अंदाज घ्यावा. जाऊं द्या. आतां काळजी नको सध्यां तरी. पुढचं पुढें. मीच तो वाडेकर ! ! ''

★ ★

## ६४ " पुरुष ! "

**लेखकः** श्री. शिवशंकर सीताराम कुलकर्णी ( मुंबई )

" ... आणि आतां यापुढें तुमचें माझें एकत्र रहाणें अशक्य झाल्यामुळेंच, परत न येण्याच्या निश्चयानें,मी घर सोडून जात आहे.—सुनंदा."

—श्रीधरच्या हातांतून पत्र गळून पडलें. त्याचा विश्वासच बसेना या घटनेवर. सुनंदा घरांतून निघून गेली ! भरल्या संसारांतून लक्ष्मी उठून गेली. त्याचें मस्तक सुन्न झालें.

—हातांतल्या संपत आलेल्या सिगारेटचा चटका हाताला बसतांच, श्रीधरनें त्यावर दुसरी सिगारेट फुलवली. आणि दिवाणखान्यांत परत फेऱ्या घालण्यास सुरवात केली.

—सिगारेटमागून सिगारेट संपत होती. त्याच्या मनांत विचार आला—.

" ... सुनंदा आतां काय म्हणाली असती ? सिगारेटचा तिला भारी तिटकारा. लग्न झाल्यावर पहिल्या एकांतांत आपल्या आवडीनिवडी तिनं किती उल्हासानं आपल्याला सांगितल्या होत्या ! धूम्रपान सोडण्याबद्दलचा तिचा हट्ट आणि ... "

—श्रीधरनें निग्रहानें तो विचार बाजूला सारला. त्याच्या डोक्यांत तुफान माजलें होतें. क्षणाक्षणानें खळबळून किनाऱ्यावर उसळणाऱ्या लाटांप्रमाणें, त्याच्या मस्तकांत विचार धुमाकूळ घालत होते—.

" ... पांच वर्षें ! लग्न होऊन आज पांच वर्षें झालीं. काल हरिणगतीनें पालाण मारून गेला; प्रीतिविवाहाच्या सुखी संसाराचे भडक रंग हळूहळू फिकट होऊन गेले; प्रीति—पुष्पाचा मधुमादक गंध चोरपावलानें उडून गेला, आणि—आणि आतां सुनंदा घरांतून निघून गेली ... "

—श्रीधरनें विमनस्कपणें हातांतली सिगारेट फेंकून दिली.

" ... तिनं असें करायला नको होतें. आपसांतले क्षुल्लक मतभेद या थराला न्यायला नको होते. संसाराचा सारीपाट अर्ध्यावर उधळून सुनंदा गेली ! दुष्ट ! छे: छे: ती आज ना उद्यां येईल ! पण नाहीं—ती यायची नाहीं. पहिल्या दिवशींच अनुभवास आलेला तिचा हट्टी, एककल्ली स्वभाव आजही तसाच आहे. उलट जास्त तेजच ! ... "

—श्रीधरनें तिसरी सिगारेट पेटवली. तरळत्या धूम्रवलयांतून गत-जीवनाचीं नानाविध दृश्यें त्याच्या डोळ्यांसमोरून सरकत गेलीं. तिच्या निग्रही वृत्तीचे कैक प्रसंग त्याच्या समोर आले. आणि सुनंदेची मूर्ति त्याच्या अंतःचक्षूसमोर उभी राहिली. दळदार ओठांना किंचित् मुरड घालून, सरोष रोखून पाहणारी ती गौरमुद्रा पाहतांच त्यानें आपली मान बाजूला वळवली. त्याच्या डोक्यांत विचार आला—

" ... सुनंदा ! छे तिच्याशिवाय राहणें अशक्य आहे ! प्रीतीच्या माणसाकडून आगळीक झाली तर विभक्त रहाणें हाच का उपाय ? मत-भेद झाला तरी, नंदा ! तुझा सहवास—तुझा प्रमत्त सहवास !—तिच्या-शिवाय सर्व शून्य आहे. ती कुठेंही जाऊंदे, मी तिला घेऊन येईन. मी मिनतवारी करीन. ती कितीही निष्ठुर झाली तरी तिच्याशिवाय माझं जीवन अशक्य ! आतांच्या आतां दौलतीला गाडी आणायला सांगितलं पाहिजे. मला तिच्याकडे गेलंच पाहिजे—आतांच ... "

—आणि श्रीधरच्या तोंडून ' दौलती ऽऽ ' अशी नकळत हांक निघून गेली.

" जी ऽ मला हांक मारली ? " दौलती गडी पुढें दारांत येऊन म्हणाला.

" अं ! मी तुला हांक मारली ! " विचार—तंद्रींतून भानावर येऊन श्रीधर उद्गारला. मालकाचें मन ताळ्यावर नाहीं हें त्या चतुर चाकरानें ओळखलें आणि मोठ्या अदबीनें विचारलें—" कांहीं पाहिजे आहे, साहेब ? "

" कांहीं नको ! " किंचित् रुक्ष पण करड्या आवाजांत श्रीधर म्हणाला— " सिगारेटचें दुसरें पाकीट घेऊन ये ! "

★ ★

## ६५ घारोपंतांची एकसष्टी !

लेखक : कै. वसंत अनंत गद्रे ( मुंबई )

घारोपंतांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झालीं.

आतांपर्यंत त्यांनीं साठ कादंबऱ्या लिहिल्या. त्यांचा एकसष्टी समारंभ होता आज ! त्यांची एकसष्ठावी कादंबरी त्याच वेळीं प्रकाशित होणार होती.

त्यांच्या गौरवार्चीं पुष्कळ भाषणें झालीं.

" घारोपंतांचें नांव आज थोरांपासून पोरांपर्यंत सर्वांच्याच तोंडीं झालें आहे. आज एकाद्या रस्त्याला जरी त्यांचें नांव दिसत नसलें तरी रस्तोरस्तीं त्यांचें नांव ऐकूं येत आहे. इतकें वय होऊनहि त्यांची प्रतिभा शाबूद आहे, नव्हे त्यांनीं ती ठेवली आहे. त्यांची ही एकसष्ठावी कादंबरी तर त्यांच्या मागच्या साठहि कादंबऱ्यांना सहज मागें टाकील. हिंदु कुटुंबपद्धतीवर त्यांनीं आग पाखडल्यामुळें पुष्कळांनीं त्यांच्या या कादंबऱ्या चुलींत आणि बंबांत टाकल्या. पण त्यामुळें कादंबरीकारापेक्षां त्या लोकांचाच अधिक फायदा झाला. ही त्यांची साहित्यसेवा अजरामरच राहील. "

बेरिमाप स्तुतीनें फुग्यासारखे फुगलेले घारोपंत बाहेर पडले. पण रस्त्यावरच्या कसल्याशा धक्क्यानें हा फुगा फुटला. त्यांनीं पाहिलें— कोपऱ्यावर साठ पुस्तकें फूटपाथवर मांडून एक पोऱ्या बसला होता. सर्व पुस्तकें घारोपंतांचींच होतीं—तो म्हणत होता, " लई सस्त लावलीं बुकं ! " " साहेब ? तुम्ही तरी एक पुस्तक घ्या. आज दोन महिने— तब्बल साठ दिवस हीं पुस्तकें घेऊन बसलोंय् पण कुणी ढुंकून देखील बघत नाहीं. साहेब—आन्या दोन आन्याला घ्या—पन उचला ! "

पोऱ्याचे ते आर्तस्वर ऐकून घारोपंतांना दयेचा पाझर फुटला आणि आपलें एकसष्ठावें पुस्तक त्यांनीं त्याला फुकट देऊन टाकलें.

★ ★

## ६६ दैवी खेळ.

लेखक : श्री. दिगंबर कुलकर्णी, हैद्राबाद ( द. )

' डॉक्टर, इकडं या हो जरा. ह्याची प्रकृति फार बिघडलीय. वेड्या-सारखा बरळतोय सारखा. '

तिनें आपल्या अत्यवस्थ मुलाकडे बोट दाखवून डॉक्टरला कळकळीनें विनविलें.

' थोडं थांबा. पलीकडल्या वॉर्डमध्यें एक रोगी सीरियस आहे अगदीं. मी आलोंच. कांहीं काळजी करूं नका. '

डॉक्टरनीं धीर दिला.

डॉक्टर पलीकडल्या वॉर्डमध्यें जाण्याच्या आंतच तो रोगी दगावला होता.

डॉक्टरला थांबायला वेळ थोडाच होता ? ते परत त्या मुलाकडे आले.

पण—

त्या मुलाचें बरळणें बंद झालें होतें—नेहमींकरितांच बंद झालें होतें तें !

आईचें रडणें मात्र त्या शान्त नि भयाण वातावरणाचा भंग करीत होतें.

" अरेरे ! पांच मिनिटांपूर्वीं इंजेक्शन दिलं असतं तर वांचला असता हा ! " डॉक्टर पुटपुटले.

* *

## ६७ सासुरवास !

लेखक : श्री. व. त्र्यं. सोनाळकर ( अमळनेर )

स्त्रीजातीबद्दल सहानुभूति वाटणें हा पुरुषजातीचा मनोधर्म आहे. आणि स्त्री जर तरुण आणि सुन्दर असेल तर मग विचारायलाच नको ! अशीच एक तरुण आणि सुन्दर स्त्री आमच्या शेजाराला रहात असे. घरांत माणसें इन् मिन् तीन ! ती, तिचे पतिराज आणि वृद्ध सासूबाई !

पतिराज सकाळीं दहा वाजतां ऑफिसला जात व संध्याकाळीं

६।६॥ वाजतां परत येत. दुपारच्या प्रहरीं घरांत फक्त सासू न् सून ! आणि याच दरम्यान त्या घरांतून दबलेल्या आवाजांत हुंदके ऐकूं येत.

ते दबलेले हुंदके ऐकून माझ्या मनांत येत असे. 'काय दुष्ट आहे म्हातारडी ? सोन्यासारखी सुंदर सून आणि उगाच छळते तिला.' केव्हां केव्हां त्या म्हातारीबद्दल असा कांहीं मनांत राग उसळे कीं एकदम उठावं आणि अशी काढावी खरडपट्टी—पण उगाच इतरांच्या भानगडींत पडून—आणि त्याही स्त्रियांच्या, विकतच श्राद्ध घ्यायला मन धजत नसे—त्यामुळें सारा राग मनांतल्या मनांत दाबून टाकण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता. परंतु त्या दबलेल्या रागाचा परिणाम ती म्हातारी कधीं तरी समोर दिसली कीं, तिच्याकडे रागानें आणि तिरस्कारानें पहाण्यांत येत असे. अशा तऱ्हेनें तिच्याकडे नजर टाकली कीं, तिची खालीं ढळलेली मान जास्तच खालीं होई—आणि ती झटकन् समोरून निघून जाई.

त्या खाष्ट सासूइतकाच त्या तरुण स्त्रीच्या नवऱ्यावर पण माझा तितकाच राग होता ! इतकी सुंदर पत्नी लाभली असतां हा नालायक नवरा खुशाल आपल्या म्हाताऱ्या आईला तिला छळूं देतो ! ती बिचारी सासुरवासाखालीं झिजत असतां हा खुशाल बेफिकीरपणें डोळयावर कातडें ओढून सर्व सहन करतो आहे !

असें कित्येक दिवस चाललें होतें. इकडे मनांतून माझी अस्वस्थता वाढत होती ! अति बलवानाची अरेरावी सहन तर करवत नाहीं, पण आपल्या दुर्बलपणामुळें त्याचा प्रतिकारही करतां येत नाहीं, अशा वेळीं मनाचा जो तडफडाट होतो—तसाच तडफडाट माझ्या मनाचा चालला होता ! आणि उपाय पण सुचत नव्हता.

असाच एके दिवशीं मी घरांत होतों. दुपारीं अडीच तीनचा सुमार असेल ! शेजारच्या घरांतून हुंदक्यांचा आवाज येऊं लागला. मीं ताड्कन् उभा राहिलों. मनांत आलें, 'काय हा अन्याय—प्रत्यक्ष नवरा घरांत असतां ही थेरडी तिला छळते आहे—आणि हा सुंभ नुसता ऐकून घेतो आहे !' इतक्यांत एक चापट मारल्याचा आवाजही झाला !

'काय झालं एकदम' माझ्या पत्नीनं मला मध्येंच असें उभे रहातांच विचारलें.

'ऐक. ती म्हातारडी आपल्या सुनेला मारते आहे—आणि तो नालायक नवरोबा—'

'पण तुम्ही कां उगाच संतापतां! त्यांचं ते पाहून घेतील—' ती शांतपणें म्हणाली.

स्त्रीच स्त्रीजातीची खरोखर वैरीण आहे असं जें कोणी म्हटलं आहे तें अक्षरशः खरं आहे, असं वाटलं मला त्या वेळीं! मला ते हुंदके ऐकणं अशक्य झालं. त्या तरुण सुंदर स्त्रीचा करुण आणि अश्रुपूर्ण चेहरा माझ्या डोळ्यासमोर नाचूं लागला. मीं एकदम गॅलरींत जाऊन उभा राहिलों—

दुसऱ्याच क्षणाला मी कोलमडून पडायचा—पण कठड्याला धरलं म्हणून बचावलों.

घरांतून तें तरुण जोडपं हंसत हंसत बाहेर पडत होतं. आणि त्यांच्या घरांतून मात्र दबलेले हुंदके अजून ऐकूं येत होते.

* *

## ६८ निसर्ग आणि मानव.

**लेखक** : श्री. रा. भा. नाटेकर ( मुंबई )

निसर्गावर विजय मिळविण्याचा मानवानें निश्चयच केला. ईश्वरानें कधीं स्वप्नांतही न पाहिलेले दिव्य असे शोध मानवानें प्रत्यक्षांत आणले.

पृथ्वीवर आपल्याला अशक्य अशी एकही गोष्ट त्यानें ठेवली नाहीं.

एका क्षणांत पृथ्वीवर प्रलय करणारीं पंचमहाभूतें—दीर्घ प्रयत्नानें मानवानें त्यांना दास केलें.

निरनिराळे शोध लावून आपण भू-गोल पादाक्रांत केला.

आतां ख-गोल—

नंतर सर्व ग्रह-गोल—

आणि शेवटीं सगळ्या विश्वाचें गूढ—

मानवाची अतृप्तता वाढत चालली.

चांदण्या रात्रीं—

एकदां तो आकाशाकडे पहात असतां—

खगोलाचें आधिपत्य करूं इच्छिणाऱ्या या भूगोलाधिपति मानवानें प्रथम चंद्रावर स्वारी करण्याचें ठरविलें.

परमाणु-शक्तीच्या सहाय्यानें पृथ्वी सोडून चंद्राच्या दिशेनें तो निघालासुद्धां !

चारदोन मैल वर गेल्यावर त्याचें विमान पृथ्वीवर वेगानें येऊन आदळलें.

मरतांना अखेरचे निश्वास सोडीत तो उद्गारला " पृथ्वीवर नित्य घडणाऱ्या मृत्यूवर मात्र अजून मीं विजय मिळवला नाहीं. "

★ ★

## ६९ त्याचं धाडस ?

लेखकः श्री. अनंत गणेश फंदी, बी. ए. पुणें

" मी दिवाणखान्यांत खुर्चीवर बसलें होतें. जवळच्या इझिचेअरवर तो केव्हां येऊन बसला तें मला समजलंसुद्धां नाहीं. माझी छाती धडधडूं लागली. पुरोगामी, नवमतवादी तरुण तो ! मला भयंकरच भीति वाटूं लागली त्याची. त्यानें जवळच्या टेबलावरील पुस्तक उचललं व तो त्या पुस्तकाचीं पानं चाळूं लागला. माझ्याशीं बोलायला सुरवात कशी करावी याची मनांत पूर्वतयारी करीत असावेत राजश्री असा मीं तर्क केला. परंतु त्याला काय वाटलं कुणास ठाऊक; त्यानं तें पुस्तक दाणकन् टेबलावर आदळलं. त्याची दृष्टि माझ्याकडे गेली. मला त्याचा चेहरा थोडासा खुललासं वाटलं. आणि त्या तरुणाच्या असुरी धाडसाचं मला मोठं नवल वाटलं; त्यानं खुशाल माझ्या खांद्यावर हात ठेवलान् कीं !

मी लगेच तो झिडकारून प्रतिकार करीन असं वाटण्यापूर्वींच त्यानं मला अगदीं आपल्याजवळ घेतलं. काय सांगूं त्यावेळची माझी स्थिति !

नको ग बाई तें सांगणं ! त्यानं हळूंच माझं तोंड आपल्या ओठांजवळ नेलं. मला कल्पनाहि नव्हती तो निर्लज्जपणानं खुशाल असं कांहीं

अनुक्रम
नों. दि.

करील याची ! माझं सारं शरीर कंपायमान होऊं लागलं त्यावेळीं. प्रतिकारार्थ माझ्यासारखी अबला अशा वेळीं दुसरं काय करणार ? मीं एकदम जोरानी किंकाळी फोडली व तशीच किंकाळत राहिले कांहीं वेळ.

इतक्यात दिवाणखान्याचा दरवाजा लोटल्याचा आवाज झाला व “ [illegible] जेवायला यायचं म्हणून मीं ताट देखील वाढलं; येतायेत ना ? ” असा तरुण स्त्रीचा आवाज माझ्या कानीं पडला. त्याची धर्मपत्नीच असावी ती. “ हा बघ आलोंच ” असं म्हणून तो दार उघडून चालता झाला.

त्याच्या पत्नीला त्याचं हें धाडस सांगून हे मेले पुरुष विवाहित असतांनादेखील असं भलतं वर्तन करायला खुशाल कसे धजावतात हें दाखवावं असं मला वाटलं. परंतु पुन्हां मीं विचार केला कीं ह्या जोडप्यांत भांडणं लावून त्या बिचारीच्या सुखाचं मातेरं करून तरी मला काय मिळणार होतं ? म्हणतात ना, “ मान सांगावा जनांत आणि अपमान ठेवावा मनांत. ” मी स्तब्ध राहिलें.

* * *

शेजारच्या स्वयंपाकघरांत त्याची पत्नी त्याच्याशीं बोलत होती, “ इश्य ! निवून देखील गेला भात ! येतो म्हणून म्हणायचं अन् बसायचं बांसरी वाजवीत प्रहरन् प्रहर ! थांबा, ती बांसरीच फेकून देतें एकदांची ! ! ! ”

★ ★

## ७० “ ज. वि. प्र. सं. ”

**लेखक : श्री. रा. ब. तांबोळी, बी. एस् सी ( ऑनर्स )**

—शेवटीं तब्बल सत्तावीस मिनिटें एकोणतीस सेकंदाच्या दीर्घ चर्चेनंतर श्री. विनायकराव साठमारे यांची टाळ्यांच्या गजरांत ‘ **जरठविवाहप्रतिबंधक संस्थेचे** चिटणीस म्हणून निवडणूक झाली. त्यावेळीं हंसून व मान लववून त्यांनीं ‘ ज. वि. प्र. सं. ’ च्या आजीव सात सदस्यांना अभिवादन केलें. त्यानंतर विनायकराव ऊर्फ विनूभाऊ डोळ्या-

वरील चष्म्याची अर्धा सेंटिमिटर जाडीचीं भिंगें पुशीत, घसा साफ करून बोलण्यासाठीं उभे राहिले. अन् क्षणांत त्यांनीं आपाल्या प्रभावी अस्खलित, मोहक वक्तृत्वानें सर्वांना मोहून टाकलें. चेहरा गंभीर करून आपल्यावरील गंभीर जबाबदारीची जाणीव सर्वांना करून देतांना ते म्हणाले, " मित्रहो, असले विवाह इथून पुढें होऊं द्यावयाचे नाहींत...होत असतील तर... तर वाटेल ते उपाय योजून ते मोडून टाकायचे अन् पूर्वी झालेले असतील तर...कायदेमंडळांत घटस्फोटांचं बिल पास करून बिचाऱ्या गरीब गाईची सोडवणूक करायची...तें बिल पास करण्याकरितां कायदे-मंडळांतील ' माजी ' ' आजी ' अन् ' भावी ' सभासदांवर दडपण आणायचं !...... "

अशा तऱ्हेनें भूत–वर्तमान–भविष्य काळांतील आपल्या त्रिविध काम-गिरीचें वर्णन करून त्यांनीं आपला निर्णय जाहीर केला. " अशा या महत्वाच्या विध्वंसक कार्यासारख्या शुभकार्यास मी आज–आत्तांच सुरवात करणार... शुभस्य शीघ्रम्...! "

सर्व सदस्य निघून गेल्यावर विनायकरावांनीं लगेच बोलल्याप्रमाणें कृतीस सुरवात केली. आपल्या संस्थेचं महत्त्व पटविण्यासाठीं प्रथम पत्रक काढून लोकांची सहानुभूति मिळवावी असं ठरवून तें पत्रक लिहिण्या-साठीं टेबलाकडे वळले...तोंच दार वाजलें. त्यांनीं पाहिलं तों दार धाडकन् उघडलें गेलें अन् येणारी व्यक्ति उंबरठ्यावर अडखळून विनायक-रावांना साष्टांग नमस्कार घालयची पण...तसं न होतां त्या व्यक्तीनें विनायकरावांच्या गळ्यांत मिठी मारून ओक्साबोक्सी रडायला सुरवात केली...विनायकराव अकल्पित उपस्थित झालेल्या संकटानें गांगरून गेले...ती व्यक्ति स्फुंदत स्फुंदत म्हणाली, " विनायक, काय हा माझ्या-वर दुर्धर प्रसंग..." अन् मग तिला जास्तच हुंदके आले. तेव्हां विनायक-राव कळवळून तिला शांत करीत म्हणाले, " बोल ना कमु...काय झालं. तें सांग ना मला..."

" कसं नि काय सांगूं ? अहो त्यांचीं बोलणीं झालीं..."

" कुणाचीं ! अन् कसलीं ! " विनायकराव म्हणाले.

" अहो, गेला दीड महिना तेंच चाललंय् सारखं ! बाबा सारखीं माझ्याकरितां स्थळं पहातात. त्यांचा पैशाचा मोह..."

" काय ?" विनायकरावानें तिच्या गळ्यांतील मिठी सोडवून तिचे हात हातांत घेत म्हटलें, " तुझं माझं प्रेम आहे हें त्यांना माहीत असूनहि···"

" अहो, त्यांना पैसा हवा, अन् म्हणूनच तर त्यांनीं मला आज एका थेरड्याचे गळ्यांत..."

" काय ? " विनायक ताडकन उभा राहिला, " जरठविवाह ! "

त्याचे डोळे गरगर फिरूं लागले. " अन् तुझा !...माझ्या लाडक्या कौमुदीचा !...

त्यांचा खालचा ओठ दांताखालीं दाबला गेला.

तो रागानें थरथरत उभा राहिला...विनायक कृतनिश्चयानें म्हणाला, " कमु, तूं जा ! निर्धास्त रहा ! मी जीवंत असेपर्यंत तरी तुझा त्या थेरड्याशीं विवाह होणं शक्य नाहीं ! "

कौमुदीला एकदम हायसं वाटलं ! तिनें अभिमानानें विनायकरावांच्या चेहऱ्याकडे अशा कांहीं नजरेनें पाहिलें कीं पहाणाराला खचित वाटलं असतं " बस्स ! पराक्रमाचं स्वागत करावं स्त्रियांनींच ! "

विनायकराव खिडकींतून दूरवर ( कुठेंतरी ) पहात म्हणाले, " तो थेरडा कुठं आहे ? "

" आज रात्रीच्या १२॥ च्या गाडीनें जाणार आहे...तोंवर त्यांना आमच्या शेजारची खोली मोकळी करून दिलीय...

" ठीक ! तूं जा आतां, निर्धास्त ऐस ! "

" कार्याची मुहूर्तमेढ बाकी ठीक आहे ! " असं पुटपुटत विनायकराव पुढच्या तयारीला लागले...

—विनायक हळूच दरवाजा लोटून आंत गेला...अन् त्याच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. त्याच्या आवडत्या कौमुदीचा फोटो हातांत घेऊन तो भावी ' वर ' त्या फोटोकडे पहात शेजारच्या गृहस्थाशीं बोलत पाठमोरा बसला होता...तें दृश्य पाहून विनायकचा चेहरा क्रूर हास्यानें

विलसला. अन् तोंच त्या भावी ' वरा ' चे शब्द त्याच्या कानीं पडले " पोरगी कशी नक्षत्रासारखी आहे—नाहीं ? "

" अस्सं काय ? विनायकच्या तोंडून अभावितपणें त्वेषोद्‌गार बाहेर पडले. त्या दोघांनीं चमकून वळून पाहिलें अन्......

...अन् हिरवळीवर निर्धोक संचार करीत असावा अन् एकदम कृष्णसर्प दिसावा म्हणजे जी स्थिति होते तीच विनायकची झाली.

त्याचे तोंडून अभावितपणें आश्चर्योद्गार निघाला " कोण ? बाबा ? "

—आणि त्या जरठाचे तोंडूनहि स्तिमितोद्गार निघाले " कोण ? विनायक तूं ?'

—आणि ते पितापुत्र किती वेळ त्या स्थितींत होते कुणास ठाऊक ?

शेवटीं विनायकचे वडील हंसून आपल्या शेजारच्या गृहस्थाकडे वळून म्हणाले, " पाहिलंत् ! मला वाटलं होतं याला न विचारतां परस्पर ठरवावं अन् मग त्याला आश्चर्यचकित करावं. पण आपला बेत कसला तडीस जाऊं देणार हीं अलीकडचीं तरुण पोरं ! " असं म्हणून ते विनायककडे वळून हंसून म्हणाले, " बरं ! आतां आलास ठीक झालं ! हा फोटो बघ ! कशी नक्षत्रासारखी पोरगी आहे...मी आतां तुझं म्हणणं मुळींच ऐकणार नाहीं...आम्ही वाङ्‌निश्चयसुद्धां केलाय. तुला आतां लग्नाला तयार झालंच पाहिजे...अरे उभा काय राहिलास नुसता बघत....हा फोटो बघना ! ... "



अनुक्रम 28557
IRBK-0102359
IRBK-0102359